# स्वराज्याची प्रभात

लेखक

पुरुषोत्तम वामन गोवईकर

बी. ए., एलएल. बी., वकील

आवृत्ति १ ली

३० नोव्हेंबर
१९५७

किं. १ रु. २५ नये पैसे

प्रकाशक :

पु. वा. गोवईकर

बी. ए., एल. एल. बी., वकील

२१, मंगळवार, सातारा.

मुद्रक :

य. वि. लेले

अशोक प्रिंटिंग प्रेस

५७०, शनिवार, पुणें २.

## अर्पण—पत्रिका

गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति श्री शिवाजीमहाराज यांच्या सातारा येथील थोर राजवंशवेलीच्या गोड उमलत्या कळ्यांना फुलवण्या डुलवण्यासाठीं महात्त्वाकांक्षी महाराष्ट्राच्या स्वातंत्र्येतिहासांत प्रतापगडीं उगवलेल्या स्फूर्तिदायक स्वराज्यप्रभाताची तेथील शिवस्मारकानिमित्त लिहिलेली ही कहाणी स्वातंत्र्य-समर-शताब्दीसमयीं त्यांस आदरानें अर्पिली आहे.

—पुरुषोत्तम वामन गोवईकर

# LIFE WITHOUT FREEDOM

From life without freedom, oh ! who would not fly ?
For one day of freedom, oh ! who would not die ?
Hark, hark's the trumpet, the call of the brave,
The death-song of tyrants, and dirge of the slave.
Our country lies bleeding, oh ! fly to her aid,
One arm that defends, is worth hosts that invade.

In death's kindly bosom our last hope remains,
The dead fear no tyrants; the grave has no chains.
On, on to the combat the heroes that bleed
For virtue and mankind, are heroes indeed.
And oh ! e'en if freedom from this world be driven,
Despair not-at least we shall find her in heaven.

*Thomas Moore*

---

**भावार्थ**:—गुलामगिरीच्या जिण्यांतून कोण मुक्त होऊं इच्छित नाहीं ? स्वातंत्र्याच्या एका दिवसासाठीं आत्मबलिदान करण्यास कोण तयार होणार नाहीं ? ऐका ! ऐका ! हा रणशिंगाचा ध्वनि आहे. हें रणशूरांचें आवाहन आहे. जुलुम जबरदस्ती व छळणूक गांजणूक करणाऱ्या क्रूर सत्ताधारी आक्रमकांचें हें मृत्युगीत आहे ! मरीं मरणाऱ्या गुलामांची ही विलापिका आहे ! आपली देशमाता रक्तस्रावानें आसन्नमरण होऊन पडली आहे ! अहो ! तिच्या मदतीला धांवा ! आत्मसंरक्षण करणारा एक हात अन्यायानें हल्ला करणाऱ्या अनेक सैनिकपथकांच्या बरोबरीचा आहे.

मृत्यूच्या दयामय अंतर्यामांत आपल्या आशेची धुगधुगी आहे. जुलमी आक्रमकांचें भय मृतांनां नसतें ! थडग्यांत दास्याच्या शृंखला नाहींत ! उठा ! उठा ! रणकुंडांत उडी घाला ! नीतिमत्ता व मानवता यांच्यासाठीं जे वीरपुरुष आपल्या रक्ताचें सिंचन करतात तेच आपल्या कृतीनें मरणोत्तर वीरस्वर्ग मिळविणारे खरेखुरे रणरंगधीर असतात ! आणि स्वातंत्र्य-देवीला या इहलोकांतून कोणी हद्दपार केली असेल तर जनहो ! निदान स्वर्गांत तरी तिचें दर्शन आपणांस खचित घडेल.

—थॉमस मूर

# पुरस्कार

## ले. गो. स. सरदेसाई, कामशेत.

शिवकालाचा रेडियो म्हणजे पुण्याच्या मंडईंतले शाहीर. त्यावेळचे दोन विस्तृत पोवाडे, एक अफजलखानाविषयीं अज्ञानदासाचा व दुसरा तुळसीदासाचा तानाजी मालुसऱ्याच्या पराक्रमाचा. एक्वर्थ–शालिग्राम यांनीं ते आस्थापूर्वक संपादून सन १८९१ सालीं प्रसिद्ध केलें. दोन्ही पोवाडे शक्यतितक्या पूर्वरुपांत विद्यमान असून ते तत्कालीन परिस्थितीचे निदर्शक आहेत. दोनही प्रसंग शिवाजीच्या दहा वर्षांतले सुप्रसिद्ध असून ते पोवाडे अत्यंत आस्थेनें अद्यापि म्हटले जातात. निदान त्या विषयावर या कवनांइतकें अव्वल साहित्य दुसरें नाहीं. अफजलखानाचा वृत्तांत स. १६५९चा तर तानाजीचा सन १६७०चा. "गड मी राजाचे गाईन" असें अज्ञानदास सांगतो तर राजगड राजाचा, प्रतापगड जिजाबाईचा, सिंहगड पन्हाळा पहा त्या मोगलांचा असें तत्वनिष्ठ वाक्य तुळशीदास बोलतो. दोघेही कवी एक-मेकाचे सगे व समकालीन होते, आणि आज जशी एकादी विशिष्ट घटना झाल्याबरोबर ती लगेच सर्व जगास पोंचते तसा शिवकालीन प्रघात म्हणजे शाहीरांकडून ते विषय सत्यकथेंत बनवून डफ तुणतुण्याच्या सहाय्यानें त्या दुनियेंत कळतील अशा रीतीनें गांवोगांव गायल्या जात. अफजलखानास पुरा करुन शिवाजी सुखरुप परत आलेला पहातांक्षणी जिजाबाईची मनःस्थिती कशी असली पाहिजे याची आपण कल्पना करावी. खानाच्या भेटीस शिवाजी जातांना तिच्या मनाची कालवाकालव आज आपण अंतःचक्षूनें ओळखावी. त्या संबंधानें शाहीर थराऱून कळवितो :—

'ऊमाता जिजाऊ बोलली। पोटीं अवतार जन्मला। शंकपाळ शिवाजी महाराजानें केला। आतां मी गाइन भोसले शिवराजाच्या ख्याती। दावा हेवा जाण अखेर संग्रामाच्या गती। राजगड राजाला, प्रतापगड जिजाऊला धन्य जिजाऊचे कुशीं राजा अवतार जन्मला। आपल्या मतें अज्ञान दासानें वीरमाल (सुगंध) राजाच्या गाईला। शिवाजी राजानें इनाम घोडा बक्षीस

दिला। सोन्याचा तोडा हातीं घातला। यश जगदंबेचे तुळजा प्रसन्न शिवराजाला. Acworth Footnote P. 18. "—सरदार मिळाले सदरेला। बाईनें शाहीर बोलाविले. अगीनदास कवीश्वर त्यानें कडाखा गाइला। दिला एक गांव बक्षीस त्याला। दोन सोन्याचे लंगर चढविले हाताला"। असें म्हणून शाहीर शेवटीं सांगतो,—"ज्यानें हुजऱ्या बोलाविला। जावें पुण्याच्या शहराला। मंडईच्या बाजारीं। आहे तुळशीदास शाहीर। घेऊन यावें त्याला राजगड किल्ल्याला। तुळसीदास शाहीर। त्यानें सदरेला आणिला। शिवाजी महाराजांचा पोवाडा कटिबंध केला। हजार रुपयांचा तोडा हातामधीं घातला। त्यारे तुळसीदास शाहिराच्या। शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दानें ऐकावा। सप्तयुगींचा पोवाडा कलियुगीं वर्तला." राष्ट्रास पराक्रमाची जोड हवी असेल तर वाचा हे प्राचीन पोवाडे!

वरील दोघां शाहिरांनीं सांगितलेल्या हकीकती तत्कालीन सत्यसृष्टींतल्या त्या जशाच्या तशा आज आपणांस पोंचतात यांत संशय नाहीं. म्हणजे आजच्या रेडियोप्रमाणें ते पूर्वप्रसंग पुनः तीनशें वर्षांनीं डोळ्यासमोर घडत असल्यासारखें आपण स्वतः पाहूं शकतों. ते वाचून अंतःकरण थरारतें व मनोवृत्ती उचंबळून येतात. शाहिरांच्या या सेवेला मोल नाहीं. त्या वेळच्या परिस्थितीचा तो अस्सल गाभाच होय.

अफजलखानाच्या बनावानें प्रतापगडचें नांव अमर झालें. मोऱ्यांस जिंकल्यावर सन १६५७ सालीं हा किल्ला शिवाजीनें बांधिला, आणि त्याच वेळीं किल्ल्यांची अन्वर्थक, कर्णमधुर नांवें ठेवण्याची प्रथा सुरूं केली. शिवाजीच्या समस्त किल्ल्यांत प्रतापगडचें नांव पहिलें आहे. तें त्या प्रसंगास अनुरूपच होय. शिवाजीचा पहिला अद्‌भुत पराक्रम या किल्ल्यानें जाहीर केला. तेव्हांपासून त्या पुरुषाचा लौकिक जगांत गर्जू लागला. त्यानंतर सात वर्षांनीं शिवाजी आगऱ्यास बादशहाचे भेटीस गेला त्यावेळच्या भीषण प्रतिबंधांतून केवळ बुद्धिप्रभावानें निभावून सुखरूप स्वदेशीं परत आल्याबरोबर त्याला अखिल भारतीय प्रतिष्ठा लाभली; आणि तेव्हांपासून कवि भूषण, राजा छत्रसाल वगैरे औत्तरीय व्यक्ति शिवाजीच्या दर्शनासाठीं महाराष्ट्रांत येऊं लागल्या. गागाभट्टासारखा नामांकित विद्वान पंडित

शिवाजीस राज्याभिषेक करण्यासाठीं मुद्दाम येऊन स्वराज्याची सांगता करतो याचें प्रयोजन लक्षांत भरतें. श्रीसमर्थ रामदासांना कृतार्थतेचा केवढा उमाळा आला त्याचें निदान त्यांच्या आनंदवनभुवनांत स्पष्ट दिसतें.

किल्ल्यांची रचना हीच शिवाजीच्या कर्तबगारीची साक्ष होय. तीनशें तरी किल्ले त्यानें नवे जुने असे सिद्ध करून निदान तीनशें वर्षें राज्य निर्धास्त टिकावें अशी त्याची योजना होती. प्रत्येक किल्ल्याची कथा विचित्र बनेलेली आढळते. आतां तर या कथा लुप्त होत चालल्या आहेत. जसा प्रतापगडच्या स्मारकाचा योग आला आहे, तसें इतरही अनेक किल्ले अशा स्मारकांची अपेक्षा ठेवीत आहेत. सिंहगड, पन्हाळा, पुरंदर, विशालगड हीं नांवें महाराष्ट्र कधीं विसरणार नाहीं. उगाच नाहीं औरंगजेबानें या किल्ल्यांचीं पूर्व नांवें बदलून आपलीं नवीं मुस्लीम नांवें प्रचारांत आणिलीं. त्यांतलीं कांहीं टिकलीं, कांहीं स्मरणांतून गडप झालीं. सिंहगडाचें नांव त्यानें बक्षिंदाबक्ष व सातार्‍याचे अजीमतारा ठेवलें हें आपण जाणतो. सज्जनगडास समर्थांचें वास्तव्य म्हणून त्याचें नांव त्या बादशहानें नूर–ए–सातारा ( सातार्‍याचा प्रकाश ) ठेविलें. त्या शब्दाचा अपभ्रंश नौरसतारा अद्यापि कित्येकांच्या तोंडीं वागतो.

जसे किल्ले तसेच शिवाजीचे अनेक अद्‌भुत प्रसंग एकांतून दुसरा असे निर्माण होत गेले. अफजलखानप्रसंगानंतर पन्हाळ्यावर शिवाजी झगडत असतां अडकून पडला, त्याच अवधींत बादशाही उमराव शायिस्ताखान हा शिवाजीचे छातीवर येऊन बसला. खुद्द शिवाजीचे पुण्याच्या राहत्या वाड्यांत त्यानें आसन ठोकिलें. एक महिना नव्हें, एक वर्ष नव्हें, तब्बल तीन वर्षें पावेतों या आपल्या महाराष्ट्राच्या मायभूमींत जगायचें कसें अशा अहर्निश विवंचनेंत शिवाजीला काढावीं लागलीं. केवळ बुद्धिप्रभावानें त्यानें अद्‌भुत योजना घडवून खानाचा फज्जा उडविला तें कृत्य महाराष्ट्र कधीं विसरणार नाहीं. शिवाजीनें आपल्या राज्याची मुद्रा स्वतंत्र बनविली. तींतच त्याचा एकंदर जीवनोद्योग खुलून दिसतो. ती प्रतिपच्चंद्ररेखेव ही मुद्रा आपणा सर्वांस मुखोद्गत असली पाहिजे.

परमानंद कवीनें अफजलखान प्रकरण मोठें खुलवून लिहिलें आहे. हा कवि प्रथमपासून भोसले कुटुंबांत वागलेला असल्यामुळें तत्कालीन धुरीणांच्या अंतःकरणांतील लहरी तो चांगल्या ओळखून होता. त्या लहरी पुढील पद्यांत गोवलेल्या आढळतात.

> शिवस्याफजलो वेद हृदयं स च तस्य तत् ।
> तं विधिं तु विधिर्वेद वेद संधिविधिं जनः ॥

या वर्णनांत मोठी खुमारी आहे. शिवाजीच्या हातानें खान पुरा झाला ही बातमी विजेसारखी चहुंकडे प्रगट होतांच प्रत्येकास तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली कीं हा एकंदर प्रकार घडला तरी कसा. एवढा खान पराक्रमी असा एकाएकीं चीत कसा झाला ! एक विचारूं लागला कीं अहो सांगा कीं हा बनाव कसा घडून आला ? या प्रश्नाला कवी उत्तर देतो, कीं शिवाजीच्या अंतःकरणांत काय वागतें तें खान ओळखून होता आणि खानाचें अंतःकरणांत काय वागतें तें शिवाजी ओळखून होता. म्हणजे दोघेही कोणत्या तरी कपटप्रयोगानें एकमेकांचा प्राण घेण्यास टपले होते. प्रत्यक्ष भेटींत काय प्रकार घडला तो ब्रह्मदेव जाणे. या घटनेस खून म्हणायचें कीं संग्राम म्हणायचे याचा निर्णय आजही होऊं शकत नाहीं, कीं परमानंदही सांगत नाहीं. शिवाजी म्हणणार कीं मला जीव बचावण्यासाठीं प्राण घेणें प्राप्त झालें, त्या दोघांच्या गांठीं भेटी ठरताहेत, पाहुणचार होताहेत, तपशील ठरविणें चालू आहे, त्यांतून काय निष्पन्न होईल तें खरें ! बाहेरची जनता एवढाच प्रकार जाणत होती. आज आम्हीं इतिहासकार त्या प्रकरणाचा निर्णय करून कोर्टांचा निकाल लिहित आहों.

शायिस्ताखानास पुरा हात दाखविल्यावर शिवाजीला कळून चुकलें, कीं आपण सापाच्या शेपटीवर पाय तर दिला आतां त्या दंशाचें निवारण कसें करावयाचें ! बादशहा चालून आला तर त्याला आपलें उत्तर काय ? शिवाजीच्या बुद्धीनें सांगितलें, सुरतेची लूट. झाली लगेच सर्व सिद्धता. सुरत म्हणजे समस्त पातशाहीचें अत्यंत समृद्ध नगर. शिवाजीच्या आटोक्यांत नजीक होतें. त्याजवर एकदम घाला घालावा. औरंगजेबाला चालून

येण्यास अवकाश देऊं नये. तत्पूर्वीच आपण आपला घाव घालावा. उद्योग करील त्यास पैशाला काय तोटा! शिवाजीचे हेर चहूंकडे फिरुन आले. शक्याशक्यता ठरली. बादशहाचीं धनाढ्य शहरें लुटायचीं. खरें पहातां हीं कांहीं लूट नव्हें. ही स्वराज्याची झोळी. आजचा इन्कमटॅक्स त्याच कोटींतला. कायद्यानें केलें ते सर्व चांगलें. शिवाजीनें सुरतेच्या पैशावर रायगड व सिंधुदुर्ग उभारले. राज्य निर्वेध केलें. सुरतेच्या अपमानास्तव जयसिंगची स्वारी आली. तींतून आगऱ्यास बादशहाची भेट निष्पन्न झाली. अशा या शिवाजीच्या घटना बनून आलेल्या दिसतात.

या सर्वांचा आरंभ प्रतापगड होय. दररोज देवीचें दर्शन घडावें म्हणून जिजाबाईसाठीं तेथें देवीची स्थापना करण्यांत आली. यास्तव शाहीर सांगतो—" राजगड राजाचा । प्रतापगड जिजाबाईचा " खरें पहातां शिवाजीची पहिली राजधानी राजगड. किल्ल्याशिवाय राज्य नाहीं आणि राज्याशिवाय किल्ले तरी कशाला? शिवाजीनें काळाच्या ओघास आपल्या सेवेस कसें गुंतविलें हा प्रकार त्याचे किल्ले बोलतात. पण केवळ प्रतापगडाच्या उभारणीनें जिजाबाईच्या मनाची शांति झालेली नाहीं. सिंहगड व पन्हाळा हे दोन स्वराज्याचे खांब जों पर्यंत मोंगलाचे कबजांतून सुटलें नाहींत तों पर्यंत महाराष्ट्राला स्वराज्य लाभलें असें म्हणतां येईना. म्हणून सिंहगडाची उचल जिजाबाईनें करून तानाजी मालुसऱ्यास त्या कामीं भरीस घातलें. जिजामातेच्या आग्रहास्तव तानाजी प्राणार्पण करण्यास सिद्ध झाला. तिच्या आशीर्वादानें तानाजीला आपलें जीवितसाफल्य वाटलें. अल्पावधींत पन्हाळाही शिवाजीचे कबजांत आला. आज तो पूर्वीचा समग्र इतिहास हे शाहिरांचे बोल आपल्यापुढे उभा करतात. अफजलखान व प्रतापगड हें हिंदुमुस्लीम समीकरण भावी पिढीस उत्तेजक होणार आहे आणि म्हणूनच काश्मीरचा प्रश्न आज राष्ट्रापुढें प्रामुख्यानें खेळत आहे.

माजी गव्हर्नर हरेकृष्ण मेहताब यांच्या सूचनेनें प्रतापगडचे स्मारक साकार होत आहे याबद्दल आनंद वाटतो. अफजलखानाचा प्रसंग महाराष्ट्रास जिव्हाळ्याचा आहे. त्यावर अद्याप पावेतों विपुल साहित्य निर्माण झालेलें आहे आणि त्या योगानें ऐतिहासिक संशोधनास इष्ट वळण मिळालेलें

आहे. श्री. गोवईकर यांच्या प्रस्तुत ग्रंथांत या विषयाची आणखी एकवार चर्चा करण्यांत आलेली वाचकांस स्पृहणीय वाटेल. अशा प्रकारची चर्चा अधिक ऐतिहासिक संशोधनास सहाय्यक होईल यांत मला संशय वाटत नाहीं. जिजाबाईनें शाहीराच्या हातांत सोन्याचा तोडा घातला तशा प्रकारचा तोडा घालण्याची प्रथा आज नाहीं. तथापि जिजाबाईचें हें उदाहरण महाराष्ट्रीय जनता विसरणार नाहीं. आजच्या युगांत जनता हीच राष्ट्राची माता म्हणतां येईल. त्या जनतेकडून श्री. गोवईकर यांना भरपूर उत्तजन मिळेल अशी आशा मी बाळगतो. या विषयावर पुष्कळच आधारग्रंथ आहेत. त्यांचा परामर्ष लेखकानें यथायोग्य घेतलाच आहे. त्या दृष्टीनें "स्वराज्याची प्रभात" हा प्रस्तुत ग्रंथ राष्ट्रास मार्गदर्शक होईल यांत संशय नाहीं.

कामशेत,
ता. ५ मे १९५७.

गो. स. सरदेसाई.

# पहाटेच्या प्रकाशांत

ता. १० माहे नोव्हेंबर सन १६५९ रोजीं प्रतापगडावर शिव-प्रतापाची बिजली चमकली. तिच्या तेजाची ही पूजा आहे ! जावळीचें जंगल म्हणजे शिवसिंहाची गुहा ! तींत शिरून त्याला ठार मारूं पहाणाऱ्या विजापुरच्या पारध्याचीच शिकार शिवसिंहानें कशी केली त्यासंबंधीच्या, काळाच्या अंधकारांत पुसट दिसत असलेल्या घटनेवर इतिहाससंशोधनाच्या प्रकाशाचे झोत टाकून जें रोमांचकारी ऐतिहासिक दृश्य माझ्या ज्ञानचक्षुस दिसलें त्याचें हें सत्य, साधार व प्रामाणिक आविष्करण आहे ! शिवप्रभूची जी अश्वारूढ प्रतिमा प्रतापगडावर आतां आणून उभी केली आहे व जिचा अनावरणसमारंभ भारताचे पूजनीय पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे केव्हां करणार याकडे सर्वांचे डोळे उत्कंठेनें लागून राहिले आहेत त्या प्रतिमेला व तींत समावलेल्या आदर्शभूत युगपुरुषत्वाला हा नेकजात महाराष्ट्रीयाचा मुजरा आहे ! शिवसमकालीनत्वाच्या कसोटीस व विश्वसनीयत्वाच्या प्रामाण्यास उतरलेलें कवींद्र परमानंदकृत शिवभारत, सभासदादि बखरकारांच्या बखरीं, आदिलशहाचीं फर्मानें, फॅक्टरी रेकॉर्डस, मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, मराठी रियासत, डॉ. बाळकृष्ण, प्रो. यदुनाथ सरकार, चिं. वि. वैद्य वगैरेंचीं इंग्रजी मराठी शिवचरित्रें, कै द. वि. आपटे वगैरेंचे अनेक ऐतिहासिक लेख, पाश्चात्यांचीं पत्रें, जुने पोवाडे, कॅ. मोडककृत " प्रतापगडचे युद्ध " वगैरे ऐतिहासिक साहित्याच्या दीप-ज्योतींनीं माझें लेखनीनिरंजन पाजळून केलेली महाराष्ट्राच्या महादेवाची ही मंगल आरती आहे ! तिच्या प्रसिद्धीसाठीं उपरिनिर्दिष्ट अनावरण-समारंभाच्या दिवसाची आजपर्यंत वाट पहात बसलो परंतु तो भाग्ययोग जुळून आला नाहीं. सदरहु समारंभदिनाच्या अनिश्चितपणामुळें या पुस्तकाचें प्रकाशन यापुढें स्थगित ठेवणें अनेक दृष्टींनीं मला अत्यंत अडचणीचें झालें आहे. सबब तें आज करणें प्राप्त आहे. तथापि त्यास प्रतापगडावरच्या श्रीशिवराजप्रतिमेचें दर्शन घडलें त्याबद्दल एकप्रकारें धन्यताच वाटत आहे. अनावरणसमारंभाचा थाटमाट व डामडौल आज नसला तरी तिच्या चरणीं अजिंक्यताऱ्यावरून कृतज्ञतेनें वाहिलेली ही भक्तीच्या फुलांची ओंजळ अगदीं साधें जीवन प्रिय असलेल्या त्या महाराष्ट्राच्या सात्विक व निगर्वी राजाच्या आत्म्याला रुचणार नाहीं असें कोण म्हणेल ? त्यांतूनही या पुस्तकप्रकाशनास १८५७ च्या स्वातंत्र्यसमरशताब्दीच्या विजयी दिनो-त्सवाचें भाग्य लाभून त्यांतील थोर हुतात्म्यांनाहि आज श्रद्धांजलि वाहून वंदन करण्याची सुवर्णसंधि मिळाली ही काय कमी समाधानाची गोष्ट आहे ?

आतां कर्तव्यप्राप्त आभारप्रदर्शन करावयाचें. त्यांत अग्रपूजेचा मान अत्यंत वयोवृद्ध, तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध असलेले सुप्रसिद्ध रियासतकार पद्मभूषण गो. स. सरदेसाई यांचा आहे हें वेगळें सांगण्याची जरुरी नाहीं. माझ्या विनंतीस मान देऊन त्यांनीं एवढ्या वार्धक्यावस्थेंतहि मजकरितां परिश्रम घेऊन माझ्या या ऐतिहासिक प्रबंधास आपल्या अधिकृत स्वरुपाच्या बहुमोल प्रस्तावनेनें भूषविलें व मला उपकृत केलें त्याबद्दल मी त्यांचा निरंतरचा ऋणी आहे. त्याचप्रमाणें कै. इ. भू. बाबासाहेब देशपांडे यांच्या ग्रंथालयाचा उपयोग त्यांचे पुतणे श्री. श्रीनिवासराव देशपांडे व नातू श्री. सुरेश देशपांडे यांनी मला करूं दिला त्याबद्दल त्यांचा व कै. रा. ब पारसनीस यांच्या खाजगी चित्रसंग्रहांतील कांहीं चित्रें त्यांचे चिरंजीव श्री. अमृतराव यांनीं पुस्तकांत समाविष्ट करण्याकरतां दिलीं त्याबद्दल त्यांचाहि मी फार आभारी आहे. अफझलखानाचें चित्र चित्रशाळा प्रेसनें वापरूं दिलें त्याबद्दल श्री. दासुअण्णा जोशी यांचाही मी आभारी आहे. तसेंच सातारा येथील माझे सुप्रसिद्ध व्यवसायबंधु श्री. शांताराम शालगर, श्री. वसंतराव बेगमपुरे, श्री. सांदीपनी पोरे व श्री. बारवडे या वकीलचतुष्टयानें शिवाजीमहाराजा-विषयींच्या जाज्वल्य अभिमानानें हें पुस्तक जणुं आपलेंच आहे अशा आत्मीयतेच्या भावनेनें याकामीं पुढाकार घेऊन मला जें हार्दिक सहाय्य व सहकार्य दिलें व हें पुस्तक-प्रकाशनाचें कार्य सिद्धीस नेलें त्याबद्दल त्यांच्या-विषयींच्या माझ्या मनांतील कृतज्ञतेच्या भावना पूर्णपणें व्यक्त करण्यास माझ्याजवळ पुरेसे शब्द नाहींत. पुस्तकाची प्रुफें तपासण्याचें कामीं माझे मित्र श्री. स. कृ. जोशी वकील व श्री. शाहूचे संपादक श्री. विष्णुपंत ढवळे यांनीं मला जी मदत केली त्याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहे. पुणें येथील डायमंड पेपर मार्टचे मालक श्री. शंकरराव वाळवेकर यांनींहि अगदीं आपुलकीच्या भावनेनें या कामांत आपला सहकार्याचा हात प्रेमळपणानें पुढें केला व अशोक प्रिंटिंग प्रेस यांचें चालक श्री. य. वि. लेले यांनीं हें पुस्तक फार सुबक रीतीनें छापून दिलें त्याबद्दल त्या उभयतांचे व ज्यांनीं ज्यांनीं ह्या पुस्तकाचें पूर्णत्वासाठीं परिश्रम घेतलें त्या सर्वांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो. पुस्तकांत कांहीं अशुद्धें राहिलीं असल्यास व ऐतिहासिक दृष्ट्या कांहीं चूकभूल घडली असल्यास ती संधि मिळाल्यास दुरुस्त करण्याचें आश्वासन देऊन पहाटेच्या प्रकाशांतील माझी ही गाढ कृतज्ञतेची किलबिल बंद करतो.

सातारा,<br>
स्वातंत्र्यसमरशताब्दि,<br>
ता. १० मे. १९५७.

**पुरुषोत्तम वामन गोवईकर.**

# स्वराज्याची प्रभात

## अमर छत्रपति

छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांचें नांव माहित नाहीं असें एक लहान मूलहि निदान महाराष्ट्रांत तरी आढळणार नाहीं. पावणे-तीनशें वर्षांचा काळ लोटला तरी त्या पुण्यश्लोक राजकार्य-धुरंधर युगपुरुषाचें स्फूर्तिदायक गोड गुणगुंजन आबालवृद्धांच्या मुखीं अद्यापिहि चालूंच आहे. भारताच्या पारतंत्र्यांतहि दगडा-मातीचे किल्लेबुरुज बांधून त्यांच्या महाद्वारापर्यंत शिपायांच्या रांगा नीटनेटक्या थाटवून किल्ल्यावरच्या सदरेंत शिवाजी राजाला सिंहासनावर बसविल्याशिवाय किंवा तत्सदृश शिवकालीन अन्य ऐतिहासिक प्रसंगाची सजावट केल्याविना दिवाळीचा महोत्सव महाराष्ट्रांत लहानमोठ्यांनीं कधीं सुना जाऊं दिला नाहीं. दीपो-त्सवांत काय किंवा गणेशोत्सवांत काय, कुणी शाहिरांनीं त्यांच्या महान यशाचे पोवाडे गावेत; कुणी त्यांच्या नाट्यनाटिका खुलवा-व्यात, रंगवाव्यात; कुणी त्यांचे मनोहर व स्फूर्तिदायक चित्रपट बनवावेत, अशा एक ना दोन—अनेक प्रकारांनीं उभा महाराष्ट्र त्या सर्वगुणसंपन्न स्वराज्यसंस्थापकाचें नांव भारताच्या इति-हासांत अजरामर असल्याची साक्ष अद्यावत् देत आहे. अशा या थोर पुरुषावर इ. स. १६५९ मध्यें जें घनघोर संकट आलें आणि त्याचें जें निवारण त्यानें मोठ्या चातुर्यानें, सावधानतेनें व साहसानें केलें आणि विजापूरकराशीं अटीतटीचा सामना देऊन अवघ्या भरतखंडाचे नेत्र दिपविणारा विजय संपादन केला त्यालाच

महाराष्ट्राच्या इतिहासांत कोणी "स्वराज्याचें तोरण" म्हणतात; कोणी " शिवशाहीचा अरुणोदय " म्हणतात; तर कोणी " स्वराज्याची प्रभात " म्हणतात !

## शिवाजी-अफजल-प्रसंग

उपरिनिर्दिष्ट शिवाजी-अफजल-प्रसंग हा महाराष्ट्राच्या इतिहासांत एक बाका, अद्भुत व रोमांचकारी प्रसंग आहे. तो प्रसंग म्हणजे केवळ शिवाजीमहाराजांवरच नव्हे तर अखिल महाराष्ट्रावर व हिंदुधर्मावर तें एक प्रचंड गंडांतर आलेलें होतें. या गंडांतराच्या प्रसंगीं शिवाजीमहाराजांच्या अंगच्या अनेक अमोलिक गुणांची प्रचीति आपणांस पाहावयास मिळते. खरोखर या घनघोर अफजल-प्रसंगांत महाराजांच्या शौर्य-धैर्य गुणांची अथांगता आहे! यांत योग्य रणक्षेत्र बिनचूक निवडणाऱ्या रणधुरंधर सेनापतीच्या कौशल्याची पराकाष्ठा आहे! यांत परिपक्व बुद्धीच्या मुत्सद्याची अष्टपैलुता आहे! यांत प्रसंगावधानाची अपूर्वता आहे! यांत स्वदेशाच्या व स्वधर्माच्या अभिमानाची जाज्वल्यता आहे! यांत परधर्मविषयींहि परमसहिष्णुता आहे! यांत लोकसंग्राहक बुद्धीची कुशलता आहे! यांत शिस्तीची स्पृहणीयता आहे! यांत दुर्लभ योजकाच्या मार्मिक योजनांची विविधता आहे! यांत ध्येयवादी पुरुषाची अखंड निष्ठा व कर्मयोगिता आहे! यांत व्यवहारनीतीची श्रेष्ठता व चतुरस्रता आहे! यांत पवित्र महत्त्वाकांक्षेची परमोच्चता आहे! यांत आत्मविश्वासाची दृढता आहे! यांत हृदयाची विशालता आहे! यांत परोपकारितेची महनीयता आहे! यांत आत्मयज्ञाची सिद्धता आहे! यांत दैवाची अनुकूलता आहे! यांत भक्ताला पावणाऱ्या भगवंताच्या अधिष्ठानाची मंगलता आहे! यांत काळाच्या जबड्यांत उडी घेणारी महापुरुषाची

निधडी छाती आहे! आणि त्यांतून बाहेर निघण्यास लागणारी तडफ, शिताफी व चपळता तर अशी अद्भुतरम्य आहे कीं, पर्वताची लेखणी आणि समुद्राची शाई करून सृष्टींतील अनंत वृक्षलतांच्या पानापानावर त्यांच्या यशाचे पवाडे लिहिले तरी ती लेखनसामुग्री आणि लेखकाची शिदोरी अपुरी ठरावी!

## अफजल–प्रसंगाची संक्षिप्त कारणमालिका

अफजल-प्रसंगाची मुख्य कारणमालिका म्हटली म्हणजे– शहाजींच्या प्रभावामुळें व कर्नाटकांतील गुंतागुंतीच्या परिस्थितीमुळें शहाजीला कपटानें कैद करण्यांत आलें आणि म्हणून शिवाजी–संभाजी या बंधुद्वयाला तीव्र संताप येऊन त्यांनीं विलक्षण खळबळ केली व विशेषतः शिवाजीनें पुढें क्रमाक्रमानें पराक्रम करून एका पाठीमागून एक असे आदिलशाहीचे चाळीस किल्ले व प्रदेश घेतले. त्याचा विलक्षण परिणाम आदिलशहाच्या दरबारावर घडून शिवाजीला आटोक्यांत आणल्याशिवाय आतां घडगत लागणार नाहीं असें वाटल्यामुळें आदिलशहानें शिवाजीवर आपला अफजलखान नांवाचा प्रचंड सरदार घालीवजंग सैन्यासह पाठविला व त्यांत शिवाजी–अफजलखानभेटीचा वा संग्रामाचा रोमांचकारी प्रसंग घडून आला, अशी थोडक्यांत सांगतां येईल. सबब या निमित्तानें शहाजीच्या कैदेपासूनचा वृत्तान्त या घटनेची राजकीय पार्श्वभूमि लक्षांत यावी म्हणून खालीं देत आहोंत.

## शहाजीच्या कैदेचें कृष्ण–कारस्थान

निजामशाहीचा अंत झाल्यावरहि तिच्या पुनरुद्धाराचा प्रयत्न करण्याच्या नांवाखालीं पेमगडावर ऊर्फ भीमगडावर स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या ईर्ष्येनें पुढें पाऊल टाकणाऱ्या शहाजीला दुर्दैवानें अपयश येऊन शेवटीं त्याला आदिलशाहाच्या दरबारीं नोकरीस

राहावें लागलें. परंतु विजापूरच्या दरबारांत राहूनहि त्यानें बादशहाची नुसती खिदमत केली नाहीं तर स्वपराक्रमाच्या बळावर त्यानें आपला दरारा सर्वत्र बसविला. त्यानें सगळा कर्नाटक जिंकला. कावेरीपत्तनाचा जगदेव त्याला शरण आला ! मदुरेचा अजिंक्य राजा त्याच्या हुकुमाची तामिली करूं लागला ! म्हैसूरच्या राजानेंहि आपलें शिर नम्र करून त्याचें वर्चस्व कबूल केलें ! रणदुल्लाखानानें वीरभद्रापासून हिरावून घेतलेलें त्याचें सिंहासन त्याला शहाजीनें परत दिलें. दुसऱ्यास अतिशय दुःसह झालेला रणदुल्लाखान आदिलशहाचीं कार्यें शहाजीच्या सल्लामसलतीनें करूं लागला ! मुसलमानी मांडलिक राजेहि शहाजीच्या तंत्रानें वागूं लागले ! हीं शहाजीचीं प्रतापशल्यें आदिलशहाच्या डोळ्यांत सलूं लागलीं. किंबहुना हा शहाजी एवढा बलवान् झाला आहे कीं, तो मलाच सिंहासनावरून ढकलून देऊन आपण स्वतः त्यावर केव्हां बसेल त्याचा नेम नाहीं, या भीतीनें विजापूरचा बादशहा बेचैन झाला ! अशा वेळीं जिंजीचा वेढा बरेच दिवस रेंगाळत आलेला होता. त्या वेढ्याचे कामीं आदिलशहाचा बलाढ्य सरदार मुस्तुफाखान व शहाजी यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न झाला. त्यांच्या या बेबनावाचीं कारणें कोणतीं याची चर्चा करण्याचें स्थळ हें नव्हे. परंतु एवढें नमूद करण्यास हरकत नाहीं कीं, मदुरेचा त्रिमलनायक मोठा नांवाजलेला लढवय्या होता, तरी तो शहाजीच्या तंत्रानें वागूं लागला होता आणि त्रिमलाविषयीं आपलेपणाची भावना वागविणाऱ्या शहाजीला मुस्तुफानें केलेलें विश्वासघातकीपणाचें वर्तन पटणें शक्य नव्हतें. म्हणून पुढें जिंजीच्या वेढ्यांत भाग घेण्याचें शहाजीनें साफ नाकारलें. तो अनेक सबबी सांगून वेढा सोडून निघून जाईल, किंबहुना तो प्रतिपक्षाला जाऊन मिळेल कीं

काय, अशी धास्ती मुस्तुफाला वाटूं लागली. हिंदु-हिंदूंची झालेली जूट फोडण्यासाठीं शहाजीला कैद केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून त्यानें आदिलशहाचे संमतीनें व आज्ञेनें शहाजीच्या कैदेचें कृष्णकारस्थान रचलें !

इकडे जिंजीचा वेढा सोडून जातांना शहाजीनें मुस्तुफाखानाला निरोप पाठवून "माझ्या सैन्याला विश्रांतीची जरूरी आहे, यास्तव मला सैन्यासह जहागिरीकडे जाण्याची परवानगी मिळावी." अशी विनंति केली. त्यावेळीं नवाबानें उत्तर पाठविलें कीं, "यावेळीं तुम्हीं निघून जाल तर वेढ्याच्या कामांत व्यत्यय येईल, करितां तुम्हीं जाऊं नये." शहाजीनें पुन्हां दुसऱ्यांदा निरोप पाठविला कीं, "लष्करांत धान्याची अतिशय महागाई झाली आहे. त्यामुळें शिपायांना यापुढें उपासमार सहन होणार नाहीं व त्यांच्याकडून कामहि होणार नाहीं. त्याअर्थीं तुमच्या परवान्याची वाट न पहातां मी आमच्या प्रांताकडे निघून जातों." त्याप्रमाणें तो तिकडे तडक निघून गेला. अशा आशयाची हकीगत महमूद आदिलशहाच्या हुकुमावरून तयार झालेल्या महमदनाम्यांत आढळते. याप्रमाणें शहाजीचें प्रस्थ कर्नाटकांत बेसुमार वाढत चाललेलें पाहून त्याला कैद करण्यासाठीं मुस्तुफाची रवानगी कर्नाटकांत बंगरुळ मुक्कामीं मोठ्या सैन्यानिशीं करण्यांत आली, असें कवि परमानंदानें शिवभारतांत कथन केलें आहे.

मुस्तुफा आणि शहाजी हे एकमेकांना पूर्णपणें ओळखून होते. मुस्तुफा बंगरुळीं आल्यावर सामोपचारानें दोघेहि वागले. दोघांनींहि मित्रत्वाचा डौल घातला. समोरासमोर उभयतांनीं शिबिरें ठोकलीं. एका आसनावर दोघे बसले. एकमेकांनीं एकमेकांस आलिंगनें दिलीं;

भेटी प्रतिभेटी दिल्या. वस्त्रें, अलंकार वगैरे उंची उंची नजराणे दिले; संधि साधण्याचे उद्देशानें वारंवार सल्लामसलत विचारण्याच्या नांवाखालीं मुस्तुफानें शहाजीच्या शिबिराला यावें पण त्या छद्मी, छिद्रान्वेषी मुस्तुफाला शहाजी नित्य दक्ष व सुसज्ज आढळे. शहाजीहि त्याच्याकडे संशयानेंच पाहत होता. आणि एके दिवशीं तर स्पष्ट विचारण्याचा मोह शहाजीला अनावर होऊन त्यानें मुस्तुफाला विचारलें–"मुस्तुफाखान, एवढें सैन्य घालीवजंग माझ्याकडे घेऊन आला यांत खरा हेतू काय ? नवी मोहीम काढावयाची झाली तर माझी सल्ला घेतल्याशिवाय बादशहा कधीं राहिले नाहींत. मग काय प्रकार आहे हा ? मजविषयीं कांहीं पापविकल्प तर तुमच्या मनांत आतां आलेला नाहीं ना ? खरें सांगा."

"खचित नाहीं ! पाप यायचें काय कारण ? घोडा फिरविल्याशिवाय चलाख राहत नाहीं म्हणूनच केवळ हें घोडदळ इकडे तिकडे फिरवीत आहे. यापेक्षां अधिक कांहींच नाहीं." अशा अर्थाचें अगदीं वरपांगीं उडवाउडवीचें उत्तर मुस्तुफानें दिलें ! परंतु तेवढ्यानें समाधान पावणारा शहाजी नव्हता. मुस्तुफाचें इमान कसोटीवर घासून पाहण्यासाठीं शहाजीनें त्याला कुराणाची शपथ घातली. तीहि मुस्तुफाखानानें हातानें कुराण उचलून घेतली ! तेवढ्यावरहि शहाजीचें समाधान होईना. म्हणून त्यानें मुस्तुफाखानास त्याचा सर्वांत थोरला मुलगा जो आषतखान त्याच्या डोक्यावर हात ठेवून शपथ घेण्यास सांगितलें. तीहि मुस्तुफानें घेतली आणि शहाजीविषयीं कांहींहि कपट आपल्या मनांत नसल्याचा निर्वाळा त्या कपटपटु मुस्तुफानें शहाजीला दिला ! इतकें झाल्यावर मात्र शहाजी अर्थातच थोडाफार निर्धास्त झाला. त्या दिवशीं इकडे रात्रीं संगीतकलाप्रिय शहाजीनें बराच

वेळ नाचरंगांत घालविला आणि तिकडे त्याच रात्रीं मुस्तुफानें आपल्या हाताखालील सर्व लष्कराला बादशहाचा "शहाजीस कैद करा" असा हुकूम आला आहे, असें सांगून पहाटेस शहाजीच्या शिबिरावर घाला घालण्याचें कारस्थान रचलें! पहाट झाली. शहाजी व त्याचें शिबिर झोपीं गेलें होतें. ही संधि साधून मुस्तुफाच्या सैन्यानें शहाजीच्या बेसावध शिबिरावर त्याला पकडण्यासाठीं आकस्मिक हल्ला करून तें पार उध्वस्त करून टाकलें ! मोठ्याच चकमकी उडाल्या! शहाजीचा थोर इमानी लढवय्या सरदार खंडोजी पाटील लढाईंत ठार झाला ! स्वत: शहाजी उघड्या घोड्यावर बसून तलवार परजून लढूं लागला. कित्येक वीर त्यानें खतम् केले. पण एकटा कोठवर लढणार ? अंगावर भयंकर जखमा झाल्या ! रक्ताचीं कारंजीं अंगांतून फुटलीं ! देह पळसाच्या झाडाच्या लाल फुलांनीं फुलल्यासारखा झाला ! शेवटीं तो दमला आणि मूर्च्छा येऊन घोड्यावरून खालीं धरणीवर बेशुद्ध होऊन पडला ! तरीहि बाजी घोरपड्यानें त्या बेशुद्ध स्थितींतही त्याला दोरखंडांनीं बांधला. न जाणों, पुन्हां शुद्धीवर येऊन शेपांचशें वीर तो लोळवील अशी भीति त्याला वाटली असावी ! अशा रीतीनें त्याला बांधून, हत्तीवर घालून त्याच्याच आकांत करणाऱ्या लोकांसमोरून त्याला मिरवीत विजापुरला कैद करून आणलें ( शके १५७० कार्तिक मार्गशीर्ष ). यावेळीं त्याला बंदोबस्तांत आणण्यासाठीं त्या जंगी धिप्पाड सामर्थ्यशाली अफझलखानाचीच नेमणूक झाली होती आणि तोच त्याच्या शरिराचा मार्गावरचा ताबेदार ( Custodian ) होता. लढाईच्या रात्रीं शहाजीच्या शिबिरांत अनेक अपशकुन झाले ! भयंकर वादळ झालें ! उत्पातहि झाले ! ध्वज कडकड आवाज करून एकाएकीं मोडून पडले ! घोड्यांनीं

अश्रु ढाळले ! हत्तींनीं वारंवार करुण गर्जना केल्या ! गायींनीं आकस्मिक हंबरडे फोडले ! " शहाजी, तुला वेळ वाईट आहे "— असा अनेक प्रकारांनीं निसर्गानें इशारा दिला ! ज्याच्याशीं मध्यरात्रीं मुस्तुफाखानानें फार वेळ मसलत केली ते त्याचे सेनानायक स्वतःच्या शिबिरांत सज्ज होऊन राहिले आहेत, असें वृत्त हेरांनीं सांगितलें तरी तें ऐकूनहि बलाढ्य शहाजीनें तत्कालोचित सावधानता बाळगिली नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट आहे !

## शिवाजीची पितृमुक्ततेची प्रतिज्ञा

इकडे शिवाजीला आपल्या वडिलांना असें विश्वासघातकीपणानें पकडल्याबद्दल अतिशय संताप आला व वडिलांनीं राजनीतिशास्त्रांतील तत्त्वें बाजूस सारून शत्रूवर विश्वास ठेवल्याबद्दलहि त्यास सखेदाश्चर्य वाटलें. संतापानें आदिलशहा-महमुदशहाचा त्याबद्दल सूड घेण्याची व पितृमुक्ततेची त्यानें प्रतिज्ञा केली. " माझा थोरला भाऊ बंगरुळीं युद्ध करील आणि इकडे गडांचें रक्षण करीत शत्रूशीं मी स्वतः लढेन आणि अशा प्रकारें आम्हीं दोघे महमुदशहाचा पराभव करून वडिलांस कैदेंतून मुक्त करूं. " अशी शिवाजीनें मनांत निश्चयपूर्वक विचारसरणी आंखली. महमूदशहानेंहि शिरवळ व बेलसर येथें सैन्य पाठवून शिवाजीला पुढें हैराण करण्याचा घाट घातला. ताबडतोब शिवाजीनें कावजीच्या हाताखालीं सैन्य देऊन त्याला शिरवळवर पाठविलें. तटावर मारा करून व त्यास ठिकठिकाणीं खिंडारें पाडून कावजीनें बाळाजी हैबतरावाच्या सैन्यास गाठून बाळाजीला ठार मारिलें तेव्हां त्याचें सैन्य सुसाट पळून गेलें. बाळाजीचा असा फन्ना उडाल्याचें ऐकून फत्तेखान संतापानें बेभान झाला आणि तो पुरंदरावर शिवाजीशीं सामना देण्यासाठीं मुसेखान प्रभृति

बलाढ्य सरदारांसह पुरंदराचे गडापर्यंत गेला. या त्याच्या सैन्यावर गडावरून तोफा, बंदुकांचे गोळे, शिळा, दारूचे बाण, गोफणींतून भिरकावलेले दगडधोंडे यांचा भयंकर मारा शिवाजीच्या सैन्यानें केला व मग तें फत्तेखानाच्या सैन्यावर तुटून पडलें. प्रचंड युद्ध झालें. पुरंदराच्या तटावरून रक्ताची नदी उड्या टाकीत गेली! मुसेखान ठार झाला! फत्तेखानानें रणांगणांतून पळ काढला. त्याचे सारें सैन्य उधळून गेलें. ही शिरवळची चकमक शके १५७१ च्या वैशाखाच्या सुमारास झाली आणि त्यानंतर ज्येष्ठांत म्हणजे लौकरच शहाजीची सुटका झाली असें दिसतें.

शहाजीची सुटका होण्यास शिवाजी व संभाजी यांचा पराक्रम कारणीभूत झाला, अशी शिवभारतकाराची भूमिका आहे. त्यांतून ज्याचा शहाजीस कैद करण्याचा मुख्य डाव होता तो मुस्तुफाखान चंदीला मरण पावला. तेव्हां त्याच्या विरुद्ध पक्षानें शहाजीस मुक्त करण्याची सल्ला दिली नसेल, असें म्हणवत नाहीं. महमूदशहा हा तितकासा लढवय्या नव्हता. उलट टोलेजंग इमारती विजापुरांत उठवाव्यात आणि आरामांत व विलासांत दिवस घालवावेत अशा शांतताप्रिय व चैनी स्वभावाचा तो होता. तथापि संभाजीनें बंगरुळाकडे फरादखानाचा व शिवाजीनें पुरंदराकडे फत्तेखानाचा धुव्वा उडविला व शिवाजीनें पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले जिंकले, ही गोष्ट महंमुदशहाच्या मनाला फार झोंबली होती. म्हणून बंगरूळ शहर व सिंहगड किल्ला हे शहाजीनें मुलाकडून परत देववावेत म्हणजे त्याची सुटका करण्यांत येईल, अशी अपमानास्पद अट घातली. तेव्हां शिवाजीनें केवळ वडिलांच्या सुटकेकरितां मोठ्या कष्टानें सिंहगड बादशहाच्या स्वाधीन केला. शिवाजीच्या दांडगाईच्या कृत्याला शहाजीची अंतस्थ संमति होती असा संशय बादशहास

होता. तेव्हां वरील अट, बापलेकांना नामोहरम केलें असें नाटक जगाला दाखविण्यास, पुरेशी होती असें बादशहास वाटलेलें दिसतें. त्याप्रमाणें ती अट त्यानें घातली व शहाजी-शिवाजीनीं ती मोठ्या कष्टानें पुरी केली तेव्हां शहाजीची सुटका करण्यांत आली. तथापि शिवाजीला पुणें प्रांतीं व शहाजीला बंगरुळीं राहूं देण्यास बादशहानें परवानगी दिली. एवंच शहाजीच्या कैदेला शहाजीचेच वाढते पराक्रम व कर्नाटकांतील भानगडीची परिस्थिति मुख्यत्वें-करून कारणीभूत झाली व कैदेंत पडल्यानंतर शिवाजीनें बापाला सोडविण्यासाठीं तलवार उचलली. किल्ले शत्रूला दिले तरी हरकत नाहीं पण किल्ल्यांचा स्वामी मोकळा व अजिंक्य रहावा, शत्रूला यशस्वीपणें तोंड देण्यास पुरेसें सामर्थ्य संपादन केल्याशिवाय शत्रूला अधिक डिवचण्यांत शहाणपणा नाहीं, या सोनोपंत डबी-रांनीं सांगितलेल्या राजनीतीच्या धोरणास अनुसरून त्यांनीं ते किल्ले परत केले. शिवाजीनें अट पाळून अपमान गिळला तरी बापाच्या कैदेबद्दलचा सूडाग्नि त्याच्या अंतःकरणांत धुमसत होता. याच्या उलट दांडगावा करणाऱ्या शिवाजीविषयीं मनांत दंश धरून महंमूदशहा त्याचा कांटा केव्हां काढील याचा नेम नाहीं असा संशय शहाजीच्या मनांतही बळावूं लागला. तेव्हां शहाजीनें आपल्या मुलाच्या रक्षणासाठीं आपला अत्यंत पराक्रमी वजनदार व विश्वासू सरदार कान्होजी जेधे याला, कसल्याहि संकटकालीं स्वतःच्या जिवाची तमा न बाळगतां आधीं उडी घालून शिवाजी-च्या केसालाही धक्का लागू देणार नाहीं, अशी शपथ त्याच्याकडून इमानपुरस्कर बेलरोटींवर हात ठेवून घेववून पाठवून दिला. याप्रमाणें बापासाठीं मुलानें तलवार उचलली व मुलासाठीं बापानें

कान्होजीच्या रूपानें अभेद्य ढाल पाठवून दिली, असें हें तत्कालीन राजकीय चित्र रंगलेलें दिसतें!

## शूर शिवाजीचे विलक्षण पराक्रम

थोडा वेळ पड खाऊन शिवाजीमहाराजांनीं विलक्षण उचल खाल्ली. पुणें–सुपें प्रांतीं शहाची सत्ता नामधारीच होती. आपल्या जहागिरीच्या बंदोबस्ताचे नांवाखालीं तो प्रांत महाराजांनीं बळकावला. आणि त्या प्रांताच्या आसमंतांतील किल्लेही झपाट्यानें घेतले. त्याबद्दलचा जाब आदिलशहानें शिवाजीस विचारला. परंतु " राज्यांत पुंड व पाळेगार फार माजले असून ते प्रजेला छळत व गांजत आहेत, सबब त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं व सुरक्षिततेसाठीं किल्ले हाताखालीं घेतले, " असें उत्तर विजापूर दरबाराला त्यांनीं दिलें. आणि " मी तुमचा मांडलिकच आहे, शंका मुळींच धरूं नये. " अशा प्रकारचा त्यास निर्वाळा दिला. महंमुदशहा आजारी पडून मृत्युपंथाला लागला. कोंकणची व्यवस्था पाहणारा मुल्लाअहंमद बादशहाच्या हुकुमाप्रमाणें तांतडीनें विजापूरला गेला. फंदफितुरी आणि बंडाळी माजली. ही सुवर्ण-संधि साधून शिवाजीनें मुलूख मारणारी बंडाळी आरंभिली. महंमुदशहा मरण पावला, ही बातमी कानीं पडतांच शिवाजीला अधिकच अवसान भरलें. आणि देश–दुनिया काबीज करण्याचा उद्योग त्यानें फार जोमानें केला. विजापुरच्या दरबारला या शिवाजीच्या पराक्रमांचे भूकंपासारखे धक्के बसले. शिवाजीच्या विरुद्ध अनेक कागाळ्या विजापुरीं करण्यांत आल्या. कागाळ्या करण्यांत वाईचा सुभेदार अफजलखान हाहि होता. वाई, मिरज या बाजूला त्याची खाजगी जहागिरी पसरली होती आणि त्याच प्रांतांत शिवाजीनें चांगलाच धुमाकूळ घातला होता. तो

खानाचा भाग शिवाजीनें घेतलेल्या प्रांताच्या सरहद्दीलगतचा असल्यानें तोहि काबीज करणें सुरक्षिततेच्या दृष्टीनें आवश्यकच होतें. सबब त्यांनीं त्या भागांतील गडकिल्लेदारांना व देशमुख-देशपांड्यांना वळविलें व त्यांच्यांत स्वराज्याची भावना चेतविली. त्याचा परिणाम खानाच्या व विजापुरच्या दरबारच्या जमाबंदीला मोठी झळ लागण्यांत झाला. त्यांचा वसूल नीट होईनासा झाला. सबब शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठीं व जुळल्यास त्याला जिवंतपणीं पकडून आणण्यासाठीं किंवा त्याचा निःपात करण्यासाठीं आदिलशहानें बाजी शामराज नांवाचा एक प्रचंड सरदार दहा हजार फौजेनिशीं शिवाजीवर पाठविला. बाजी आणि चंद्र-राव मोरे हे दोघे पारघाटांत शिवाजीवर चालून जाण्यासाठीं गुप-चूप टपून बसले होते. शिवाजी त्यावेळीं महाडकडे होता. त्यास ही गोष्ट कळतांच त्यानेंहि अत्यंत गुप्त रीतीनें आपल्या हाल-चालींची यत्किंचितही कल्पना कोणास न देतां अगदीं अचानक-पणें व वायुवेगानें त्यांच्या सैन्यावर बहिरी ससाण्यासारखी झडप घातली आणि त्यांना एका सपाट्यांत नेस्तनाबूत केलें. बाजी शामराजासारख्या महायोद्ध्याला सह्याद्रीच्या सिंहानें असे खडे चारलेले पाहून विजापुरशाहीचें धाबें दणाणलें. बाजीला त्यावेळीं मदत करणारा जावळीचा चंद्रराव मोरे हा आपण आदिलशहाचा मांडलिक म्हणून बाह्यात्कारीं दाखवीत असला तरी तो वस्तुतः स्वतंत्रपणें वागत होता. शिवाजीचा तो शेजारीच होता. तेव्हां तसला स्वराज्यकंटक कुशींत बाळगून स्वराज्यसाधन होणार नाहीं हें जाणून शिवाजीमहाराजांनीं तो स्वराज्याच्या वाटेंतला कांटा साफ काढून टाकला. स्वतःला बारारावांचा काळ म्हणविणाऱ्या चंद्रराव मोऱ्याला महाराजांनीं धुळीला मिळविलें आणि आकस्मिक छापा

घालून स्वराज्याची गुरुकिल्ली असलेली जावळी १६५५ मध्यें जिंकली. दिल्लीकर भाऊबंदकीच्या युद्धांत गुंतलेले तर विजापुरांतील मुत्सद्दी एकमेकांच्या उरावर बसण्याची कसरत करण्यांत गुंतलेले ! अशी परिस्थिति प्राप्त झाली. मुल्लामहंमद विजापुरचा सूत्रधार झाला आणि अफजलखान त्याचेशीं सहमत म्हणून त्यालाहि महत्त्वाचें पद प्राप्त झालें. अफजलखानाचें वजन कमी करण्यासाठीं शिवाजीमहाराजांनीं कर्नाटक प्रांतीं सन १६५८ मध्यें स्वारी केली आणि कृष्णाकांठापर्यंत त्यांनीं लुटालूट केली. तात्पर्य, वर लिहिल्याप्रमाणें शिवाजीनें झपाट्यानें किल्ल्यापाठीमागें किल्ले असे चाळीस किल्ले घेतले. आज मुरुंबदेवावर निशाण फडकाविलें; उद्यां कोंडाणा चळकाविला तर परवां पुरंदर गड काबीज केला, असा शिवाजी सारखा वाढत चालला. त्यानें राजगडाला राजधानीचें स्वरूप आणलें. तेव्हां आदिलशाहीकडून शिवाजीचा हर प्रयत्न करून पराभव करून त्याची सत्ता निर्मूळ करावी आणि त्याचे निसबतीचे लोकांस आश्रय न देतां ठार मारावें अशा अर्थाचे सख्त हुकूम सुटले. ( पत्रसार संग्रह ७७४ ).

जुना अज्ञानदास शाहीर म्हणतो :--

देश दुनिया काबिज केली । बारा माऊळें घेतलीं ॥
चंद्रराव कैद केला । त्याची गडजाउली घेतली ॥
चेत पाउली काबीज केली । ठाणीं राजाचीं बैसलीं ॥
घेतली जाउलि न् माहुली । कल्याण भिवंडी काबिज केली ॥
सोडविलें तळकोंकण । चेऊलीं ठाणीं बैसविलीं ॥
कुबल, बांकी घरें । शिवरायाच्या हातीं आलीं ॥
मुलाना हामाद । फिर्याद बाच्छायाप गेली ॥

बाच्छायजादी क्रोधा आली । जैशी अग्न परजळली ॥
जित धरावा राजाला । कुल वजिरांला खबर दिली ॥ ५ ॥

अशी शिवाजीची दंगल सारखी वाढत चालली हें ऐकून पुढें त्याचेवर अफजलखानाची रवानगी करण्यांत आली हें सर्वश्रुतच आहे.

## आदिलशहानें दरबार बोलाविला

अशा यावेळीं महमुदशहाचा वारस म्हणविणारा १८ वर्षांचा अज्ञान मुलगा अलीआदिलशहा हा गादीवर आला होता. परंतु तो अज्ञान असल्यामुळें त्याच्यातर्फे त्याची महाकारस्थानी आई बडीसाहेबीण ही राज्याची व्यवस्था खवासखानामार्फत पाहत होती. हिला इंग्रज तत्कालीन पत्रांत ‘ दख्खनची राणी ’ ( Rani of the Deccan ) म्हणत. सारांश विजापुराच्या राज्यांत त्यावेळीं बालनायकी आणि स्त्रीनायकी झाली होती. पण शिवाजीची वाढती सत्ता नामशेष करणें विजापुरशाहीला अपरिहार्य झालें होतें. शहाजीला आपल्या पुंड पुत्राचा बंदोबस्त करण्यास पूर्वी सांगितलें असतां “ शिवाजी आपला पुत्र, परंतु आपणाजवळून पळून गेला. तो आपल्या हुकुमांत वागत नाहीं. आपण तो पाद-शहाशीं रुजुवात एकनिष्ठेनें आहोंत. शिवाजी आपला पुत्र याजवरी हल्ला करावा. मन मानेल तें करावें. आपण दरम्यान येत नाहीं. ” असें उत्तर त्यानेंहि दिलेलें होतें. तेव्हां स्वारीशिवाय आतां दुसरा मार्ग राहिला नाहीं. यामुळें विजापुर दरबारनें आपल्या अनेक प्रख्यात मुत्सद्यांना व सेनापतींना या समयीं पाचारण केलें. त्यांत अफजलखानही होता. विचारविनिमयार्थ विजापुर दरबारनें युद्धमंडळ तांतडीनें बसविलें. विजापुरचा कार-भार पाहणारा दिवाण खवासखान शिवाजीच्या विरुद्धच होता.

शेवटीं मसलत ठरली आणि शिवाजीचा कायमचा बंदोबस्त वा नायनाट करण्यासाठीं मोहीम तावडतोब सुरू करावी असा अखेरचा निर्णय त्या युद्धमंडळानें घेतला.

## मोहिमेचा नेता अफजलखान पैजेचा विडा उचलतो

या मोहिमेचें नेतृत्व कोणाला द्यावें असा प्रश्न अर्थातच उभा राहिला. तेव्हां त्याची भवति न भवति होऊन तें अफजलखानास द्यावें असें ठरलें. दुसरा कोणी सरदार तें पत्करण्यास सहजासहजीं राजी होईना असें दिसून आलें. सभासद आपल्या बखरींत म्हणतो—

" त्याजवरून बडीसाहेबीण हिनें कुलवजीर उमराव आदिलशाही बोलावून आणून शिवाजीराजीयावर रवाना करावे म्हणोन पुसता कोणी कबूल केलें नाहीं."

शेवटीं अली आदिलशहानें भर दरबारांत अफजलखानाला उद्देशून अत्यंत गौरवपर आणि प्रोत्साहनपर असें भाषण केलें. शिवाजीमहाराजांच्या पदरीं असलेल्या परमानंद कवीनें आपल्या शिवभारतांत या आदिलशहाच्या भाषणप्रसंगाचें मोठें काव्यमय व रसभरित वर्णन केलें आहे. त्याचा सारांश असा :—

" अफजलखाना! या प्रचंड सैनिकसंचयांत तूं आमचा हितकर्ता आहेस. एवढा भयंकर कीं, जणू दुसरा काळिकाळच! अनेक रामराजवंशांतील राजांना तूं युद्धांत जिंकलेंस! तुझ्या प्रतापामुळें श्रीरंगपट्टणचा राजा समरविरक्त झाला! कर्णपूरच्या राजाला तूंच आपल्या पराक्रमाचे जोरावर एका क्षणांत आपल्या मुठींत आणलेंस! मदुरा नगरी उध्वस्त केलीस. कांची जिंकून कांचन लुटून आणलेंस. ज्याच्या राज्यलक्ष्मीला तूं आपली बटीक बनविलीस तो वेदनूरचा वीरभद्र राजा आपलीं छत्रचामरें विसरून

गेला ! सिंहललंकेचे राजे मला भितात आणि समुद्र माझी सेवा करतो हें तुझ्याच पराक्रमाचें फळ आहे ! तुझ्या पराक्रमाचे वारे अंगावरून गेले म्हणजे डोंगर डळमळतात ! सप्तद्वीपें खचतात. तुझ्या पराक्रमामुळें दिल्लीश्वराला निद्रा येत नाहीं ! असा प्रचंड महावीर तूं असतांना शहाजीचा तो उद्धट बेटा शिवाजी माझा अहर्निश द्रोह करतो आणि माझ्या प्रदेशावर अचानक छापे घालून आक्रमण करतो व माझा अंमलहि मानीत नाहीं ! तो हळूहळू पाऊलें पुढें टाकीत माझें राज्यहि हिसकावून घेऊन गिळंकृत करील कीं काय याची भीति वाटूं लागली आहे ! त्याच्यावर मी वीरावर वीर पाठविले परंतु त्यांची व त्याची गांठ पडल्यावर ते पुन्हां परत आले नाहींत. गेले ते कायमचेच गेले ! अशा स्थितींत तुझ्याशिवाय त्याला जिंकणारा दुसरा शूर वीर मला दिसत नाहीं. तेव्हां तूंच त्याला जिवंत ग्रहाप्रमाणें पकडून आण. " असें अल्ली आदिलशहाचें भाषण झालें. यांतील काव्य आपण क्षणभर बाजूस सारलें तरी एकंदर भाषणावरून अफजलखान हा केवढा प्रचंड सामर्थ्यशाली व प्रतापी सरदार होता व त्यास विजापूरचा दरबार कसा व किती मानीत होता हें सहज दिसून येणार आहे. म्हणून त्याचा सारांश येथें मुद्दाम दिला आहे. अल्ली आदिलशहाचें भाषण झाल्यावर मुळांत गर्विष्ठ असलेला अफजलखान या स्तुतिमदिरेच्या अंमलांत गर्वभरानें अगदीं डोलूं लागला ! त्यानें डोळे विस्फारून दरबाराकडे पाहिलें. मांडलेला पैजेचा विडा उचलला आणि " शिवाजी काय, चढे घोड्यानिशीं जिवंत कैद करून घेऊन येतों. " असें म्हणून एकदम गरजला ! बादशहाला त्यानें मुजरा केला आणि बादशहानें दिलेले नजराणे व सत्कार स्वीकारून मोठ्या डौलानें दरबारांतून तो बाहेर पडला !

अफजुलखानाविषयीं येथें दोन शब्द लिहिणें उचित होईल. " भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश " विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनीं लिहिलेला आहे. त्यांत ते म्हणतात कीं,— " त्याला अबदुल्ला भटारी म्हणत. हा अदिलशहाचा दासीपुत्र असावा असें वाई येथें सांपडलेल्या हुकुमनाम्यांत आढळतें. याच्या बापाकडे अदिलशहाच्या मुदपाकखान्यावरील देखरेखीचें काम होतें म्हणून यास भटारी असें संबोधितात. " हा चांगला धिप्पाड पुरुष असून त्याच्या मांडीखालीं धिप्पाड घोडासुद्धां टिकत नसे. म्हणून बहुशः तो हत्तीवरून अथवा बारा भोयांच्या पालखींतून जात असे. हा अत्यंत मातबर सरदार महमुद अदिलशहाचे कारकीर्दींत उदयास आला. रणदुल्लाखान इ. स. १६४४ मध्यें वारल्यानंतर वाईची सुभेदारी खानास मिळाली. हा " शिवाजीला उंदरासारखा पकडतो " अशी नेहमीच बढाई मारीत असे. याचा उल्लेख " **अफजलखान महमदशाही** " असा अलीअदिलशहानें कान्होजी जेधे यांस ता. १६ जून १६५९ रोजीं लिहिलेल्या पत्रांत केला आहे.

मोहिमेवर जातेवेळीं रत्नखचित खोगीर असलेले उंट व घोडे, सुंदर साज घातलेले भद्र जातीचे हत्ती, नाना प्रकारचीं चिलखतें, शस्त्रें व शिरस्त्राणें, सुंदर पालख्या व सोन्याचांदीचे पलंग, रत्नांचीं शिरोभूषणें, मोत्यांच्या माळा, हिऱ्यांचीं बाहुभूषणें, रत्नजडित आंगठ्या, परदेशीं तयार झालेले अनेक उत्कृष्ट पदार्थ, तस्ते, पानसुपारीचे डबे आणि कोट्यवधि खजिना, अलिअदिलशाहापासून अफजलखानास मिळाला. अलिशहानें रत्नजडित म्यानांत ठेविलेली, आपल्या हातांत असलेली आपली स्वतःची कट्यार

अफजलखानाच्या कमरपट्टयांत स्वतः अडकविली आणि त्याला या मोहिमेचे मुख्य सेनापति नेमून व इतर सेनापतींनां त्यास सहाय्य देण्याची आज्ञा करून त्याला प्रेमानें व थाटानें निरोप दिला. बडीसाहेबीणीनें शिवाजीपुढें मित्रत्वाचा बाह्यांगीं डौल दाखवून त्याचा काटा काढण्याचा कानमंत्रही खानाला दिला. ( इंग्लिश फॅक्टरी रेकार्डस ). मावळच्या देशमुखांना उद्देशून बादशहानें काढलेली अस्सल फर्मानें आतां उपलब्ध झालीं असल्यानें या मोहिमेचा हेतु शिवाजीचा निःपात करावा हाच होता यांत संशय राहिलेला नाहीं. अफजल प्रसंगानंतर एकच महिन्यांत म्हणजे ता. १०–१२–१६५९ रोजीं राजापूर येथील इंग्रज व्यापारी सुरतेंतील आपल्या अधिकाऱ्याला लिहितांना जें म्हणतात त्यांतील लागूपुरता मजकूर खालीलप्रमाणें आहे. " Against whom ( Shivaji ) the Queen this year sent Abdoolah Khan with an army of 10,000 horse and foot, and because she knew, with that strength, he was not able to resist Shivaji she counselled him to pretend friendship with his army which he ( Abdoolah Khan i-e Afzal Khan ) did. "

या उताऱ्यावरूनही खानानें पुढें शिवाजीशीं केलेला मित्रत्वाचा बहाणा पूर्वसंकल्पित व केवळ वरपांगीपणाचा होता व पुढें तहाचें बोलणें खानानें प्रथम त्याच हेतूनें सुरू केलें असें म्हणणें प्राप्त आहे.

## मोहिमेची तयारी–खानाबरोबर सैन्य किती होते ?

खानाबरोबर पाठवावयाच्या फौजेची तयारी जोरानें सुरू झाली. सैन्याच्या कमरबंदीचे हुकूम सुटले. ठिकठिकाणच्या लष्करी छावण्यांतील अधिकाऱ्यांना फौजबंद होऊन ठरल्यावेळीं

 नगर वाचनालय सातारा संगणकीकृत 

ठरल्याठिकाणीं खानास येऊन मिळण्याचेही हुकूम सुटले. भरपूर युद्धसामुग्री व दारूगोळा बरोबर घेण्याची तजवीज केली. तीन वर्षें पुरेल इतका दाणागोटा बरोबर घेऊन तो निघाला. ( शाळीग्राम ऑक्वर्थ ऐतिहासिक पोवाडे. ) खानानें आपल्याबरोबर या मोहिमेंत जें सैन्यबळ घेतलें त्याबाबतचा तपशील वेगवेगळ्या ग्रंथांतून वेगवेगळा आढळतो तो खालीलप्रमाणें:—

१ वर उल्लेखिलेल्या ता. १०-१२-१६५९ च्या इंग्रजी पत्रांत घोडदळ व पायदळ मिळून एकूण दहा हजार सैन्य होतें असें नमूद केलें आहे.

२ तरीख–इ–अली ( भाग २–७६ ) यांत वरील प्रमाणेंच मजकूर आहे.

३ शिवाजी प्रताप ( पान ७८ ), रायरी बखर ( पान ११ ), एक्याण्णव कलमी बखर, तरीख–इ–शिवाजी हे ग्रंथ बारा हजार सैन्य देतात.

४ सभासद बखरींत १२००० लष्कर व बंदुकी, आराबियाच्या गाड्या,[१] हत्ती, सुतारनाल्याच्या गाड्या[२] असा उल्लेख आहे. ( पान ८ )

५ चिटणीस बखरींत ३०,००० सैन्याचा आंकडा दिला आहे. ( पान ५४ )

६ कॅ. मोडक यांनीं आपल्या "प्रतापगडचें युद्ध" या पुस्तकांत जी माहिती दिली आहे ती अशी—

विजापुराहून खान निघाला त्यावेळीं:—१२,००० घोडदळ, १०,००० पायदळ, ८०-९० मोठ्या तोफा, ३००-४००

टीप—(१) आराबा=तोफखाना. (२) सुतारनाला=उंटावरील अग्नियंत्रें.

लहान तोफा, मोठ्या तोफखान्याकडील हजार बाराशे खलाशी; व वाई येथें आल्यावेळीं--३५००० लष्कर. कॅ. मोडक यांनीं ही माहिती इतिहास संशोधन—ऐतिहासिक स्फुटलेख—भाग २-६४ या आधारान्वयें दिलेली दिसते. असें लष्करी बळ बरोबर घेऊन खान मोहिमेवर सुमारे वैशाख १५८१ म्हणजे १६५९ च्या एप्रील महिन्यांचे अखेरीच्या सुमारास निघाला.

बादशहाच्या आज्ञेनुसार खानाला अनेक प्रचंड सरदार व त्यांचे सैन्य येऊन मिळाले. शबर दैत्यासारखा अंबर, प्रतापी याकुत, महामानी मुसेखान, निरंकुश गजराजाप्रमाणें स्वैरगति असलेला अंकुशखान. घोरकर्मे घोरपडे, महापराक्रमी घाटगे व काटे, असे एकना दोन शेंकडो राजे व सामंत चतुरंग सेनेसह अफजलखानाच्या सैन्यांत दाखल झाले. जावळीचा चंद्रराव मोरे हा त्याचे आप्तअमात्यासह मारला गेल्यावर त्याचा, त्या दंगलींत निसटून गेलेला व विजापुरच्या दरबारीं आश्रयासाठीं जाऊन राहिलेला, व " माझ्या भावाला मारणाऱ्या शिवाजीचा नायनाट करा, मला चंद्ररावाचें पद मिळवून द्या, जंगलांची व किल्यांची मला पूर्ण माहिती आहे व मी हरएक प्रकारची मदत तुम्हाला करीन " अशा प्रकारची चिथावणी शिवाजीविरुद्ध विजापूर दरबारला देणारा व " चंद्ररावाचे राज्य शिवाजीपासून हिसकावून घेऊन तुला खात्रीनें देईन " असें वचन अदिलशहापासून घेतलेला, भाऊ प्रतापराव मोरे हाही खानाच्या मोहिमेंत सामील झाला. याप्रमाणें खानाची जंगी मोहिम निघाली.

## विजापूर ते वाई खानाचें कूच

### अपशकून

ज्योतीष्यानें सांगितलेल्या सुमुहूर्तावर खान मोहीमेवर निघाला. परंतु विजापुराहून निघतानां खानाच्या कणखर मनानेंही कच खावी असे अपशकून त्याला घडले ! स्वारीवर निघतांना खानानें आपल्या अवलिया गुरुचें दर्शन घ्यावें व त्याचे आशीर्वाद घेऊन मग पुढें जावें असें ठरविलें. त्याप्रमाणें तो गुरुदर्शनास गेला असतां गुरूनें " तुला यांत यश मिळणार नाहीं " असे उद्‌गार काढले ! शेडगांवकरानीं आपल्या बखरींत या गुरुभेटींत, गुरुला खानाचें फक्त धडच दिसलें मस्तक दिसलें नाहीं, असें अशुभ दृश्य वर्णन केलें आहे ! " The officiating priest recoiled in horror, from him crying out that he had no head upon his shoulders, only a gaping hollow and a bleeding trunk " ( किंकेड ) याचा खानाच्या मनावर थोडाफार परिणाम झाल्याशिवाय कसा राहिला असेल ? या मोहिमेंत यश आलें नाहीं आणि जिवाचें बरेवाईट झालें तर आपल्या मागें आपल्या जनानखान्यांतील बिब्यांची दुरवस्था होऊं नये म्हणून त्यानें आपल्या ६३ बिब्यांचीं मुंडकीं (अॅव्रेक्यारे २०० म्हणतो) आपण आपल्या स्वतःच्या तलवारीनें छाटून टाकलीं. कोणी त्यांना त्यानें विहिरींत बुडवून मारलें असें म्हणतात! खानाचे राहतें गांव तोरवे होते. त्या गांवीं त्यांचीं थडगीं आहेत. विजापुरापासून हें गांव सुमारे दीड कोस दूर आहे. हिंमत धरून खान पुढें निघाला तोंच त्याचा निशाणाचा आवडता हत्ती वेडा होऊन मेला. (शिवदिग्विजय पान १६५, अगिनदासाचा पोवाडा चौक ८). डाव्याडाव्या

बाजूनें जाणाऱ्या कावळ्यांनीं पंख फडफडवून पुन्हांपुन्हां मोठ-मोठ्यानें कर्कश ओरडावें, दिशा धुंद होऊन भर दुपारीं सूर्य खळ्यांत सांपडल्यासारखा होऊन अस्पष्ट दिसूं लागावा, अंतरिक्ष जणूं काय पेटलें आहें असें दिसावें, सोसाट्याचा वारा उलटा-सुलटा वाहूं लागावा व खानाचा ध्वजही भंगावा अशीं एकना दोन अनेक प्रकारचीं दुःश्चिन्हें डोळ्यासमोर घडत असलेलीं पाहूनहि त्या युद्धाभिमानी, शौर्यश्रीनें शोभणाऱ्या, भोसले राजाला अचानकपणें जिंकूं पाहणाऱ्या बेडर अफजलखानानें आपला युद्धोत्साह लवमात्र ढळूं दिला नाहीं! आणि तसाच तो झपाट्यानें वाईप्रांतीं येऊन दाखल झाला व तेथें त्यानें आपल्या प्रचंड सैन्याचा तळ ठोकला. याप्रमाणें शाळिग्राम आक्वर्थ पोवाडे चौक ९ यांत उल्लेखिल्याप्रमाणें खान विजापुराहून १६५९ च्या एप्रिल अखेरीच्या सुमारास निघाल्यानंतर वाईप्रांतीं आषाढ शके १५८१ मध्यें येऊन पोहोंचला असें कांहीं लेखकांचे मत आहे.

## वाईतळ-हालचालींचें केंद्र

वाई हें ठिकाण खानाच्या आघाडीची कोठीच होती. विजापूर दरबाराचें तें जसें सुभायतीचें तसेंच अदिलशाही फौजेचें तें सरहद्दीवरील एक लष्करी ठाणें होतें. खान हा वाईचा १०-१२ वर्षें सुभेदार होता. आणि त्याचा बारुदखानाही वाईलाच होता. सैन्याला भरपूर रसद पोचविणारीं धान्याचीं कोठारेंही तेथेंच ठेविलीं होतीं. विजापुर ते वाई हा रसदमार्ग त्यानें सुरक्षित ठेवला होता. खान हा नुसता आडदांड सरदार नव्हता. तो चतुर सेनापती व मुत्सद्दीही होता. ही मोहीम लांबलीच तर दळणवळणाचे मार्ग बरसातीचे दिवसांतही अखंडितपणें चालूं

रहावेत व सैन्याला आणखी लागेल तशी व तितकी रसद विजापुराहूनही पुरविता यावी म्हणून भीमा-डोण नद्यांचे उतार व इतर लहान मोठे ओढेनाले यांचे उतार काळजीपूर्वक लक्षांत घेऊन तेथें पाऊसकाळांतही ऐलपैल जाणेयेणेची सोय त्यानें होड्या घेऊन तयार करून ठेविली. या होड्याबद्दलची हकीगत अशी सांगतात कीं, संगमेश्वरी राहणाऱ्या एका देशकुलकर्ण्याचा तिमाजीपंत हेळवांककर या नांवाचा एक गुमास्ता खानाला यावेळीं वाई येथें येउन भेटला. त्याचा मालक निपुत्रिक मेलेला होता व त्याची पत्नीही वृद्ध झालेली होती. अशा स्थितींत तें देशकुलकर्ण्याचें वतन आपणच उपटावें या लोभानें त्या तिमाजीनें कासी दियानतराव नांवाच्या एका बड्या विजापुरी मुलकी अधिकाऱ्याच्या शिफारशीनें खानाची भेट घेतली. त्यांने एक काम केल्यास तें वतन त्याला दिल्याबद्दल बादशाही फर्मान देतो असें त्यास खानानें आश्वासन दिलें आणि तें काम म्हणजे संगमेश्वर भागांतून तीनशें नांवा विजापूर ते वाई या मार्गांतील नद्या ओढे यांच्या खान सांगेल त्या उतारांच्या ठिकाणां दळणवळण सुरक्षित ठेवण्यासाठीं ठेवावयाच्या हें होय. तें काम तिमाजीनें करण्याचें कबूल केलें व त्याबद्दल खानानें त्यांस तत्काल तें देशकुलकर्ण्याचें वतन दिल्याबद्दलचे फर्मान देऊन टाकलें. अशा प्रकारचीं कामें सैन्याच्या हालचाली चालू असतांना जागच्याजागीं करतां यावींत, त्याला वेळ लागूं नये, म्हणून खानानें बादशाही फर्मानांची डौलें ( सहीशिक्याचे कोरे कागद ) आपल्या बरोबर विजापुराहून निघतेवेळींच घेतलीं होतीं. या गोष्टीसंबंधीचा उल्लेख भारत इतिहास सं. मंडळाच्या द्वितीय संमेलनवृत्तांतांत आढळतो. (कॅ. मोडक)

## पुण्याचा रस्ता बदलून खान वाईस कां, कसा व केव्हां आला ?

खानानें ज्यावेळीं विजापुराहून प्रथम प्रयाण केलें त्यावेळीं शिवाजीमहाराज पुणे राजगड या बाजूला होते. आणि त्यानांच पकडणें हें खानाचें मुख्य उद्दिष्ट होतें. म्हणून खानानें सहजच प्रथम पंढरपुर–पुणे मार्गानें कूच केलें होतें. परंतु खान पंढरपूरीं आला तेव्हां महाराज राजगड सोडून प्रतापगडीं येऊन दाखल झाले आहेत असें त्यास गुप्त हेराकरवीं कळलें. तेव्हां त्यानें आपला मोर्चा लगेच बदलला आणि प्रतापगडास जाणेकारितां म्हसवड, दहीवडी, शिंगणापूर, मलवडी, रहिमतपूर, सातारा, वाई असा मार्ग पत्करला असें दिसतें. मल्हार रामराव चिटणीस यांनीं लिहिलेल्या बखरींत ( पान ५४ ), शिवदिग्विजय ( पान १५८ ), व शाळीग्राम व आक्वर्थ ऐतिहासिक पोवाडे, ( चौक १०-१२ ) या ग्रंथांतून या नव्या बदललेल्या मार्गाचा वृत्तांत सांपडतो. खान पंढरपुराहून वाईस तेरावे दिवशीं आला ( इ. सं. ऐ. स्फुटलेख भाग २-६५ ). खान हा मार्गावर असतांना शिवाजीविषयीं तो गुप्त बातमी वारंवार काढीत होता हें स्पष्ट आहे. असेंहि वाटतें कीं सेनापतीच्या धोरणाप्रमाणें त्यानें प्रायः प्रथम तुळजापुरावरून पुण्याकडे जाण्याची हूल दाखवून, पंढरपुराकडे एकदम वळून वाईकडे कूच केलें असावे.

या मोहीमेंत असतांना अफजलखानानें शिवाजीच्या मुलुखावर आपले पराक्रमी सरदार ठिकठिकाणीं पाठविलें होते. जाधवानें सुपे, पांढऱ्यानें शिरवळ, खराट्यानें सासवड, हिलालानें पुण्याकडील कांहीं भाग, हबशी सैफखानानें मराठ्यांनीं व्यापलेल्या तळ कोंकणपैकीं कांहीं मुलुख अशीं शिवाजीचीं ठाणीं जिंकलीं.

Cl. No. CC538

(शि. भा. २३ (११-१२), राजवाडेखंड २० ते ४७) शिवाजीचा घोडदळाचा सेनापति नेताजी हा त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं दौडमारीत असतां त्यास शिवाजीनें त्वरित कळविलें कीं तह करण्याच्या इच्छेनें खान जावळीस येत आहे सबब तहाचा निर्णय होईपर्यंत खानाच्या सैनिकांशीं तिकडे युद्ध करूं नये, मात्र युद्धासाठीं सज्ज रहावें. यामुळें नेताजीनें तिकडे प्रत्यक्ष युद्ध केलें नाहीं. खानाचा हेतु आपले सरदार ठिकठिकाणीं वेगवेगळ्या दिशास पाठवून शिवाजीस चोहींकडून पेंचांत आणून मग तह करण्यास भाग पाडावें किंवा शेवटीं त्याच्यावर हल्ला करावा असा त्याचा आधींचा विचार असावा.

जेधे शकावलींत शिवाजीमहाराज प्रतापगडावर श्रावणांत (जुलैमध्यें) आले असें म्हटलें आहे. खान वाईस नक्की केव्हां आला याचा निश्चित उल्लेख जुन्या ग्रंथांत आढळत नाहीं. खानास जाऊन मिळण्याबद्दलचें अदिलशहानें कान्होजे जेधे यास पाठविलेलें फर्मान तारीख १६ जून १६५९ चें आहे. कान्होजी आपणाकडे येत नाहीं असें समजल्यावर खानानें त्यास पुनः कौल देऊन बोलाविलें. त्याची तारीख ३० सप्टेंबर आहे. तेरदळकडील कृष्णगौडा यास खानानें जें खुर्दखत दिलें आहे तें तारीख ७ सप्टेंबरचें आहे. हें खान वाईस आल्यानंतर दिलें असल्याचा संभव आहे. तो जर बरोबर असेल तर खान वाईस ऑगष्टमध्यें आला असावा असें कांहीं लेखक अनुमान काढतात. या तर्कास महाराज प्रतापगडास आल्याचें कळल्यावर तो वाईकडे वळला असें जें चिटणीस म्हणतो त्याचा पाठिंबा मिळतो.

वाई गांवच्या दक्षिण अंगानें कृष्णानदी अगदीं चिकटून गेली आहे. व प्रतापगडापासून जवळ म्हणून व लष्करीदृष्ट्या व मुत्सद्दे-

गिरीचे दृष्टीनेंही सैन्याचें एकीकरण व हालचाली करण्यास वाई हें ठाणें सोयीस्कर व बळकट म्हणून त्यानें अखेरचा तळ तेथेंच दिला. शिवाय चंद्रराव मोऱ्याला व त्याच्या सर्व सहाय्यकर्त्यांना शिवाजीनें ठार मारल्यामुळें त्याच्या भीतीनें आश्रयासाठीं विजापुरशहाकडे पळून गेलेल्या त्याच्या भावाला म्हणजे प्रतापराव मोरे यास जावळी परत घेऊन देण्याचें वचनही अदिलशहानें दिलें होतें. तेव्हां जावळी घेण्याचें व मुख्य उद्दिष्ट साधण्याचें दृष्टीनेंही वाईला आपलें लष्कर जमवून तेथेंच खानानें तळ देणें युक्त होतें. पुढें कांहीं दिवसांनीं वाईपासून प्रतापगडाच्या रोखानें जवळ जवळ महाबळेश्वरापर्यंत त्यानें आपली फौज पसरविली. कृष्णा नदी उजव्या बगलेस पण थोडीशी पिछाडीस टाकून प्रतापगडाकडे तोंड करून त्यानें हा तळ ठोकला होता. त्याचा स्वतःचा राहाता वाडा कृष्णेच्या पलीकडे होता. त्याचा बंदोबस्त त्यानें उत्तम ठेविला होता. वाड्याच्या दक्षिण अंगीं कृष्णा व दोन बाजूस ओढा अशा तिन्हीं अंगांनीं वाड्याला पाण्याचा वेढा होता.

## खानानें मार्गावर अत्याचार केले काय ?

या प्रश्नासंबंधीं मतभेद आहेत. विजापुर ते वाई या मार्गावर खानानें कोणत्याहि प्रकारचे कांहींहि अत्याचार केले नाहींत असें म्हणणारा एक पक्ष आहे. त्यांचें म्हणण्यांतील तात्पर्य हें दिसतें कीं, खानाच्या सैन्यांत पुष्कळच हिंदु सैनिक होते. व साम दाम दंड भेद या प्रकारांनीं आणखी हिंदु सैनिक खान आपल्या बाजूस वळवीत होता. व त्यांच्या सहकार्याच्याच जोरावर त्यास ही मोहीम यशस्वी करून दाखवावयाची होती. असें जर होतें तर हिंदूंचीं मनें दुखविलीं जातील अशा प्रकारचें देवस्थानासंबंधीचे

अत्याचार त्यानें करणें शक्य होतें काय ? असा प्रश्न ते करतात. याच्या उलट हिंदूंच्या देवस्थानाला खानानें कांहीं ठिकाणीं निःसंशय उपद्रव दिला असें दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आहे. या मुद्याविषयीं कोणते ग्रंथकार काय म्हणतात हें पाहू गेल्यास डॉ. बाळकृष्ण यांनीं " शिवाजी दी ग्रेट " या आपल्या शिवचरित्रग्रंथांत संकलीतरित्या दिलेली माहिती उपयुक्त होईल ती अशीः—

( १ ) इंग्रजी पत्रें याबाबत कांहींही सांगत नाहींत. ( ता. ८। १०।१६६३ च्या एका पत्रांत मात्र खानानें पंढरपुरास दगा केला असा स्पष्ट उल्लेख आहे. )

( २ ) पिसुर्लेकर यांनीं दिल्याप्रमाणें–डच डाग रजिस्टर व पोर्तुगीजांचें कागदपत्र हेही त्यासंबंधीं कांहीं उल्लेख करीत नाहींत.

( ३ ) रायरी बखर मुग्धच आहे.

( ४ ) चिटणीसी बखर, शिवदिग्विजय, यामध्यें खान हा पंढरपूरच्या देवाला व तुळजापूरच्या देवीला इजा करणार असल्याचे कळल्यामुळें लोकांनीं पंढरपुरच्या विठोबाची मूर्ती तेथून हलविली व तुळजापूरच्या भवानी देवीची मुख्य मूर्तीही हलविली. असे उल्लेख केलेले आढळतात.

( ५ ) सभासद बखर ( पान ९ ), चिटणीस बखर ( पान ५४ ), शिवभारत, जुना पोवाडा, या ग्रंथांतून तुळजापूर व पंढरपूर येथील सदरहू देवस्थानांना खानानें उपद्रव दिला असा मजकूर आहे.

या ग्रंथापैकीं शेवटीं उल्लेखिलेले, सभासदी बखर, शिवभारत व जुना पोवाडा हे आधार अविश्वसनीय आहेत असें म्हणतां येत नाहीं. इतिहाससंशोधकांनीं अनेक कसोट्या लावून पाहून ते ग्रंथ

विश्वासास पात्र असल्याबद्दचे आपले अभिप्राय प्रगट केले आहेत. सभासद म्हणतो—" तेव्हां अवघी फौज एकत्र होवून औरस चौरस लष्कर उतरले. आणि पुढें तुळजापूरास आले. तेथे येऊन मुक्काम केला. श्री भवानी कुलदेवता महाराजांची तीस फोडून जात्यांत घालून भरडून पीठ केले. "—अर्थात हें चल मूर्तीसंबंधीं असावें. त्याचें कारण हल्लीची मूर्ति अगदी जुनी असून ती अफजलखाना नंतरची आहे असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें शिवाजीमहाराजांच्या आज्ञेवरुन त्यांचे पदरीं असलेल्या कवीन्द्र परमानंदानें लिहिलेल्या " श्री शिवभारत " या संस्कृत काव्यग्रंथांतील अध्याय १८ श्लोक १९ वा यांत—

दुर्नयेन भृशं येन निशुंभसमतेजसा ।
अवाज्ञायत वै देवी तुलजापुरवासिनी ॥

( अर्थ—निशुंभाप्रमाणें तेजस्वी अशा तुळजापुरच्या भवानी देवींचा त्या दुष्टानें मोठा अपमान केला. ) असा उल्लेख वाई येथें खान असतां त्याचा विचार करणाऱ्या शिवाजीच्या तोंडीं परमानंदानें घातला आहे. त्यानंतरही पुढें त्याच ग्रंथांत—"शिवाजीनें माझें योग्य बोलणें कबूल केले नाहीं तर "—"प्रतिज्ञां पारयिष्याम भ्रंशयिष्यामि देवता:—" " मी देवतांना भ्रष्ट करीन आणि प्रतिज्ञा पार पाडीन " —असे उद्गार खानानीं काढलेचे नमूद केले आहे. अज्ञानदासाचा जुना पोवाडा म्हणतो—

" फोडिली तुळजा । वरती मसुदच बांधिली ।
मसुद बांधुनी पुढें । गाय जब्र केली ॥ "

शिवकालीन अस्सल कागदावरूनही परमानंद कवींचे वरील विधान विश्वसनीय वाटते. खंड २० ले. २१७ मध्यें—" क्षेत्रास

(पंढरपुरास) खाने अजम अफजल खानाची तसवीस लागली.” असे स्पष्ट शब्द आहेत. श्री पांडुरंगाची अचल मूर्ति बडव्यांनीं बहुधा लपवून ठेविली असावी कारण हल्लीची मूर्ति अफजलखानाच्या फार पूर्वींची आहे असें दिसतें. ( चिं. वि. वैद्य. )

## बजाजी निंबाळकरावरील संकट

मार्गावर आणखी ऐका वेगळ्याच स्वरूपाच्या अत्याचाराचा प्रयोग वा प्रयत्न खानानें केला. शिवाजी महाराजांचे व्याही बजाजी निंबाळकर हे त्यावेळीं फलटण मुक्कामीं आपल्या फौजेनिशीं रहात होते. ते विजापुरशहाचे मांडलिकच होते. परंतु त्यांचें मन आंतून महाराजांच्या बाजूस होतें तथापि या अफजल प्रसंगीं त्यांनीं महाराजास कांहीं सहाय्यही केलेलें नव्हतें. असें असतांही खानानें त्यांचेंवर शिवाजी महाराजांना ते आंतून सामील असल्याचा व सहाय्य करीत असल्याचा वहीम घेऊन त्यांना त्या काल्पनिक अपराधाबद्दल पकडून आणाविलें आणि—“ याची सुंता करून व याच्या गळ्यांत तोफा घालून हत्तीच्या पायीं द्या ”— अशा स्वरूपाची शिक्षा करण्याचें फर्मान सोडले. सन १६५७ सालीं असल्या प्रकारचें संकट बजाजीवर अदिलशहानें आणलें होतें. आणि त्यानंतर दोन वर्षांनीं त्यांचेवर हें घोर संकट पुन्हां कोसळलें !

ही बातमी शिवाजी महाराज व जिजामाता यांच्या कानी गेली तेव्हां त्यांना वाईट वाटलें. सामर्थ्याच्या बळावर या संकटाचें निवारण करणें महाराजांना त्यावेळीं शक्य नव्हतें म्हणून त्यांनीं युक्तीचा अवलंब केला. खान यावेळीं मलवडी येथें होता. मलवडीचा एक जहागिरदार नाईकराजे पांढरे हा त्यावेळीं खानाच्या

१०।४१६०
ह० ३२।१९८६


सैन्यांत होता. त्याचें वजन खानावर होतें. व मलवडीला खान त्या जहागिरदाराचाच पाहूणचार खात होता. तेव्हां नाईक राजांचे हातून बजाजींची सुटका करण्याचा प्रयत्न महाराजांनीं चतुरपणानें केला. नाईकजी राजानें बरीच खटपट व रदबदली करून मोठ्या मुशाफतीनें बजाजीस सोडविलें खरें पण सुटकेकरितां बजाजीकडून खानाने ६० हजार होन दंडादाखल घेतले. (रत्नाकर मासिक वर्ष २ अंक ९). खानाच्या मनांतून बजाजीला खरा त्रास देण्याचा हेतु नसावा. पण मोहीमेचा खर्च भागविण्याचे दृष्टीनें त्यानें हा नाटकी डाव टाकलेला दिसतो व तो त्यानें बरोबर सिद्धीस नेला! खान हा केवळ आडदांड व आडमुठा पुरुष नव्हता. त्याचें अंगीं मुत्सद्देगिरीहि चांगलीच होती हें यावरूनहि दिसून येईल.

## खानानें सैन्यबळ वाढविलें

विजापुर ते वाई या मार्गावर व वाईस आल्यावरही खानानें आपलें सैन्य मोठ्या मुत्सद्दीपणानें साम दाम दंड भेद या सर्व प्रकारच्या नीतींचा उपयोग करून वेळोवेळीं वाढविलें. अिनामें वतनें व जहागिरी वगैरे प्रकारचीं मोठालीं आकर्षक बक्षिसें खानाच्या सैन्यांत दाखल होणारांना त्यांचें बळाबळ व दर्जा पाहून देण्यांत येतील अशीं बादशाहीं फर्मानें त्यानें काढलीं. या आमिषाला पांढरे, इंगळे, खराडे, घोरपडे, काटे, घाडगे, बेहरे, बांदल, खंडोजी खोपडे वगैरे बरीच मंडळी बळी पडली. बरेच देशमुख देशपांडे त्याचे बाजूस वळले. जेध्यापैकीं कान्होजी जेधे, बाबाजी भोसले, बाळाजी सिलीमकर वगैरे थोड्या मंडळींनीं मात्र आपला स्वदेशाभिमानाचा बाणा राखला. आणि त्यांनीं महाराजांचा पक्ष उचलला. याप्रमाणें खानाचे चतुरंग सैन्य वाईला

जमले. खानानें आपला पुढील बेत तेथेंच ठरविला व आराखडाही तेथेंच आखला.

## शिवाजी महाराजास खानाची बातमी

खान " शिवाजीला उंदरासारखा जिवंत पकडून आणतो किंवा ठार मारतो " अशी प्रतिज्ञा करून विजापुराहून शिवाजीवर निघाला ही बातमी इकडे महाराजास अनेक प्रकारांनीं व मार्गांनीं कळली. महाराजांचें हेरखातें हें अत्यंत हुषार वाकबगार व कार्यक्षम होते. शत्रूकडील बित्तंबातमी अगदीं बारीसारीक तपशीलासह काढून घेण्याविषयीं महाराज सदैव दक्ष असत. त्यांत यत्किंचितही हेळसांड झालेली त्यांना खपत नसे. त्यांच्या अशा कर्तबगार हेर खात्यानें त्यांना अफझलखान त्यांचेवर निघाल्याची बातमी राजगडीं अगाऊ आणून पोंचविली असल्यास मुळींच नवल नाहीं. या बाबतींत महाराजांच्या हेरखात्यांतील एक अधिकारी विश्वासराव मुसेखोर याची कामगिरी अधिक महत्त्वाची आहे. तो फकीराचा वेष घेऊन खानाच्या गोटांतील सर्व प्रकारचीं तपशीलवार बातमी काढून ती महाराजांना सारखा पुरवीत असे. त्याशिवाय त्या काळीं अंगावर छाटी वागवून व खांद्यावर झोळी घेऊन निवृत्तीचा व प्रवृत्तीचा, शक्तीचा व युक्तीचा, वेळीं उपयोगी पडेल तो महामंत्र स्वजनांना टाहो फोडून सांगणारा, स्वराज्य कार्याच्या सिद्धीसाठीं हजारों त्यागी–यागी शिष्य–हेर चौफेर देशांत धाडून देऊन राजकारणाचीं सूत्रें आसेतुहिमाचल गुपचूप चाळणारा, धर्मस्वातंत्र्याची हाळी आपल्या धर्मबांधवांना रामघळींतून देणारा, ज्याचे पायीं शिवबा गुरुमाऊली म्हणून डोई ठेवीत तो थोर राजकारणी संत ( रामदासस्वामी महाराज ) या घडीला

पूर्णपणें जागा होता. ही गुरुशिष्याची जोडी अभूतपूर्व तर खरीच पण या जोडीनें महाराष्ट्रधर्म जिवंत ठेऊन जे अनंत उपकार हिंदु धर्मीयांवर केलें आहेत ते त्यांना कधींहि फेडतां येणार नाहींत. या सद्गुरुंनीं या घोर संकटकाळीं आपल्या शिष्याकरवीं शिवाजी महाराजांना अफझलखानाची वार्ता ओवीबद्ध वृत्तांत गुंफून जे काय करावयाचें तें सावधपणें करण्याबद्दलचा इशाराही धाडून दिला. त्या ओव्या खालीलप्रमाणें आहेत:—

विवेके करावे कार्य साधन ।
जाणार नरतनु हे जाणोन ।
पुढील भविष्यार्थीं मन ।
रहाटोंचि नये ॥ १ ॥
चालो नये असन्मार्गीं ।
सत्यता बाणल्या अंगीं ।
रघुवीर कृपा ते प्रसंगीं ।
दासमहात्म वाढवी ॥ २ ॥
रजनीनाथ आणि दिवाकर ।
नित्यनेमे करिती संचार ।
घालिताती येरझार ।
लाविले भ्रमण जगदीशें ॥ ३ ॥
आदिमाया मूळ भवानी ।
हेची जगताची स्वामिनी ।
एकांती विवेके धरूनी ।
इष्ट योजना करावी ॥ ४ ॥

या ओव्या बाह्यात्कारीं साध्या नीतीधर्माचा उपदेश करणाऱ्या दिसतात. परंतु त्यांत अफजलखान निघाल्याची वार्ता कशी दिली आहे हें कळणेंसाठीं वाचकांनीं ओव्यांतील प्रत्येक चरणाचें पहिलें अक्षर वाचलें म्हणजे "विजापुरचा सरदार निघाला आहे." ही वार्ता कशी चातुर्यानें कळविली आहे हें कळून येतें आणि शेवटच्या दोन ओळींत या अफजलप्रसंगीं महाराजांनीं काय करावें त्याची सल्लाही दिली आहे, हें स्पष्ट होतें. याप्रसंगीं स्वामीनीं महाराजांना केलेला हा उपदेश दासबोधाच्या १८ व्या दशकाच्या सहाव्या समासांतील पहिल्या सुमारे ९–१० ओव्यांतही आढळतो. या ओव्या अफजलवधाच्या आधीच्या प्रोत्साहनपर व आश्वासनपर अशा आहेत हें त्यांच्या शब्दरचनेवरून स्पष्ट होतें. त्या ओव्यापैकीं–

बरे ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥
अखंडचि सावधाना । बहुत काय करावी सूचना ।
परंतु कांहीं एक अनुमाना । आणिले पाहिजे ॥
समर्थापाशीं बहुतजन । राहिला पाहिजे साभिमान ।
निश्चल करूनिया मन । लोक असती ॥

त्या समासाला "उत्तम पुरुष लक्षण" असे सर्व साधारण नांव मागाहून दिलें असलें तरी त्यांतील उपदेश हा कांहीं सामान्य स्वरुपाचा उपदेश नसून तो विशिष्ट व्यक्तीस व विशिष्ट प्रसंगास उल्लेखून केलेला आहे हें स्पष्ट आहे. आणि त्यांत "विचार पाहोनी कार्य करणें" ही जी सूचना दिली आहे ती कार्यासाठीं निघतांना दिली असावी, कार्यसिद्धीनंतरची नाहीं असें मानलें

तरच ती योग्य ठरेल. नाहींतर हा उपदेश अप्रयोजक व अनवश्यक ठरेल. या " उत्तम पुरुषलक्षणांचा अन्वयार्थ " केसरीचे माजी विद्वान संपादक श्री. ज. स. करंदीकर यांनीं आपल्या श्रीसमर्थचरित्रग्रंथाच्या १६ व्या तरंगांत मार्मिक रीतीनें सांगितलेला असून तो समास एकंदर तत्कालीन परिस्थितीस व विशिष्ट खान शिवाजी भेटीस कसा अनुलक्षून आहे व खान कांहीं " राजकारणाच्या संवादा" साठीं खरा येत नाहीं व त्याप्रमाणें त्यानें वचन दिलें असलें तरी तो बेइमानी तें खरें करणार नाहीं हें भविष्य रामदासस्वामींनीं कसें वर्तविलें आहे व याप्रसंगीं महाराजांनीं सावधानतेनें वागावें म्हणून कसा इषारा दिला आहे हें सर्व त्यांत त्यांनीं विशद करून सांगितलें आहे. जिज्ञासू वाचकांनीं तें विवेचन अवश्य वाचावें.

त्याचप्रमाणें खान शिवाजीवर निघाल्याची वार्ता खुद्द शहाजीनेंही शिवाजीस धाडली असून खानाच्या अंतस्थ हेतूची माहितीही त्यांनीं त्यास कळविली होती. कर्नाटकांत शहाजीचा मुलगा संभाजी कनकगिरीच्या संस्थानिकाची बंडाळी मोडण्यासाठीं गेला होता. त्यावेळीं अफझलखानही त्याच कामगिरीवर होता. शहाजी, संभाजी व अफझलखान यांच्यामध्यें बरेंच दिवसांचा वाकुडपणा होता व त्यानें उचल खाऊन कनकगिरीला मोठें भांडण केलें त्यांत गोळा लागून संभाजी मृत्यु पावला ! त्यामुळें शहाजीचा अफजलखानावर चांगलाच रोष होता. तेव्हां त्यानेंही शिवाजीस दगलबाज खानाविरुद्ध सावधगिरीचा इशारा दिला असणें साहजिक आहे.

त्याचप्रमाणें प्रस्तुतच्या चिकित्सक युगाला देवदेवींच्या स्वप्नदृष्टांताची कल्पना जरी रुचली नाहीं तरी तुळजापुरच्या देवीचा दृष्टांत शिवाजीला झाला व तिनें त्यास अभय दिलें ही गोष्ट

विश्वसनीय ग्रंथांतून नमूद करण्यांत आली आहे. तेव्हां तिचा उल्लेख मुळींच न करणें अनुचित होईल. म्हणून हा ओझरता उल्लेख केला आहे. उल्लेख ओझरता करण्याचें कारण तो प्रश्न धर्मश्रद्धेचा आहे, ऐतिहासिक चिकित्सेचा नाहीं.

## युद्धमंडळ बोलावून शिवाजीनें निर्णय घेतला

अशा प्रकारें अनेक मार्गांनीं खानाच्या मोहिमेची व त्याच्या अंतस्थ हेतूची माहिती शिवाजीला मिळाल्यावर तो हुन्नरबाज हिकमती हिंमतबहादर रणमर्द स्वस्थ बसणें शक्य नव्हतें. यावेळीं तो राजगडीं होता. राजगडावर या खबरीं येतांच त्यानें आपलें सर्व अधिकारी मुत्सद्दी तातडीनें विचारविनिमयासाठीं तेथें बोलाविलें. आपली एकंदर परिस्थिति ओळखून खानाबरोबर लढाइ द्यावी कां न द्यावी व द्यावयाची झाल्यास ती कोठे द्यावी या गोष्टीचीच मुख्य चर्चा व्हावयाची होती. या युद्धमंडळाच्या सभेसाठीं जे अनेक अधिकारी, सरदार व मुत्सद्दी सेनापती आले होते त्यांत–नारोपंत हणमंते, शामराजपंत, सोनाजीपंत डबीर, निळोपंत मुझुमदार, मोरोपंत पिंगळे, नेताजी सरनोबत, रघुनाथपंत सबनीस, गोमाजी पानसंबळ, गंगाजी मंगाजी वाकणीस, अण्णाजीपंत, सुभानजी नाईक, कृष्णाजी पानसंबळ, जिवाजी देकांते, माणकोजी दहातोंडे, सुभानजी इंगळे,–नारायण ब्राह्मण सेनापती, वगैरे नामवंत लोक उपस्थित होते. दोन दिवस या विषयावर खल झाला. (चिटणीस बखर व यदुनाथ सरकार). "विषमबळाशीं झुंज करू नये. सल्ला भला करावा." अशा अर्थाची मतें आग्रहानें मांडण्यांत आलीं. शेवटीं जें ठरलें त्याचा निष्कर्ष असा कीं, शक्य तितकें करून युद्धाचा प्रसंग टाळावा. मात्र मूळ ध्येयाला धक्का पोंहोचेल असें करुं नये. प्रसंग अनिवार्य झाला तर

लढाशी करावी व तीही शक्य तितकी आत्मरक्षणाच्या स्वरुपाची असावी. आणि वेळ अनुकूल दिसली तर चढाईचे धोरण स्वीकारावें. त्याचप्रमाणें खान वाईला आला त्यांत त्याचा हेतू जसा शिवाजीला पकडून नेण्याचा वा मारण्याचा होता तसा जावळी घेण्याचाही होता हें जाणून सहजासहजी खानाला जावळी मिळूं नये म्हणून व स्वतःच्या रक्षणासाठीं सोईस्कर व सोपी व खानाला चढाई करण्याला मोठीं अवघड व अडचणीची होती, म्हणून कुवल व दुर्गम अशी जी प्रतापगडाची जागा ती रणक्षेत्र म्हणून शिवाजीनें पसंत केली. व तेथें तो गरुडासारखी भरारी मारून सैन्यासह ठाणें देऊन बसला. घोडदळाचा सरनौबत–शिवाजीचा उजवा हात–नेताजी पालकर, आणि पायदळाचा सेनापती शूर मोरोपंत पेशवा हे दोघेही वायुवेगानें त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. मोरोपंताला बोलावून घेण्याचें विशेष कारण हें कीं एकतर तो पायदळाचा फार प्रभावी सेनापती होता आणि दुसरें असें कीं, त्याचेच देखरेखीखालीं प्रतापगडचा किल्ला बांधण्यांत आला होता. त्यामुळें त्या गडाची व त्याच्या आसमंतांतील प्रदेशाची त्यास खडानूखडा माहिती होती.

## राज्याची निरवानिरव

राजगडाहून शिवाजीमहाराज प्रतापगडाकडे जाण्यास निघण्यापूर्वीं त्यांनीं आपल्या राज्याचा पूर्ण बंदोबस्त व निरवानिरव करून ठेविली. ते द्विजदेवांचा, स्वधर्माचा व स्वराज्याचा विचार करून बोलले,–“ सल्ला कशाचा नि काय ! प्राण जावो वा राहो लढाई खेळणें अटळ आहे तर मला खेळली पाहिजे. माझी तुळजापुरची आई मला जावळीला तारील. तिच्यावर माझी श्रद्धा आहे. स्वातंत्र्यासाठीं रणांत पडलों तर देहाचें सार्थक होईल !

यशस्वी झालों तर स्वातंत्र्यलक्ष्मी महाराष्ट्राला माळ घालील ! दुर्दैवानें रणांत पडलोंच तर एक तजवीज करावी. संभाजीला व मातोश्रींना राजगडावरच ठेवावे, संभाजीराजांना राज्य सूपूर्त करावे. आणि त्यांच्या आज्ञेंत सर्वांनीं रहावे. प्रसंग बाका आहे. संभाजीला हातीं धरा आणि माझ्या मागें स्वराज्य राखा." अशा अर्थाचे अमोल बोल बोलल्यावर त्यांनीं मातोश्री जिजाबाईचे पायीं आशिर्वादासाठीं डोई ठेविली. मासाहेबांनीं आशीर्वाद दिला, "शिवबा ! विजयी होशील." जिजाऊ वीरमाता होती, तरी तिचें तें आईचें अंतःकरण हा निरोप देतेसमयीं अनेक भावनांनीं उचंबळून आलें. गतगोष्टींच्या ब्रह्मांडानें तिचा ऊर भरून आला ! मोंगल घोड्याची टाप चहूमुलखांत दणदणींत असतां "मोंगलांना आपण जाऊन मिळूं व तेथेंच सुखांत राहूं, या धकाधकीच्या मामल्यांत आणि धामधुमीच्या काळांत इथें कशाला रहातेस." असें म्हणून मुलीचें मन वळविणाऱ्या आपल्या बापाला लखुजी जाधवाला—जिनें आपला दुष्मन मानला, निजामशाहीचा पुनरुद्धार करण्याचें नांवाखालीं स्वतःच स्वराज्याचें निशाण उभवूं पाहणाऱ्या कर्तृत्ववान प्रतापी शहाजीला मोंगल दरबारनें २२ हजार मनसबदारीचा नजराणा मोंगलशहाला येऊन मिळण्यासाठीं दिला असतां जिनें तो आपल्या नवऱ्याबरोबर स्वराज्याच्या महत्वाकांक्षेपुढें तृणवत् मानून भीमगडाहून झुगारून दिला, शिवाजीचे जन्मसमयीं मुरारपंतानें पुणें जहागिरींत शिरून सर्वत्र जाळपोळ करून लूटमार केली असतां, दुष्काळानें आपला भयंकर जबडा सगळयांना खाण्यासाठीं पसरला असतांना, शेरभर रत्नें देऊन मूठभर कणीकोंडाही मिळत नसतांना, जीव जगविण्यासाठीं बाप मुलाचें मांस खाण्यास तयार होत असतांना,

बंडाळीची आग चहूंकडे भडकत चालली असतांना, त्यांतून शहाजीराजा दर्याखानाच्या स्वारीवर बाहेर गुंतून पडला असतां, जी तसल्याही संकटकाळीं आपल्या लाडक्या शिवबासाठीं आणि स्वराज्याच्या स्वप्नसिद्धीसाठीं आपला जीव धोक्यांत घालून शिवनेरीला एकटी राहिली, ती वीर जीजामाता या संकटकाळीं कशी बोलली–चालली असेल याची केवळ कल्पनाच केलेली बरी ! जिजामातेनीं यावेळीं शिवाजीबरोबर स्वतः जाण्याचा आग्रह धरला असेल आणि शिवाजीनें त्यांचीं समजूत त्यांच्यावर पुढें पडणाऱ्या जबाबदारीची जाणीव देऊन घातली असेल, कदाचित जुन्या पोवाड्यांत वर्णिल्याप्रमाणें प्रतापगडावर त्या हट्ट धरून गेल्याहि असतील किंवा पुढील जबाबदारीची जाणीव होऊन त्या कदाचित गेल्याही नसतील. कांहीं ग्रंथकारांच्या मतें त्या शिवाजीबरोबर प्रतापगडावर गेल्या, कांहींच्या मतें त्या तिकडे गेल्या नाहींत. एकंदरींत इतिहासांत हें आम्हांला एक विवादस्थळच दिसतें. याप्रसंगीं जिजामाता आपल्या नातवासह म्हणजे संभाजीला घेऊन प्रतापगडावर गेल्या होत्या असें रायरीबखर ( पान १२ ) चिटणीस बखर ( पान ५९ ), शिवदिग्विजय ( पान १७ ) येथें नमूद केल्याचें आढळतें. आमच्या मतें जिजामाता प्रतापगडावर यावेळीं गेल्या नसाव्यात व संभाजीचें व राज्याचें रक्षण करण्यासाठीं जबाबदारी ओळखून राजगडावरच बंदोबस्तांत राहिल्या असाव्यात. त्याचप्रमाणें शिवाजीमहाराजही आपल्याबरोबर आपल्या मातेचाही जीव धोक्यांत घालण्याइतके अदूरदर्शी खचित नव्हते. स्वतःचें काय होईल याची जबरदस्त विवंचना मनाला लागली असतां आपल्या मातेला आपल्याबरोबर असल्या जिवावरच्या संकटांत कोण घालील ? विश्वसनीय

मानिल्या गेलेल्या सभासदी बखरींत प्रतापगडाकडे निघतेवेळीं "पुत्र संभाजी राजे व मातोश्री ही राजगडी ठेवावीं" असा शिवाजी महाराजांचा आदेश नमूद केलेला असून मातोश्रींचा आशीर्वाद घेऊन मग राजे निघोन प्रतापगडास गेले असें वर्णन आहे. त्याच प्रमाणें या अफझलप्रसंगीं महाराजांनीं विजय मिळविल्यानंतर "राजगडास मातुश्रीस सर्वांसही फत्तेची खबर लिहून पाठविली." असेंहि सभासद म्हणतो. यावरून जिजामाता याप्रसंगीं प्रतापगडावर गेल्या नव्हत्या असें दिसतें. त्याचप्रमाणें कवींद्र परमानंदानेंही शिवाजीमहाराज गडावरून अफझलखानाच्या भेटीस निघाले त्यावेळीं त्यांनीं अनेकांचे निरोप व आशीर्वाद घेतल्या बद्दलचें जें तपशीलवार वर्णन दिलें आहे त्यांत जिजामातांचा उल्लेख नाहीं. हा अनुल्लेख महत्त्वपूर्ण वाटतो. त्यावरूनहि जिजामाता प्रतापगडावर त्यावेळीं गेल्या नसाव्यात असें अनुमान निघतें. असो. याप्रमाणें शिवाजीमहाराज आपल्या ठिकठिकाणच्या सैन्याला कमरबंदीचे हुकूम सोडून व बोलावून घेऊन राजगड ते प्रतापगड व वाई तें पुणें या मार्गावर ठिकठिकाणीं खडी शिबंदी व कडक चौक्या ठेवून शत्रुसैन्याला तिकडे जाण्याची बंदी करणारी व्यवस्था हुशारीनें करून व राज्याची निरवानिरव स्वत: जातीनें हिंडून करून मग फौजबंद होऊन प्रतापगडीं दाखल झाले.

### प्रतापगड

जातां जातां या ठिकाणीं प्रतापगडची माहिती देणें उचित होईल. सातारा जिल्ह्यांतील जावली तालुक्यांत मेढ्याच्या ईशान्येस सुमारे २० मैलावर व महाबळेश्वरापासून सुमारे ८ मैलावर ईशान्येस पार व किन्हेश्वर या खेड्यांच्या दरम्यानच्या फाट्यावर प्रतापगडचा किल्ला आहे. हा समुद्रसपाटीपासून सुमारे ३५४३

फूट उंच आहे. ज्या डोंगरावर हा किल्ला बांधला आहे त्याला तेथील लोक **ढोपऱ्याचा** डोंगर म्हणतात. या किल्ल्याचे एकंदर क्षेत्रफळ सुमारे ३००×४०० यार्ड आहे. हा किल्ला शिवाजीच्या आज्ञेनुसार मोरोपंत पिंगळे यांनीं इ. स. १६५६ चे सुमारास बांधला. मोरोपंतांचें देखरेखीखालीं हें बांधकाम अजमासे वर्ष दीड वर्ष चाललें होतें. किंकेड पासनीस यांनीं आपल्या "History of tha Maharatta People" या ग्रंथांत व सरदेसाईकृत मराठी रियासतींत नमूद केल्याप्रमाणें जावळीचें राज्य चंद्रराव मोऱ्याकडून जिंकल्यानंतर तिकडील प्रान्तावर व पारघाटावर आपली जरब बसून हुकमत चालविणेंसाठीं एकादें चांगलें तट-बंदीचें माऱ्याचें ठिकाण आपल्या हातीं असावें म्हणून शिवाजी राजानें हा किल्ला बांधला. या गडावर किल्ल्यांत किल्ला आहे. त्यापैकीं मुख्य माथ्यावर बांधलेल्या किल्ल्याला अर्थातच बाले-किल्ला म्हणतात. त्याचे भोंवती व खालील किल्ल्याभोंवतीही तट आहे. असा दोन तटांचा हा किल्ला आहे. या किल्ल्याचे उत्तर व पश्चिम बाजूस ८०० फूट खोल व भयंकर कडे असून त्याचे खालचा व वरचा असे दोन भाग आहेत. वरचा २०० यार्ड लांबरुंद आहे व खालचा ३५०×१३० यार्ड आहे. अशी माहिती य. रा. दाते आणि चिं. ग. कर्वे यांनीं आपल्या "सुलभ विश्वकोश" या ग्रंथांत दिली आहे. या भागाकडील बुरुज ३०–४० फूट उंचीचे आहेत. इ. स. १८८४ च्या पाहणीच्या वृत्तांतांत प्रतापगड हा किल्ला अतिशय उंच डोंगरावर बांधलेला असून त्याच्या सभोंवतालचा देखावा फारच मनोहर दिसतो असें वर्णन आढळतें. पूर्व दक्षिण या बाजूची उतरण सोपी आहे. परंतु त्या बाजूस घनदाट अरण्य आहे. पूर्वेच्या बाजूस मुख्य तटाचे बाहेर

दुसरी एक बळकट भिंत बांधलेली आहे व तिच्या प्रत्येक टोंकास एक एक बुरूज आहे. ती भिंत शिवाजीनें अफजलखानास ठार मारल्यानंतर बांधली व तिच्या एका बुरजाखालीं त्यानें अफजलखानाचें शीर पुरलें. अफजलखानाला अबदुल्लाही म्हणत म्हणून तेव्हांपासून त्या बुरूजाला '**अबदुल्ला बुरूज**' असें नांव पडलें. किल्ल्यांत दरवाज्याजवळ उजव्या हातास हा बुरूज आहे. याच बुरूजासमोर भवानी देवीचें देऊळ आहे. तें शिवाजीनें अफजलवधानंतर इ. स. १६६१ त बांधलें. या देवालयांत जी अष्टभुजा देवीची मूर्ती आहे ती शिवाजीनें गंडकी नदींतून वाजत गाजत आणलेल्या शुभ पाषाणाची तयार करविली आहे. मूर्ती अत्यंत सुंदर व तेजस्वी आहे. या मूर्तीच्या पाषाणाच्या अंतर्भागांतून सुवर्णरेषा उमटलेल्या दिसतात. या देवालयाच्या गाभाऱ्यांत हल्ली श्रीशंकराचें स्फटिकाचें मोठें लिंग असून त्यांत बिल्वदळ दिसतें. देवी तेथें स्थापन केल्यानंतर प्रतापगड हें देवीचें जागृतस्थान झालें अशी लोकश्रद्धा आहे. या देवीच्या पुढें घंटेचा मंडप उर्फ पुराणमंडप, सभामंडप व नगारखाना अशी पूर्वी भव्य सलग बांधकामाची रचना होती. साताऱ्याचे कै. छत्रपति प्रतापसिंह महाराजांनीं या देवीचें देवालयासाठीं सुमारें ४०,००० रुपये खर्च केल्याबद्दलचा उल्लेख मराठी रुमाल दप्तर नंबर १ यांत आढळतो. मूळची मंडपरचना इ. स. १९२९ सालीं अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडून त्याची पुनर्रचना करण्यांत आली असल्यामुळें मूळचे स्वरूपांत हल्लीं खूपच बदल झाला आहे. गडाचे पायथ्याशीं जेथें अफजलखानाच्या भेटीसाठीं मंडप घातला होता त्या भागांत अफजलखानाच्या स्मरणार्थ त्याची कबर महाराजांनीं बांधलेली असून त्यांनीं ती चालविण्यासाठीं तिला वतनही

लावून दिलेलें होतें. हा किल्ला इ. स. १८१८ मध्यें, जरी तो नीट दुरुस्त होता व आंत शिबंदी होती तरी, उभयपक्षीं सलोख्याचें बोलणें होऊन रक्ताचा एकही बिंदू न सांडतां इंग्रजांचे हातीं आला! यांत पाहण्यासारख्या पूर्वीं इमारती होत्या व महादेवाचे देवालयही होते. परंतु आतां पडझड झाल्यामुळें कांहीं कांहीं बांधकामाचा पत्ताही लागत नाहीं. इ. स. १८६२ त इंग्रज सरकारनें जो डोंगरी किल्ल्यांचा तक्ता तयार केला आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं, "प्रतापगड हा किल्ला अतिशय बळकट असून आंत विपुल पाणी आहे व सातारच्या पोलीस खात्यापैकीं दहा शिपायांचें एक ठाणें आहे." तारीख २३ माहे डिसेंबर १९२९ रोजीं देवीचें देवालयांवर दरोडा पडून देवीचे अंगावरील अत्यंत मूल्यवान दागदागीनें त्यांत चोरीस गेले! एकंदर देवाल्याचा हल्लीचा देखावा पूर्वींचा वैभवशाली इतिहास पाहिला म्हणजे अगदीं उदासवाणा व उद्वेगजनक वाटतो! अफजलखानाच्या टुमदार कबरींत मात्र हंड्या झुंबरें झळकतांना दिसतात! अर्थात् त्या बड्या सरदाराची स्मृति चिरंतन करण्यासाठीं केलेली नीटनेटकी व्यवस्था केव्हांहि स्तुत्यच आहे.

## प्रतापगडावर शिवाजीच्या पुतळ्याचें नेहरूंच्या हस्तें अनावरण

प्रतापगड शिवस्मारक समितीनें हातीं घेतलेले, प्रतापगड किल्ल्यावर शिवाजीचा अश्वारूढ पुतळा उभारण्याचें काम, पुरें झालें असून भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्तें या पुतळ्याचें अनावरण होणार आहे. समितीचे अध्यक्ष माजी बांधकाम मंत्री मालोजीराव नाईक निंबाळकर यांचें निमंत्रण पंडित नेहरू यांनीं स्वीकारलें असल्याचें समजतें. पुतळ्याच्या अनावरणाची तारीख पंडित नेहरूंच्या सोयीनुसार ठरणार आहे.

या किल्ल्याचा आकार कोणाला फुलपाखरासारखा वाटतो. मालकम पेठेहून या किल्ल्याला जाण्यास रस्ता म्हटला म्हणजे फिटस्जीरल्ड घाटीनें साधारण एक तासाचे रस्त्यावर भेरूशी खेड्यांत किंवा आंबेनळी म्हणून एक वाडी आहे तेथे उतारू-करितां बंगला बांधला आहे तेथे जावे. तेथून किल्ल्यावर जाणे-साठीं खुर्च्या किंवा डोल्या मिळतात. वाटेनें हल्लीं कोठें दाट तर कोठें पातळ झाडी आहे. या वाटेनें जाण्याला सुमारे पाऊण तास लागतो. पूर्वींच्या या किल्ल्याभोंवतालच्या घनदाट झाडीचें वर्णन वाचलें म्हणजे अनोळखी व अपरिचित माणसांना त्यावेळीं आपली वाट सांपडणें मुष्किलीचें होते. जावळीच्या जंगलांतील भयंकर दाट झाडींमुळें तेथील लोकांना उजाडले मावळलें केव्हां हेंच समजत नसे! जावळीचे वन म्हणजे शिवसिंहाची कुहरच होती तीं! या किल्ल्याच्या आसमंतांतील प्रदेशांत जावळी तालुक्यांतच महिमंडणगड, मकरंदगड व वासोटा किल्ला असे इतर किल्ले आहेत. या सर्वांत प्रतापगडचा किल्ला हा लष्करी दृष्ट्या अत्यंत महत्वाचा व बळकट आहे. या किल्ल्यावर सखाराम बापू बोकील यास नाना फडणीसानें कैदेंत ठेविलें होतें. महाबळेश्वर येथील बाँबे पॉइंटपासून या किल्ल्याच्या महत्त्वाच्या भागाचें दर्शन घडतें. अशा या ऐतिहासिक महत्वाच्या किल्ल्याचा पुनरुद्धार होण्याची वेळ आलेली दिसते. मुंबईचे माजी गव्हर्नर डॉ. हरेकृष्ण मेहताब, यांच्या प्रोत्साहनाने व सहानुभूतीनें व शेट श्रीमंतांच्या औदार्या-मुळें व गोरगरीबांच्या व मध्यम वर्गीयांच्या कष्टाने व पैशानें या किल्ल्यावर सर्वांत जुन्या चित्रावरून तयार केलेला शिवाजी महाराजांचा चौथऱ्यासह सुमारे ३७ फूट उंचीचा व चौथरा सोडून १४ फूट उंचीचा भव्य अश्वारूढ पुतळा त्यांच्या पूर्वींच्या

तेथील वाड्याच्या ठिकाणीं उभा करण्यांत आला आहे. या पुतळ्यास सुमारे ६७००० रुपये खर्च आला आहे. पुतळ्याचा चबुतरा, चबुतऱ्याभोवतालची बाग व विश्रांतिगृह यासाठीं सुमारे ४०००० रुपये खर्च आला आहे. या शिवस्मारकामुळें प्रतापगड पुन्हा अखिल भारताचें जिवंत स्फूर्तिस्थान होईल यांत शंका नाहीं. शिवाजी महाराजांचा हा चंद्रलोकावर स्वारी करूं पाहणारा भव्य अश्वारूढ पुतळा पाहिला म्हणजे नळराजाच्या घोड्याचा खूर चंद्राच्या तोंडाला लागल्याचें कवीनें केलेलें वर्णन कदाचित खरेहि असेल असें कल्पनाप्रिय मनाला वाटूं लागून चंद्राला "आतां तरी सावध रहा." असा इशारा द्यावासा वाटतो !

**प्रतापगड हें ठिकाण शिवाजीनें रणक्षेत्र म्हणून कां निवडलें?**

प्रतापगड हें रणक्षेत्र म्हणून शिवाजीनें पसंत केलें व त्या ठिकाणीं तो जाऊन बसला यांत त्याच्या सेनापतीपणाचें कौशल्य व मुत्सद्दीगिरी दिसून येते. "खानाच्या मनांतून मला प्रत्यक्ष गांठून पकडावयाचें आहे तर मी जेथें असेन तेथें तो आल्याशिवाय राहणार नाहीं. मग मी माझ्या स्वतःच्या बचावासाठीं व जमले तर चढाई करण्यासाठीं मला सोपें व सोईस्कर आणि खानाच्या बचावाला आणि चढाईला त्याला अत्यंत गैरसोयीचें व अवघड असें ठिकाण मी कां निवडूं नये? व त्या ठिकाणीं मी जाऊन कां बसूं नये?" असा मनांत खोल विचार करून आणि त्यास अनुसरून शिवाजीनें आपल्या राजधानीपासून दूर असलेली ही प्रतापगडची जागा आपलें आश्रयस्थान म्हणून निश्चित केली. या गडाभोंवतालच्या कित्येक मैलापर्यंतचा सह्याद्रीचा भाग भयंकर कडेकपारांनीं, डोंगरांच्या सोंडासुळक्यांनीं आणि काळासारखे जबडे पसरलेल्या राक्षसी दऱ्याखोऱ्यांनीं व्यापलेला पाहिला

म्हणजे शिवाजी महाराजांच्या वरील विचारसरणींतील मर्म लक्षांत येतें. असल्या दुर्गम डोंगराळ मुलुखांतून आपल्या अवजड लष्करानिशीं अफजलखानाला हालचाली करणें शक्यतो अशक्य व्हावें हाहि त्यांचा खोल डाव प्रतापगड हें रणक्षेत्र ठरविण्याच्या बुडाशीं दिसतो. आपण ठरविलेल्या रणक्षेत्रांत शत्रूला खेंचून आणण्याचें हें कौशल्य अवर्णनीय नाहीं काय? " नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति। " " सुसर आपल्या ठिकाणीं असली म्हणजे ती मोठ्या हत्तीलाही ओढून नेते. " हें या वचनांतील मर्महि त्यांच्या पूर्ण लक्षांत होतें असें दिसतें.

## यावेळीं शिवाजी महाराजांच्या जवळ किती सैन्य होते ?

याची खात्रीशीर माहिती मिळत नसली तरी अनुमानानें व कांहीं उल्लेखांच्या आधारें ती अंदाजानें सांगतां येण्यासारखी आहे. जावळीच्या प्रसंगीं महाराजांजवळ असलेल्या फौजेचा उल्लेख सभासदानें आपल्या बखरींत केला आहे. त्यांत तो म्हणतो " लष्करचा सरनोबत नेताजी पालकर केला. नेताजी सरनोबती करीत असतां ७००० पागा व ३००० शिलेदार अशी दहा हजार फौज झाली. मावळे लोकांची संचनी दहा हजार पावेतों झाली." यावरून महाराजांचे जवळ सुमारे दहा हजार घोडेस्वार व दहा हजार पायदळ होते असें समजून चालण्यास हरकत नाहीं. यांत लढाईमुळें कांहीं सैन्य कमीअधिक झालेही असेल. या सैन्याशिवाय मल्हारराव चिटणीसकृत शिवाजीचे बखरींत, यावेळीं ७०० इमानी पठाणांची एक तुकडी महाराजांच्या पदरीं नोकरीस आली व ती त्यांनीं ठेवून घेतली, असा उल्लेख आढळतो. महाराजांच्या जवळ लहान मोठ्या तोफाहि होत्या. प्रतापगडच्या बुरुजावर व दरवाज्याजवळ त्यापैकीं कांहीं स्वसंरक्षणासाठीं

तेथील वाड्याच्या ठिकाणीं उभा करण्यांत आला आहे. या पुतळ्यास सुमारे ६७००० रुपये खर्च आला आहे. पुतळ्याचा चबुतरा, चबुतऱ्याभोवतालची बाग व विश्रांतिगृह यासाठीं सुमारे ४०००० रुपये खर्च आला आहे. या शिवस्मारकामुळें प्रतापगड पुन्हा अखिल भारताचें जिवंत स्फूर्तिस्थान होईल यांत शंका नाहीं. शिवाजी महाराजांचा हा चंद्रलोकावर स्वारी करूं पाहणारा भव्य अश्वारूढ पुतळा पाहिला म्हणजे नळराजाच्या घोड्याचा खूर चंद्राच्या तोंडाला लागल्याचें कवीनें केलेलें वर्णन कदाचित खरेंहि असेल असें कल्पनाप्रिय मनाला वाटूं लागून चंद्राला "आतां तरी सावध रहा." असा इशारा द्यावासा वाटतो !

## प्रतापगड हें ठिकाण शिवाजीनें रणक्षेत्र म्हणून कां निवडलें ?

प्रतापगड हें रणक्षेत्र म्हणून शिवाजीनें पसंत केलें व त्या ठिकाणीं तो जाऊन बसला यांत त्याच्या सेनापतीपणाचें कौशल्य व मुत्सद्दीगिरी दिसून येते. "खानाच्या मनांतून मला प्रत्यक्ष गांठून पकडावयाचें आहे तर मी जेथें असेन तेथें तो आल्याशिवाय राहणार नाहीं. मग मी माझ्या स्वतःच्या बचावासाठीं व जमले तर चढाई करण्यासाठीं मला सोपें व सोईस्कर आणि खानाच्या बचावाला आणि चढाईला त्याला अत्यंत गैरसोयीचें व अवघड असें ठिकाण मी कां निवडूं नये ? व त्या ठिकाणीं मी जाऊन कां बसूं नये ? " असा मनांत खोल विचार करून आणि त्यास अनुसरून शिवाजीनें आपल्या राजधानीपासून दूर असलेली ही प्रतापगडची जागा आपलें आश्रयस्थान म्हणून निश्चित केली. या गडाभोंवतालच्या कित्येक मैलापर्यंतचा सह्याद्रीचा भाग भयंकर कडेकपारांनीं, डोंगरांच्या सोंडाखुळक्यांनीं आणि काळासारखे जबडे पसरलेल्या राक्षसी दऱ्याखोऱ्यांनीं व्यापलेला पाहिला

म्हणजे शिवाजी महाराजांच्या वरील विचारसरणींतील मर्म लक्षांत येतें. असल्या दुर्गम डोंगराळ मुलुखांतून आपल्या अवजड लष्करानिशीं अफजलखानाला हालचाली करणें शक्यतो अशक्य व्हावें हाहि त्यांचा खोल डाव प्रतापगड हें रणक्षेत्र ठरविण्याच्या बुडाशीं दिसतो. आपण ठरविलेल्या रणक्षेत्रांत शत्रूला खेंचून आणण्याचें हें कौशल्य अवर्णनीय नाहीं काय ? " नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति । " " सुसर आपल्या ठिकाणीं असली म्हणजे ती मोठ्या हत्तीलाही ओढून नेते. " हें या वचनांतील मर्महो त्यांच्या पूर्ण लक्षांत होतें असें दिसतें.

## यावेळीं शिवाजी महाराजांच्या जवळ किती सैन्य होते ?

याची खात्रीशीर माहिती मिळत नसली तरी अनुमानानें व कांहीं उल्लेखांच्या आधारें ती अंदाजानें सांगतां येण्यासारखी आहे. जावळीच्या प्रसंगीं महाराजाजवळ असलेल्या फौजेचा उल्लेख सभासदानें आपल्या बखरींत केला आहे. त्यांत तो म्हणतो " लष्करचा सरनोबत नेताजी पालकर केला. नेताजी सरनोबती करीत असतां ७००० पागा व ३००० शिलेदार अशी दहा हजार फौज झाली. मावळे लोकांची संचनी दहा हजार पावेतों झाली." यावरून महाराजांचे जवळ सुमारे दहा हजार घोडेस्वार व दहा हजार पायदळ होते असें समजून चालण्यास हरकत नाहीं. यांत लढाईमुळें कांहीं सैन्य कमीअधिक झालेही असेल. या सैन्याशिवाय मल्हारराव चिटणीसकृत शिवाजीचे बखरींत, यावेळीं ७०० इमानी पठाणांची एक तुकडी महाराजांच्या पदरीं नोकरीस आली व ती त्यांनीं ठेवून घेतली, असा उल्लेख आढळतो. महाराजांच्या जवळ लहान मोठ्या तोफाहि होत्या. प्रतापगडच्या बुरुजावर व दरवाज्याजवळ त्यापैकीं कांहीं स्वसंरक्षणासाठीं

ठेविल्या होत्या. किल्ल्याच्या तटांत बंदुकांचे मोर्चे लावण्यासाठीं ठिकठिकाणीं भोकें ठेविलीं आहेत. गोलंदाजीची व्यवस्था तेथें योग्य रीतीनें केलेली होती. अवजड तोफा शिवाजी महाराजांचे-पाशीं फारशा नसाव्यात. डोंगराळ मुलुखांत महाराजांच्या विशिष्ट युद्धपद्धतीचे चौकटींत त्या बसणाऱ्या नव्हत्या. त्यांच्या फौजेच्या प्रमाणांत डोंगरी तोफांचा सांठा मात्र त्यांचेपाशीं जरूर तेवढा असावा असें वाटतें. त्यांच्या सैन्यांत बेलदार, कुऱ्हाडे, खलाशी, दारूगोळ्याच्या बंदोबस्तांतील लोक आणि हेरहि होते. याप्रमाणें लष्करी बळानें संपन्न होऊन व तटबंदीचें चिलखत चढवून प्रतापगड खानाला वेळ आली तर, लढा देण्याला खडा झाला ! महाराजांसारखा महान् योद्धा व उत्कृष्ट सेनापती व नेताजी, मोरोपंत, तानाजी यांसारखे रणधुरंधर वीर एके ठिकाणीं जमल्या-वर किल्ल्यावर उत्साहाला ऊत यावा यांत नवल नाहीं !

## शिवाजीच्या भेटीसाठीं खानाचे डावपेच

खानाला शिवाजी प्रतापगडावर आल्याचें कळल्यानंतर तो वाईला आला व तेथें त्यानें तळ ठोकला हें वर आलेंच आहे. आतां जावळी कशी जिंकावी याचा विचार तो करूं लागला. शिवाजी जावळीस आल्यामुळें ती आतां सहजासहजीं मिळणें शक्य नाहीं असें त्यास वाटूं लागलें. त्यांतून त्याचें जें मुख्य उद्दिष्ट शिवाजीला पकडावयाचें किंवा ठार मारावयाचें तें कसें साधावें याच्या विशेष विवंचनेंत तो पडला. तेथील मावळा " आधीं आकाशाला गवसणी घाला आणि मग शिवाजीला धरा किंवा वाऱ्याची मोट बांधा आणि मग शिवाजीला पकडा " असें बोलतांना जेव्हां खानाला आढळे तेव्हां त्याचें मन सचिंत होई व विचारांच्या भोवऱ्यांत फिरूं लागे ! तेव्हां लढाई न करितां

शिवाजी कसा हातीं येईल याचाही तो विचार करूं लागला. तात्पर्य जावळीवर चालून जाणें किंवा जावळी देण्याविषयीं शिवाजीशीं बोलणें सुरूं करणें हे दोनच मार्ग त्याला खुले होते. त्यापैकीं दुसऱ्या मार्गाचा त्यानें अवलंब केला आणि खानानें आपला हेजीब म्हणजे वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी याला शिवाजीची भेट घडवून आणण्याच्या हेतूनें भीति दाखवून जरब बसविणारा निरोपाचा लखोटा शिवाजीस देण्याविषयीं प्रतापगडावर पाठवून दिलें.

## खानाचा वकील गडावर आला

कृष्णाजी भास्कर निरोपाचा लखोटा घेऊन गडावर आला. महाराजांना तें कळल्यावर त्यांनीं त्याला वास्तव्यासाठीं गडावरचा वाडा दिला. आणि त्याच्या भेटीसाठीं त्याच्याच बिऱ्हाडीं स्वतः रात्रीं गेले! भेटींत खानाच्या वकिलानें खानाच्या संदेशाचा लखोटा महाराजांच्या हातांत दिला. महाराजांनीं लखोटा वाचून पाहिला. त्याचा सारांश खालीलप्रमाणें :—

" शहाजीच्या पोरा! मी अफझलखान नांवाचा अजिंक्य सरदार विजापुराहून आलों आहे! अलीशहाचा मी कलीजा आहे! माझा प्रताप तुला माहित आहे ना? तूं आजकाल पावलोपावलीं कोण उद्धटपणा करूं लागला आहेस? निजामशहा विलयाला गेल्यावर स्वतः हस्तगत केलेला त्याचा जो मुलूख आदिलशहानें तह करण्याच्या इच्छेनें मोंगलांना दिला तो हा त्यांचा डोंगरी किल्ल्यांनीं व्यापलेला मुलूख, शिवाजी राजा! तूं आपल्या ताब्यांत घेतला आहेस! पदोपदीं मुलूख काबीज करीत चालला आहेस. तूं कैदेंत टाकलेला दंडाराजपुरीचा राजा तिकडे

अहर्निश जळफळत आहे! चंद्रराव मोऱ्याचें विस्तीर्ण राज्य तूं गिळंकृत केलेंस आणि त्याच्या राज्याची ही जी मोठी गुरुकिल्ली गिरितटीं वसलेली जयवल्ली उर्फ जावळी–ती तूं अन्यायानें जिंकलीस आणि चंद्ररावाला त्याच्या आप्तअमात्यासह आणि मंत्र्यासह धुळीस मिळविलेंस! कल्याण भिवंडी मारलीस! खजिने लुटलेस! निर्भयपणें चक्रवर्ती राजाचीं चिन्हें मिरवतोस! स्वतंत्र म्हणून ऐट करतोस! वंदनीयांना वंदन करीत नाहींस! उच्छृंखलपणाची सीमा गांठली आहेस रे! म्हणून काळजं टका! तुझा हा उद्धटपणा ज्याच्या अंतःकरणांत शल्यासारखा बोंचत आहे त्या आदिलशहानें मला तुझ्यावर मोठ्या सैन्यानिशीं पाठविलें आहे. माझे शूर सरदार युद्ध करण्यासाठीं मला एकसारखी उठावणी देत आहेत. तेव्हां माझी आज्ञा ऐक! संधि कर आणि सर्व किल्ले देऊन टाक व मुलूखही देऊन टाक! सिंहगड, लोहगड, पुरंदर, चाकण हे किल्ले व भीमानीरामधला प्रदेश युद्ध न करतां शरण येऊन दिल्लीश्वराला देऊन टाक आणि जावळीचा हा किल्ला आदिलशहाला देऊन टाक. याप्रमाणें तह कर. नाहींपेक्षां रणदेवता जो निकाल देईल तो पत्कर." अशा अर्थाचे विजापूरच्या त्या मातब्बर सरदाराचें आलेलें पत्र शिवाजीनें वाचून पाहिलें आणि मनांतल्या मनांत तात्काल उपाय योजिला. (शि. भा. अ. १८ (४८–६४).

या पत्राचें उत्तर पाठविण्यापूर्वीं महाराजांनीं खानाच्या वकिलाला मोठ्या चातुर्यानें विश्वासांत घेतलें. कोणालाही वळवून विश्वासांत घेण्याला लागणारे आकर्षक गुण महाराजांच्या अंगीं होते. त्यांच्या बोलण्या-चालण्याची छाप कोणावरहि तावडतोब पडे. महाराज कृष्णाजी भास्करला जे बोलले त्याचा सारांश खालीलप्रमाणें सांगतां येईल :–

" कोण म्हणतो तह करूं नये म्हणून ? अलबत ! आम्हीं खानाची मुलाजमत घेऊं ! तह करूं ! त्यांचे मुलूख त्यांना देऊं. आम्हीं खानाआगळे मुळींच नाहीं. लढाईच कशाला हवी ? पण हें पहा ! कृष्णाजीपंत ! तुम्ही अहात ब्राह्मण. खरे बोला. तुमचा सत्याचा पडताळा मला पाहूं द्या ! तह काय होऊन जाईल ! मुलूख राहील नाहींतर जाईल ! आमचें मन गंगेसारखें निर्मळ आहे. बोला ! व्हावयाचें तें सर्व होईल. पण खानाचा खराखुरा काव ? मनाचा पडदा खोलून सांगा ! मी स्वतः जें कार्य आरंभिले आहे तें परमपवित्र आहे. हिंदूंच्या देवाधर्माचें रक्षण करून स्वातंत्र्यसंपादनाचें पवित्र कार्य मी करीत असतां तुम्ही त्याच्या-आड कां यावे ? यावनी सत्तेनें गुलामागिरीच्या गर्तेत आम्हाला गाडून टाकावें आणि तींतच आम्हीं कायमचें कुजत पडावें काय ? पोटाला खायला कुळीथ नाहीं, पांघरायला पटकूर नाहीं अशी हीन दीन झालेली अवघी दख्खन दुःखांत बुडून गेली आहे ! धार्मिक व राजकीय छळांच्या खाईंत होरपळून गेली आहे. ( बु. स. व यदुनाथ सरकार. ) तिच्या रक्षणासाठीं, तिच्या धर्मासाठीं, तिच्या स्वातंत्र्यासाठीं मी तिच्या पाठीशीं उभा राहिलों यांत मी कोणतें पाप केले ? सांगा ! कृष्णाजीपंत ! तुम्ही आम्हीं एकधर्मी ( शिव-दिग्विजय ). आपण आम्हांस मदत करावी अशी आपणास विनंति आहे. ( चित्रगुप्त ) तुम्हाला तुमच्या देवाधर्माची शपथ आहे. खानाच्या मनांत मजविषयीं कपट आहे कीं नाहीं तें सांगा ! " अशा अर्थाचें हृदयस्पर्शी भाषण महाराजांनीं केल्यावर कृष्णाजी भास्करानें मन मोकळें करून खानाच्या मनांतील शिवाजीला पकडण्याचें वा ठार करण्याचें प्रतिज्ञापूर्वक रचलेलें कपट

उघड केलें. आणि "जिवाला जपा" असा आदरानें इशाराहि दिला. "तुम्हांला भेटींत दगा देण्याचा त्याचा विचार आहे. सबब भेटीचा प्रसंग जुळवून आणण्यासाठीं व तुमची सर्व तयारी पाहण्यासाठीं त्यांनीं मला धाडलें आहे" असेंहि कृष्णाजी वकीलांनीं महाराजांना सांगितले. या शिवाजीकृष्णाजी मुलाखतीचा पुष्कळसा वृत्तांत शिवदिग्विजय बखर, चिटणीसी बखर, चित्रगुप्ताची बखर, बुसातिनेसलातिन वगैरे ग्रंथांतून आढळतो. तथापि कृष्णाजीनें खानाचें कपट सांगितलें व शिवाजी महाराजांना सहाय्य केलें म्हणून शिवाजीमहाराजांनीं त्याला एक गांव इनाम देऊन वाईचा कुलकर्णी असल्यामुळें त्याला वाई परगण्यांत बरेचसे हक्क तोडून दिलें, कां अफजलखानाच्या आज्ञेमुळें मंडपांत खान शिवाजी भेटीच्यावेळीं कृष्णाजीनें महाराजावर तलवार चालविली म्हणून त्याला तेथेंच ठार मारण्यांत आलें हें एक या घटना वृत्तांतांतील विवाद्य स्वरुपाचें स्थळ दिसतें. या मुद्याचा उहापोह पुढें केला आहे.

## खानाच्या संदेशास शिवाजीचें उत्तर

खानाचें कपटी कारस्थान कृष्णाजी भास्कर यांचेकडूनही कळल्यानंतर पुढें विश्वासांतील निवडक मंडळींशीं चर्चा करून पत्राचें उत्तर महाराजांनीं मोठ्या मार्मिकपणें तयार केलें. एकांतांत आपले हुशार व विश्वासू वकील पंताजी गोपिनाथ यांना बोलावून घेऊन त्यांचेशीं पुढील बेताचीं बोलणीं केलीं व खानाच्या वकिलाचा महाराजांनीं जातेवेळीं उंची वस्त्रें देऊन गौरव केला आणि सन्मानानें त्यास निरोप दिला.

जिजाबाईबरोबर सोंगट्या खेळण्याइतका घरोब्यांतील व विश्वासू असा महाराजांचा चतुर वकील पंताजी गोपिनाथ हा

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


या अफजलखानप्रसंगाचा सूत्रधार दिसतो. महाराजांनीं मार्गदर्शन करावें व पंताजी गोपिनाथानीं सर्व कांहीं त्याप्रमाणें जुळवून आणावें असा सुंदर बुद्धिबळाचा डाव उभयतांनीं या प्रकरणांत मोठ्या चातुर्यानें मांडलेला व खेळलेला दिसतो. पंताजी गोपिनाथ हा नुसता वकीलच नव्हता तर तो हुशार, चतुर, चाणाक्ष, मुत्सद्दी असून शिवाय चांगला लढवय्याहि होता. अशा अष्टपैलु पुरुषाची योजना या कामीं महाराजांनीं केली. महाराजांना मनुष्याची पारख बिनचूक करण्याची विद्या अभिजातपणें अवगत होती. महाराजांनीं पंताजी गोपिनाथांना जें सांगितलें त्याचा आशय सभासद बखरकाराच्या शब्दांत असा आहे– " तुम्हासही अफजलखान याजकडे रवाना करतो. तेथे जाऊन खानाची भेट घेऊन बोलीचाली करणें. खानास क्रिया शपथ मागणें, तुम्हीं ते शपथ मागतील तरी देणें. अनमान न करणें. हरप्रकारें जावलीस घेऊन येणें." याप्रमाणें पंताजींना सूचना व पत्रोत्तर देऊन त्यास खानाकडे रवाना केलें.

८।न ८८५३६

पंताजी गोपिनाथ व कृष्णाजी भास्कर हे उभय पक्षांचे वकील नंतर खानाकडे वाईतळीं गेले. महाराजांनीं खानाच्या पत्रास जें उत्तर लिहिलें होतें तें खानाच्या हातीं आदबीनें दिलें. खानानें तें वाचलें. त्यांत खानास उद्देशून लिहिलेल्या मजकुराचा सारांश खालीलप्रमाणें आहे.

" आपण कर्नाटकांतील समस्त राजे युद्धांत नष्ट केले. आपला प्रताप–दुंदुभि जगांत जिकडे तिकडे गाजून राहिला आहे! आपला पराक्रम अग्नितुल्य असून बाहुबल अतुल आहे! आपण या भूतलाचें भूषण आहांत! आपल्या ठिकाणीं कपटाचा लवलेशही नाहीं! असे किर्तिवंत असे प्रतापशाली आपण, मज गरि-

बाऱ्या भेटीसाठीं दुरुन आलात ही केवढी तरी दया मजवर आपण केलीत ! मजवर ही आपली कृपा झालेली पाहून मी मला मोठा भाग्यवंत समजतो ! आपणावांचून मोंगलांचें काय किंवा अदिलशहाचें काय सैन्य तृणवत् वाटतें. आपण इतके आला आहात तरि विनंति इतकीच कीं, तसेच आपण वर यावें. येथील वन-वैभव पहावें. मलाही आपल्या आगमनानें निर्भयता प्राप्त होईल ! येथें येऊन माझी गरिबाची कृष्णाकांठची कोंडाभाकर खावी. येथे आलांत म्हणजे एरव्ही ज्यांच्याकडे दृष्टिक्षेपहि करणें कठीण अशा आपणाकडे मी निशंक मनानें पाहीन. आणि आपल्या पुढें मी आपली तलवार ठेवीन. आणि आपण मागता ते किल्ले आणि ही जावळीही आपणाला देईन. इकडे येतानां मात्र दक्षतेनें यावें. वाट अंमळ वाकडी आणि वाईट आहे ! "

## भेटीच्या कल्पनेनें खान हुरळून गेला

हा महाराजांचा उत्तरादाखल आलेला संदेश ऐकून अफजल-खानाला अत्यानंद झाला ! त्याला वाटलें कीं आपले स्वामिकार्य आतां सिद्धीस गेलें आणि जावळीही आतां आपल्या हातीं आली ! महाराजानीं हें पत्र भेटीसाठीं जावळीस येणेंबद्दल खानास लिहिलें त्यांतील हेतु स्पष्ट आहे. आपण ठरविलेल्या रक्षणेत्रांत शत्रूला खेंचून आणणें हा तर वर नमूद केल्याप्रमाणें त्यांतील एक डाव होताच. शिवाय महाराजांना जिवंत पकडून विजापूरला नेण्याची अगर जमल्यास त्यांना ठार मारण्याची प्रतिज्ञा करून विजापुराहुन निघालेल्या खानानें वाईतळावरून तहाचीं बोलणीं प्रथम सुरू केलीं त्यांत खानाचा जो प्रधान हेतु महाराजांची प्रत्यक्ष भेट झालीच पाहिजे तो आणखी पक्का निश्चित करून घ्यावा हा होता. कारण खानाच्या मनांत किल्ले व इतर प्रदेश

घेऊन नुसता तहच करावयाचा होता तर तो वाईतळाहूनच त्यास सिद्धीस नेता आला असता! त्यासाठीं एवढे डोंगर, घाट नि कडेकपार चढून जाण्याचा खटाटोप कशासाठीं पाहिजे होता? कारण महाराजांनीं शरणागतीची व मागणीप्रमाणें मुलूख देण्याची कबुली पत्रांत दिलीच होती. तेव्हां खानानें तहाचें बोलणें सुरू केलें तें खरोखर तह करण्याच्या इच्छेनें केलें कीं महाराजांना पकडण्याच्या मार्गांतील त्यानें योजलेला तो एक टप्पा होता हे पक्कें अजमावून घेण्यासाठीं व खानाच्या मनाचा ठाव काढण्या-साठीं पत्रांत जावळीचे निमंत्रणाचा खडा महाराजानीं टाकून पाहिला! आणि तो बरोबर लागू पडला. पंताजीनें दिलेलें निमंत्रण खानानें ताबडतोब मान्य केलें. पण गडावर जाऊन शिवाजीची भेट घेण्याची कल्पना खानाच्या हाताखालील सरदारानां व त्यांच्या मंत्र्यांनां मुळींच पटली नाहीं. देवा खेरीज ज्यानें आपलें मस्तक कोणा पुढें कधींही नमविलें नाहीं तो आज आपल्या जावळीच्या निबिड अरण्यांत मोठ्या नम्रतेनें तुम्हाला बोलावित आहे तेव्हां त्याच्या या नम्रतेंत दुःस्साहस खचित भरलें आहे असें वाटतें! त्याच्या मनांतून आपल्याशीं खरा तह करावयाचा आहे तर आपण होऊन त्यानें जावळीवनांतून बाहेर येऊन आपल्याला मानाचा मुजरा करीत खालीं कां न यावें? तेव्हां आपण वर जाऊं नका." अशा प्रकारचा इशारा खानाला त्याच्या सल्लागारांनीं दिला. पण महा-राजांनीं टाकलेल्या भेटीच्या जाळ्यांत खानाचें मन इतकें गुरफटून गेलें कीं, कोणी त्या कल्पनेला विरोध केला तर त्याला तो खपेनासा झाला व तो त्याच्या पराक्रमाचा व त्याच्या बलाढ्य सैन्याचा अक्षम्य उपमर्द आहे असें त्यास वाटूं लागलें! जावळी

जागा कुवल, अडचणीची, तेव्हां शिवाजीचा हा डाव साधा नसावा असाहि विचार खानाच्या मनांत चमकून गेला! नाहीं असें नाहीं! परंतु खानानें पंताजी गोपिनाथाला त्याबद्दल शपथ घालून शंकेचें निरसन करून घेतलें. पंताजीनींही शपथेवर खुलासा केला कीं, "वाईतळ हा खाविंदांचा बलवान तळ पडला. त्यामुळें येथें यावयाला राजा कचादिल झाला आहे. भीतीनें तो गांगरून गेला आहे. त्याबद्दल खाविंदांनी क्षमा करावी. शिवाय शिवाजीराजे आपणास शहाजीचे ठिकाणीं मानतात. राजे आपल्या वाईटावर नाहींत. आपण खुशाल विश्वासानें यावें. भेटीचा वेळ व दिवस ठरवावा. सर्व कांहीं सुखासमाधानाने होऊन जाईल!" मग काय! "गड कितीही अवघड असला तरी तो मी टांचेखालीं चिरडून टाकीन, पृथ्वी पालथी घालीन, आकाश खालती पाडीन, काय वाटेल तें करावें लागले तरी तें करीन परंतु शिवाजीच्या भेटीसाठीं गडावर जाईन" अशा प्रकारची बेफाम विचारसरणी खानाच्या मनांत इतकी प्रबळ झाली कीं, कोणाचेंही न ऐकतां बेदरकारपणें १५००० सैन्य वाईतळाहून घेऊन गडावर जाण्याला तो झपाट्यानें निघाला देखील! वाई तळाहून निघण्यापूर्वी ज्यानीं शिवाजीच्या भेटीस वर जाण्याला विरोध केला त्या तिघांना खानानें जातां जातां कडक रीतीनें शिक्षा केल्या. एकाचे नाक कापलें! दुसऱ्याला जिवंत पुरलें! व तिसऱ्याला असें उत्तर दिलें कीं, "मी रुस्तूमजमाप्रमाणें मोठ्या कुळांत जन्म पावलों नसलों तरी मी शूराच्या पद्धतीनें चालणारा आहे." असा उल्लेख राजापूर येथील हेन्री रेव्हींगटन व रेंडॉल्फ टेलर कंपनीच्या ता. १०-१२-१६५९च्या इंग्रजी पत्रांत आढळतो. (पत्रसार संग्रह खंड नं. ७९१). अर्थात बाकीचें सैन्य त्यानें

वाईतळावरच ठेविलें. पंताजीही अर्थात निरोप घेऊन निघाले. परंतु परत जाणेंपूर्वीं त्यांनीं खानाच्या सैन्यांत लाचलुचपत देऊन खानाच्या हेतूचा ठाव घेतला. खानाचे वजीर मुत्सद्दी यांच्या-पाशींहि तपास केला. "शिवाजी हरामजादा आहे यांसि युद्ध करतां सांपडणार नाहीं. याजकरितां राजकारण लावून भेटी घ्यावी. भेटीचे समयीं धरावा, ऐसी खानानें तजवीज केली आहे" अशा प्रकारची माहिती त्यांनीं मिळविली आणि मग ते परत गेले.

प्रचंड उत्साहानें खान गडाकडे निघाला खरा परंतु त्या विकट वाटेंत रडतोंडीच्या घाटासारख्या दुर्गम ठिकाणीं त्याच्या अवजड लष्कराची फार फजीती झाली. डोंगरांच्या सोंडा, सुळके, खडे घाट, यांतून जातांना खानाच्या गजहय सैन्याची फारच तिरपीट उडाली! चढउतार चढतां उतरतांना गजराजांचे गुढघे सैल झाले! घोड्यांना स्वतःचे ओझें स्वतःला असह्य झालें! रत्न-राशींवर बसून कांहीं सांडणीस्वार वर चालले होते. ते उंटावरले शहाणेही कंटकीं रुतून पडले! घनदाट झाडीनें व्यापलेल्या कंटक-मय अरण्यांतून जातांना खानाचीं ध्वजछत्रचामरें गुरफटून फाटून गेलीं! तरीसुद्धां खान मोठ्या हिमतीनें व हिय्येनें पार घाटापर्यंत आला. व तेथें त्यानें कोयनेच्या काठीं सैन्याचा तळ दिला.

## कोयनाकाठीं भेटीचा करार

कोयनाकाठीं याप्रमाणें अफजलखानाचे १५ हजार सैन्य येऊन दाखल झाले. त्याचे भव्य तंबू, मस्त हत्ती, अवलख अश्व, उंटांचे तांडे, महान् योद्धे, लहानमोठ्या तोफा यांनीं कोयना कांठ गजबजून व निनादून गेला. येथें शिवाजी व अफजलखान या उभयतांनीं परस्परांचे क्षेमकुशल विचारण्यासाठीं व भेटीचा

दिवस व वेळ व अटी ठरविण्यासाठीं आपले वकील पाठविले होते. पंताजी वकील शिवाजीकडून खानाकडे आल्यावर त्यांचें बोलणें झालें. त्यांत शिवाजीचे मनांतून खानाबरोबर आलेल्या बड्याबड्या पाहुण्यांचा सत्कार करण्यासाठीं व त्यांना नजराणे देण्यासाठीं खानाबरोबर आलेल्या, रत्नेंमोतीं जडजवाहीर विकणाऱ्या व्यापाऱ्यांचेपासून तीं परीक्षा करून विकत घ्यावयाचीं आहेत म्हणून त्यांनीं त्यास वर बोलाविलें आहे असें खानाला सांगितलें. तावडतोब ते लोभी व्यापारी खानाच्या आदेशानुसार आपलीं रत्नें, माणकें, घेऊन शिवाजीला दाखविण्यासाठीं गेले व शिवाजीनें तीं सर्व आपल्या ताब्यांत घेऊन ठेविलीं ! या सौद्यांत अफाट संपत्ती मिळून आपली जन्माची जोड होईल अशी आशा धुटून ते लोभी पंचरंगी पोपट शिवाजीच्या गडावर तलवारीच्या खुंटीवर टांगलेल्या सोन्याच्या पिंजऱ्यांत जाऊन बसले ! बिचाऱ्यांना काय ठाऊक कीं गडमाथ्यावर चहूबाजूंनीं त्यांची कोंडी झाली तें ! मग कुठला मेवा आणि कुठली मैना ! पुढें भेटीचीं बोलणीं झालीं. त्यांत भेटीचा दिवस मार्गशीर्ष शु॥ ७ शके १५८१ रोज गुरुवार हा ठरविणेंत आला. राजभेटीबद्दल उभयतामध्यें जो करार झाला त्यांत असें ठरलें कीं, “भेट प्रतापगडाच्या पायथ्याशीं व्हावी. भेटीची वेळ दुपारची असावी. एकट्या खानानें भेटीसाठीं येतांना आपली सेना जिथल्या तेथें ठेवून, पालखींतून सशस्त्र यावें. त्यानें आपल्या सेवेसाठीं फक्त दोन किंवा तीन सेवक आपल्याबरोबर आणावेत. खानानें स्वतः भेटीच्या मंडपांत **प्रथम** येऊन शिवाजीची वाट पहात रहावें आणि शिवाजीनें **नंतर** येऊन त्या पाहुण्याचा आदरसत्कार यथाविधि करावा. खान व शिवाजी या दोघांच्याहि रक्षणासाठीं

सज्ज, स्वामीनिष्ठ, शूर व निष्ठावान अशा दहा दहा सैनिकांनीं बाणाच्या टप्यावर येऊन मागें उभे रहावे आणि दोघानींही भेटल्यावर लोकांना अत्यानंद होईल अशीं गुप्त बोलणीं करावीत." अशा शर्ती ठरल्या. एकमेकांना बोलणें फिरविण्याला या करारानें जागाच ठेविली नाहीं. ( शिवभारत )

## खानाची बरदास्त आणि स्वतःचा बंदोबस्त

गडापासून दूर कोयनाकाठीं खानाची छावणी पडली होती. तरी शिवाजीनें त्याचा इतमाम फार चांगला ठेविला होता. गडापासून छावणीपर्यंत वाण्यांची काय, हलवायांची काय, भडभुंजांची काय, जणुं कांहीं नवी पेठच त्याच्यासाठीं वसविण्यांत आली होती. यवनांचें जें प्रियतम खाद्य म्हणजे प्रत्यक्ष गोमांस, ज्या शिवाजीनें अदिलशहाच्या शहरीं कसायानें गोमांसाची विक्री उघड्यावरती केली म्हणून त्याचें शीर तलवारीच्या फटकाऱ्यानें छाटून टाकलें त्या शिवाजीनें खानाकरितां आपण थाटलेल्या त्या दुकानांतून विक्रीसाठीं कोयनाकाठीं मांडून ठेविलें ! ( शिवदिग्विजय पान १६४ ) त्यानें गडापासून तळापर्यंत जाऊन जातीनें प्रत्यक्ष गुप्त पाहाणी केली; आणि स्वसंरक्षणाची सर्वांगपरिपूर्ण व्यवस्था केली. खानाच्या फौजेचे तळ नीट न्याहाळून ठेविलें आणि त्या रोखानें तोफांची बिनचूक मांडणी केली. परस्पर शिवाजी घाटांतून पळून जाऊन महाड गांठील म्हणून खान पारघाट घेण्याचें उद्देशानें टपून बसला होता ! परंतु खानाचें सैन्य कोणत्याहि परिस्थितींत पार-घाट ओलांडून अलीकडे येऊं नये म्हणून तोफांचे मोर्चे गडमाथ्या-वरुन त्या सैन्यावर शिवाजीनें बिनचूक लावून ठेविलें आणि चंद्रगडासंन्निध चौक्यापहारे ठेवून नाकेबंदी केली. दाराला जसा

अडसर तसें पारघाटाला मोरोपंतांचें मनगट युद्धाचेवेळीं आडवें लावण्याचा हुकूम केला.

भेटीअंतीं तह झाला असें समजावयाचें कीं, युद्धास प्रारंभ करावयाचा हें आपल्या लोकांना कळावें म्हणून तहाचे व रण-संकेताचे वेगवेगळे ध्वनी ठरविले व त्यांची समजूत त्यांना करून दिली. घोड्यांचीं खिंकाळणीं खानाच्या कानीं पडूं नयेत व आपली युद्धसिद्धता आहे हें खानाला कळूं नये म्हणून गडाच्या वायव्येस दूर तीन मैलावर असलेल्या कुडेसराच्या पठारावर पांच हजार घोडदळ देऊन शिवाजीनें नेताजीला तेथें खडा ठेविला. आणि रणसंकेताची तोफ धडाडतांच त्यानें आपला घोडा दौडवून खानाच्या वाईतळावर घालावा व त्याचा पूर्ण विध्वंस करावा असा हुकूम त्याला दिला. परंतु त्यानें वाईतळावर असें चालूनजाण्या-पूर्वी युद्धाची तोफ होतांच जावळी वनांत जातां जातां प्रथम शत्रुसैन्याच्या उजव्या बगलेवर हल्ला करण्याचा हुकूमही त्यास देऊन ठेविला. या जावळीवनांतील होणाऱ्या युद्धांत नेताजीनें आपली कुमक जरुर तर मोरोपंताला द्यावी. परंतु तशी जरुरी पडते न पडते हें कळण्यासाठीं त्या युध्दाचा रागरंग हेरत हेरत नेताजीनें पुढें वाईतळावर दौडावें अशी सूचना त्यास केली. गडावर आपलें सैन्य एके ठिकाणीं जमलेलें आहे असें दृश्य खानास गडावर येत असतांना दिसतां कामा नये म्हणून आपल्या सैन्याला प्रथम जाळीजाळींत लपून छपून इथें थोडें तिथें थोडे असें पांगून पांगून रहाण्याबद्दल व भेटीची वेळ ठेपतांच त्या सैन्यानें चौफेर गडाला वेढा देण्याबद्दल व किल्ला चहुबाजूंनीं अगदीं आवळून टाकण्या-बद्दल शिवाजीनें हुकूम दिले. हेतु हा कीं खानाच्या गडावरील लोकांची व खालील सैन्याची पूर्ण ताटातूट करून त्याच्या सैन्यांचा

" एक गड्डा " पुन्हां केव्हांहि होऊं द्यावयाचा नाहीं. याच हेतूनें पारघाट तें वाई यामध्यें असलेल्या बोचेघोळीच्या घाटांत बाबाजी भोसले या आपल्या रणमर्द सरदाराला खानाच्या तेथील दोन दळांच्या दरम्यान पाचर ठोकल्यासारखा उभा केला. शिवाजीनें स्वतःच्या मुख्य सैन्याचे दोन विभाग केले. त्यापैकीं एक कुडेसरावर नेताजीच्या हाताखालीं व दुसरा गडाच्या नैऋत्येला असलेल्या किनेश्वर डोंगराच्या घाटाच्या उत्तरेला व आसपासच्या रानांत मोरोपंताच्या हाताखालीं ठेविला. खानानें दगा दिला तर त्यांनीं हालचाली कशा करावयाच्या याबद्दल शिवाजीनें इशारे दिले. खानाचें बळ संघटित होऊं नये व वरील बातमी कांहीं केल्या खालीं जाऊं नये म्हणून त्याच्या कुठल्याही दोन सैन्याचा मिलाफ होता कामा नये अशी सक्त आज्ञा देऊन तशी व्यवस्था पुरी केली. गडाला जाण्याच्या वाटा अनेक होत्या त्या सर्व, कोठें झाडें तोडून तर कोठें खड्डे खणून, बंद केल्या व फक्त एक वाट गडाला खुली ठेविली ! गडावर खानानें एकदम छापा घालण्याचें ठरविलें असल्यास आपल्याला माहिती लागावी म्हणून कोयने-पासून गडापर्यंत ठिकठिकाणीं आपल्या चौक्या पहारे व टेहळणी तुकड्या शिवाजीनें बसविल्या. खरोखर वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी शिवाजी महाराजांनीं दाखविलेली ही सेनापतीत्वाची सर्वांगीण कुशलता, सावधानता व चतुरस्रता पाहिली म्हणजे मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. असो.

## भेटीचा मंडप

उभयपक्षीं ठरल्याप्रमाणें पसंत केलेल्या ठिकाणीं म्हणजे प्रताप-गडाच्या पायथ्याशीं असलेल्या सुंदर हिरव्यागार मैदानावर शिवाजी महाराजांनीं खानाच्या इतमामाला शोभेल असा अत्यंत

सुंदर व वैभवशाली मंडप उभा केला. आंत उत्कृष्ट बिछायत मांडली. जिवाचें भान हरपून जावें असा सुंदर गालीचा अंथरला. गाद्या पडगाद्या घातल्या. नानारंगी लोड, तक्के, तिवासिया यांनीं बैठक सुशोभित केली. चिकाचे पडदे लावले. अति तलम अशा ब्ऱ्हाणपूरच्या सुंदर सुंदर चिटांचेही पडदे रुळविले. मांडवाचा चांदवा जडिताचा केला. सूर्याचे डोळे दिपविणारीं हिरे माणकें ठिकठिकाणीं त्यांत बसविलीं. छताला टपोऱ्या पाणीदार मोत्यांची झालर लाविली. मंडपाच्या चारी बाजूला चार डौलदार सोन्याच्या समया झगझगत तेवत ठेविल्या. मध्यभागीं उंच वैभवशाली व्यासपीठ तयार केलें व अफझलखान जेथें बसावयाचा तेथें तो बसल्यावर त्याच्या मुखमंडलावर लाल प्रकाश पडेल असें अत्यंत सुंदर लाल माणिक वर छताला लावलें होतें असेंही म्हणतात. अशा रीतीनें शिवाजीमहाराजांनीं सदर सजवून खानाच्या स्वागतासाठीं व भेटीसाठीं सिद्ध केली.

## भेटीचा दिवस

अखेर खानशिवाजी भेटीचा तो रोमांचकारी दिवस उजाडला! ता. १० माहे नोव्हेंबर १६५९ म्हणजे मार्गशीर्ष शु ॥ ७ शके १५८१ रोज गुरुवार हा दिवस होता तो. षष्ठीचा जवळ जवळ लोप होता. कारण ती त्या दिवशीं सूर्योदयानंतर फक्त तीन पळेंच होती. याप्रमाणें पंचमीची तीथ झाल्यावर सप्तमी लागलेली होती. इथें क्षणभरच वाचकांनीं विषयांतराबद्दल क्षमा करावी. कारण मार्गशीर्ष महिना व पंचमीची तीथ ही डोळ्यापुढें आली म्हणजे शिवचरित्रवाचकाच्या मनश्चक्षूपुढून भोसलेकुळाला या तिथिमासाच्या शुभाशुभत्वाबद्दलचा विचार एकदम चमकून गेल्याशिवाय रहात नाहीं. मार्गशीर्ष महिना छत्रपति श्री शिवाजी

महाराजांना व त्यांचे घराण्याला शुभच होता असें आतां म्हणता येतें. पहा! शहाजीजिजाऊ यांचा मंगल विवाह झाला मार्गशीर्ष शु ॥ ५ ला! शहाजीला पाण्यांत पाहणारा व कपटानें कैद करणारा मुस्तुफाखान चंदीला मरण पावला मार्गशीर्ष शु॥ ५ लाच! पुढें आगऱ्याहून सुटून अनेक संकटांना तोंड देऊन शिवाजी महाराज परत राजगडीं येऊन सुखरूप पोचलें मार्गशीर्ष शु ॥ ५ लाच! आणि शहाजीला कैद करून आपल्या हुकमतीखालीं विजापुरला नेणाऱ्या त्या बलाढ्य अफझलखानाच्या भयंकर भेटीचा प्रसंग शिवाजीवर गुदरला व त्या काळाच्या जबड्यांतून तो सहीसलामत सुटला तोही मार्गशीर्ष शु ॥ ५ उलटल्याबरोबर दुसऱ्या दिवशीं म्हणजे सप्तमीला! फक्त एक दिवसाचा काय तो फरक पडला! त्या तिथी तारखा, त्या दिवशीं घडलेल्या घटना आतां लक्षांत घेतल्या म्हणजे मार्गशीर्ष महिना हा या भोसल्यांना शुभ होता असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. " मासानां मार्गशीर्षोऽहम् " असें भगवंतानीं गीतेंत म्हटलें आहे त्याची आठवण येथें होते. असो. खानशिवाजीच्या ह्या ठरलेल्या भेटीच्या दिवशीं खान शिवाजीस भेटण्यासाठीं पारतळावरून पालखींत बसून निघाला. त्यानें आपल्याबरोबर हजार दीडहजार लष्कर घेतलें. सभासदी बखरींत " बराबरी हजार दीडहजार बंदुकी मुस्तेद (तयार) होऊन चालिले "–असें वर्णन दिलें आहे. शिवाजीनें पुढें जयसिंगास लिहिलेल्या पत्रांत भेट घेण्याची परवानगी मागितली त्या संबंधांत लिहितांना–" अफझलखानाचा शेवट कसा झाला हें लक्षांत आणून तूं शंकित होऊं नकोस. त्यानें बाराशे लढवये हबशी माझा घात करण्यासाठीं ठेविले होते. "–असें म्हटलें आहे. सदरील पत्र हें विश्वसनीय आहे असें मानिल्यास त्यावरूनही हें लष्कर

खानानें यावेळीं आपल्याबरोबर घेतलें होतें असें दिसतें. भेटीच्या ज्या अटी वर नमूद केल्या आहेत त्यांत सैन्य जेथल्या तेथें ठेवावयाचें ठरलें असतांना खानानें शर्तींचा भंग करून हें लष्कर घेतलें हें सिद्ध होतें. महाराजांचा वकील पंताजी गोपिनाथ व खानाचा वकील कृष्णाजी भास्कर हे दोघेही बरोबर होते. महाराजांचा वकील पंताजी गोपिनाथ हा त्यावेळीं खानास या करारभंगाबद्दल कांहीं बोलला नाहीं. खान अगदीं आवेशांत निघाला होता. कोणी त्यावेळीं त्यास उलट बोलण्याची सोय नव्हती. पुढें हळूहळू मार्ग आक्रमण झाल्यावर खानाची स्वारी जनीटेंबेच्या दरीच्या ठिकाणीं आली. तेव्हां मात्र पंताजी गोपिनाथ त्याला नम्रतेनें बोलले "खाविंद! आपण आपल्याबरोबर हें सैन्य घेतलें आहे त्याची आवश्यकता काय आहे? इतक्या जमावानें राजा दहशत खाईल! माघारा जाईल किंवा महाडचे वाटेनें पळून जाईल! भेट होणार नाहीं! आणि अदिलशहाचें राजकारण कदाचित् फिसकटून जाईल! शिवाजी म्हणजे काय? त्याला इतकें लष्कर कशाला पाहिजे? राजा दोघातिघां माणसां-निशीं तिकडून येईल. तुम्हीं इकडून दोघांतिघांनीं चलावें. दोघांनीं बसून भेटावें व तेथें तजवीज करणें ती करावी. तेव्हां विनंती कीं, आपलें हें सर्व सैन्य या दरींतच ठेवावें. सैन्याला लपून राहण्यास ही जागाही छान दिसते. सुरम्य वनवृक्षांची व लतांची घनदाट शीतल छाया आपल्या सेनेला इथें विश्रांतिस्थान म्हणून उपभोगण्यास मिळेल आणि आपल्या हातून कळत नकळत कराराचा भंग होऊन ही सेना येथपर्यंत आणली गेल्याचें राजाला वर कळणारहि नाहीं; अशी ही खोल पण सुंदर दरी आहे खाविंद!" खान शिवाजीच्या भेटीच्या कल्पनेला पूर्ण बळी

पडलेला असल्यानें व त्यांत तो कोणताही व्यत्यय येऊं देण्यास तयार नसल्यानें त्यानें आपले १५०० लष्कर जनीटेंब्रेच्या दरींत ठेवण्यास संमति दिली. "राजभेटिच्या मोहाची अशि घालुन वेसण खाशी । विजापुराचें अस्वल नाचवि दख्खनचा दरवेशी"॥ असें मी माझ्या "शिवशाहीचा अरुणोदय" या काव्यपुस्तकांत म्हटलें आहे तें यथार्थ नाहीं काय?

## जनीचे टेंब

जनीटेंब हें ठिकाण गड ज्या डोंगरावर आहे त्याच्या आग्नेयेचे सोंडेवर आहे.—"जनीचे टेंब"—असें त्याला संबोधितात. या सोंडेपासून सुमारे अर्ध्या फर्लांगावर अग्नेयेच्या बाजूस कोयना पारच्या अंगाला महारवाड्याचे टेक या नांवाचा डोंगर आहे. तो डोंगर व जनीटेंबाची सोंड यांचे दरम्यान असलेल्या या दरींत खानाचे निवडक १५०० लोक ठेवण्यांत आले. या दरीच्या उत्तर अंगाला धावणीच्या टेकाची सोंड आणि दक्षिणेला कुमठ्याचा मोठा ओढा आहे. भौगोलिक दृष्ट्या ही दरी म्हणजे एक मोठी अडचणीची जागाच असल्यानें व तिच्या डाव्या उजव्या बाजूला आपली फौज दबा धरून बसली आहे ही गोष्ट पंताजी गोपिनाथ वकीलाला माहिती असल्यानें व या १५०० लोकांचे व पारघाटावरच्या खानाच्या सैन्याचें दळणवळण होणें आतां जवळ जवळ अशक्य झाले असल्यानें पंताजी गोपिनाथानीं हें अवघड ठिकाण खानाच्या या १५०० लोकास थांबून ठेवण्यासाठी जें निवडलें त्यांत त्या हिकमती वकिलाची युद्धकलाकुशलता मुत्सद्दीपणा व दूरदृष्टीही दिसून येते.

याप्रमाणें हें सैन्य जनीटेंब्रेच्या दरींत ठेवून खान बाकीच्या उरलेल्या लोकासह प्रतापगडाच्या पायथ्याशीं मंडपांत दुपारीं बारा

वाजण्याचे आंत येऊन दाखल झाला. पालखी मंडपाबाहेरच ठेविली. भोईही बाहेरच उभे राहिले. खुद्द खानाचे बरोबर प्रत्यक्ष मंडपांत त्याचा वकील कृष्णाजी भास्कर, पंचहत्यारी महायोद्धा " बडा सय्यद " उर्फ ' सय्यद बंडा ', आणखी एक सेवक असे तिघे होते. बाकीचे रक्षक बाणाच्या टप्प्यावरती ठेवण्यांत आले. मंडपाची अद्‌भुतरम्य शोभा पाहून खान आश्चर्यस्तंभित झाला. मनांत जळाला. आणि—" शिवाजी म्हणजे काय ?—शहाजीचा लेक; वजीराजवळ असले वैभव नाहीं; बादशहाचा सगळा दौलत खजिना मी पाहिला पण असला मोलाआगळा मोतीदाणा मला तेथेंहि दिसला नाहीं ! याप्रकारचें हें सामान त्यानें कोठून मिळविलें ? " अशा अर्थाचे उद्‌गार त्यानें काढले. मोतीलग सदरेच्या शोभेमुळें खानाच्या मनांत मत्सरानें पेट घेतलेला पाहून महाराजांच्या वकिलानें त्याची क्षणांत समजूत केली आणि— " या राज्यलक्ष्मीबद्दल खाविंदांनीं चिंता कां बाळगावी ?—ती बादशहाचीच असून बादशहाच्या घरालाच आतां जाणार आहे."—असें आश्वासन देऊन त्याचें मन शांत केले. खानानें अंगांत फक्त मझलीनचा झगाच घातला होता. आणि खांद्यावर शेला ठेवला होता. त्यानें चिलखत घातलें नव्हतें. परंतु तो हत्यारबंद मात्र होता.

## खान–शिवाजी भेट

खान गडाकडे येण्याला निघाला हें महाराजांना कळल्यावर त्यांनींही आपली गडावर भेटीची तयारी सुरू केली. त्यांची त्या दिवसाची दिनचर्या परमानंदानें शिवभारतांत दिली आहे ती उल्लेखनीय आहे. भेटीच्या दिवशीं सकाळीं महाराजांनीं नित्याप्रमाणें स्नान करून उपाध्यायांनीं सांगितल्याप्रमाणें भगवान श्री शंकराची पूजा केली. नित्याचा दानविधी उरकला. अंगांत

चपळता रहावी म्हणून त्यांनीं अल्पोपहार केला. शुद्ध परिमित जल वारंवार आचमनाप्रमाणें ते प्याले. त्यांनीं तुळजादेवीचें मनांत क्षणभर चिंतन केलें. समयोचित वेष केला. अंगांत उत्तम चिलखत घातलें. मरणान्त युद्धासाठीं निघालेल्या रजपुताचा केशराचा शिडकाव मारलेला लांब अंगरखा घातला. डोक्याला तुरा खोंवलेली शुभ्र पगडी घातली. तलवार आणि पट्टा हीं दोन्ही कमरेला लटकावलीं. त्यामुळें ती शिवरायांची वज्रकाया विशेष शोभत होती. नंतर त्यांनीं आपले तेजस्वी मुख आरशांत पाहिलें. लगेच आसनावरून उठले. पुरोहितांना व इतर ब्राह्मणांना नमस्कार केला आणि सर्वांचा शुभाशिर्वाद घेतला. दधिदुर्वाक्षतादि शुभवस्तूंना हस्तस्पर्श केला. सूर्यबिंबाचें दर्शन घेतलें. पुढें उभ्या असलेल्या सवत्स धेनूजवळ येऊन लगेच ती सुवर्णासहित गुणवान द्विजाला अर्पण केली. आपल्या पाठोपाठ येण्यासाठीं सज्ज असलेल्या पराक्रमी अनुयायांना प्रतापगडच्या रक्षणास नेमिलें. अधल्या दिवशीं सर्व चौक्यापहाऱ्यांची पहाणी स्वतः करून सर्व व्यवस्था त्यांनीं केलीच होती. मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत (पान २३) उल्लेखिल्याप्रमाणें भेटीच्या मंडपाजवळ मागील बाजूस पश्चिमेकडे किल्याच्या मुख्य दरवाज्याजवळील दरडींत एक गुप्त घळ खणून तयार केली होती. ती शत्रूला दिसत नव्हती पण तींतून शत्रु. मात्र दिसत होता. तींत हिरोजी फर्जंदाला निवडक चाळीस शूर शिपायी देऊन मंडपांत कांहीं बरेवाईट झालें तर शत्रूवर तात्काळ तुटून पडण्यासाठीं आदेश देऊन तयार ठेविलें. आणि त्याप्रमाणें सर्व तयारी करून महाराजांनीं पुन्हा सर्वांचा निरोप घेतला.—" जगलों वाचलों तर ठीकच ! नाहींतर

गडमुलूख सांभाळा! आणि स्वराज्य राखा! माझ्या अस्थि प्रयागतीर्थीं नेऊन सोडा. "—म्हणून महाराजांनीं उद्गार काढले! "खानावर आम्हाला जाऊं द्या. आम्हीं त्याचा चुरा करून येतो. आपण लाखाचे पोशिंदे! आपला जीव आपण धोक्यांत घालूं नका!" म्हणून अनेक शूर सरदारांनीं आवेशपूर्ण कळकळीनें आग्रह केला. परंतु "ज्याचें काम त्यानेंच पूर्ण केलें पाहिजे" असें सांगून महाराजानीं त्यांना शांत केलें आणि नंतर महाराजांची स्वारी पाहुण्याला सामोरे जाण्यासाठीं स्नेहभावानें गडाखालीं निघाली. बरोबर संभाजी कावजी आणि जिऊ महाला हे दोन निवडक सशस्त्र सरदार घेतलें. पाठोपाठ तो इमानी रणगाजी तानाजीही ढालतलवार घेऊन निघाला. चौघेही गड उतरून खालीं आले. पायथ्याशीं आल्यावर मंडपाकडे निघाले. मंडपांत कोण कोठें आहे हें महाराजांनीं तीक्ष्ण दृष्टीनें वाटेंतच दुरून नीट न्याहाळून पाहिलें. ज्याला पाहिलें म्हणजे रणांत महायोद्धे हंबरडे फोडत तो पंचहत्यारी मर्दाना सय्यद बंडा ऊर्फ बडा सय्यद तेथें असलेला पाहून लगेच तानाजीच्या कानांत कांहीं गुजाहित सांगून तेथेंच त्याला थांबण्यास आज्ञा दिली. आणि आपण, कावजी व जिऊ यांचेबरोबर आणखी थोडे पुढें झटकले आणि पुढें एकदम थबकले! आणि आपले वकील पंताजी गोपिनाथ यांना सदरेंतून आपल्याकडे बोलावून घेतलें. क्षणार्धांत त्यांच्या कानगोष्टी झाल्या. पारघाटापासून मंडपापर्यन्त खानाबरोबर असतांना वाटेंत काय अधिक घडलें तें कळणें जरूर होतें. म्हणून मंडपांत जाण्यापूर्वीं ही क्षणभर तातडीची मुलाखत महाराजांनीं घडवून आणली असावी. "१५०० हत्यारी घोडेस्वार खानानें करार मोडून वर आणलें ते जनीटेंबेच्या दरींत ठेवले आहेत"

हें चटकन् हळूच महाराजांच्या कानीं पंताजीनें घातलें. महाराजांना व मोरोपंतांना ही बातमी हेरामार्फत पूर्वींच कळली असून तिचा बंदोबस्त अगाऊच करून ठेवला असल्याचें महाराजांनीं पंताजींच्या कानांत सांगितलें. आणि मग त्यांना " आपली व खानाची भेट होईपर्यन्त सय्यद बंडाला क्षणभर सदरेबाहेर ठेवण्यासाठीं खानाचें मन कांहीं करून वळवा; बंडाला बाहेर ठेवल्याबरोबर मी येतोच " असे महाराजांनीं सांगितलें. पंताजी लगबग सदरेंत गेले आणि विजापुरच्या त्या मातबर सरदाराला त्यांनीं नम्रतापूर्वक निवेदिलें कीं, " शिवाजी राजे भेटीस आले आहेत पण आपल्याला आणि आपल्या प्रचंड पराक्रमी व सामर्थ्यशाली सय्यद बंडा सरदाराला मंडपांत पाहून ते अत्यंत भ्याले आहेत! विजापूरशाहीच्या किल्ल्यांचा जणुं बुरुजच असलेल्या या प्रचंड रणमर्दाला बघून राजांच्या काळजाचें पाणी झालें आहे! तेव्हां त्यांनीं आपणास विनंती केली आहे कीं, " भेट होईपर्यंत क्षणभर सय्यद बंडाला सदरेबाहेर ठेवावे. शिवाजीराजे खाविंदांना भातिजा व्हावेत व शिवाजीराजेही खाविंदाना शहाजी राजांच्या ठिकाणींच मानत आहेत. कितीतरी खटपटी करून ही भेट मी जुळवून आणली आहे. थोडक्यासाठीं ही सुवर्णसंधि खाविंदानीं वाया घालवूं नये. " अशा प्रकारें बोलून, खानाची मनधरणी करून, त्या गर्विष्ठ घमेंडखोर फाजील आत्मविश्वास असलेल्या खानाकडून बंडाला बाहेर ठेवण्याबद्दलचा हुकूम पंताजींनीं मिळविला. तानाजीलाही शिवाजीनें दूर बाहेर ठेविलें आहे तेव्हां त्याचाही एक रक्षक कमी झालेलाच आहे असें खानाला वाटून, शिवाय शिवाजीची ही बावळट ठेंगणी मूर्ती माझें काय वाकडें करणार ही कल्पना त्यास येऊन बंडाला सदरेबाहेर जाणेबद्दलचा

हुकूम त्यानें फर्माविला. हुकुमाप्रमाणें बंडा सदरेबाहेर गेला. हें प्राहिल्याबरोबर शिवाजीमहाराज सिंहासारखे झपाझप पावलें टाकीत वर निर्दिष्ट केलेल्या फक्त दोन शरीररक्षकासह सदरेंत येऊन दाखल झाले. आणि भेटीसाठीं मांडलेल्या उंच व्यास-पीठावर चढले. खान उभा राहिला. त्यानें आपल्या हातांत असलेली जमदाड आपल्या सेवकाजवळ दिली आणि आपण निःशस्त्र झाल्याचा देखावा त्यांनें निर्माण केला. मात्र अस्तनींत गुप्त रीतीनें कट्यार लपवून ठेवून दिली. महाराज सामोरे गेले ! उभयतांची दृष्टादृष्ट झाली ! औपचारिक परिचय झाला ! परमा-नंदाच्या वृत्तांताप्रमाणें खान महाराजांना भिवविण्यासाठीं पण खोटा स्नेह दाखवून उद्दामपणानें असें बोलला कीं,—“ अरे ! स्वैर आचार करणाऱ्या व वृथा युद्धोत्साह बाळगणाऱ्या शहा-जीच्या पोरा ! नीतिमार्ग टाकून विनाकारण कुमार्ग कां धरतोस ? अदिलशहाला मानीत नाहींस ! कुतुबशहाची अवज्ञा करतोस ! दिल्लींद्राची सेवा करीत नाहींस ! या तुझ्या उद्धटपणाबद्दल मी तुला शासन करण्यासाठीं आलों आहे. तेव्हां माझें म्हणणें ऐक. हे गड सोडून दे. लोभ धरूं नको. मला शरण ये. मी तुला माझ्या हातानें धरून विजापूरला नेऊन अलिआदिलशहापुढें तुझें शिर नमवून आणि मीही प्राणिपात करून त्याला विनंती करीन आणि तुला मोठें वैभव मिळवून देईन. घमेंड सोड. ये ! तुझा हात माझ्या हातांत देऊन मला आलिंगन दे ! ”—यापुढें खरें काय होणार होतें, हें एक परमेश्वरालाच माहीत ! म्हणून परमानंदानेंही आपल्या शिवभारतांत असें म्हटलें आहे कीं:—

“ शिवस्याफजलो वेद हृदयं स च तस्य तत् ।
तं विधिं तु विधिर्वेद वेद संधिविधिं जनः ॥ ”

" शिवाजीचें अंतःकरण अफजलखानानें ओळखलें, आणि अफजलखानाचेंही शिवाजीराजानें ओळखलें. दैवाच्या मनांत काय आहे हें फक्त विधात्यानेंच ओळखलें. इतर लोकांस तो तह होत आहे असें समजलें ! " याप्रमाणें त्या दिवशीं ऐन मध्यान्हकाळीं महाराष्ट्राचें स्वराज्यसाधन आणि अदिलशाहीचें अस्तित्व हीं दोन्हीं दैवाच्या काट्यांत देवानें तुलनेसाठीं घातलीं होतीं ! काटा सारखा हलतडुलत होता ! तो अगदीं अस्थिर होता ! कोणास कांहींच निश्चित सांगतां येत नव्हतें. अशा मनःस्थितींत उभयता खानशिवाजी यांनीं भेटीसाठीं आपलें दोन्ही हात शिरस्त्याप्रमाणें उंच केले. महाराज पुढें सरकलें. अलिंगनासाठीं पुढें आलेल्या महाराजांचें शिर उंच खानाच्या छातीला भिडतांच खानानें महाराजांची मुंडी आपल्या डाव्या बगलेंत एकदम घट्ट दाबून धरली. आणि निमिषार्धांत अस्तिनींत लपवून ठेविलेली कट्यार उजव्या हातानें महाराजांच्या डाव्या कुशींत मारली ! परंतु त्यांच्या अंगांत उत्तम प्रकारचें चिलखत असल्यानें व त्यांच्या अंगचापल्यामुळें खानानें मारलेली कट्यार खरकन् चिलखतावरून घसरत निघून गेली ! बाहुयुद्धांत निपुण असलेल्या महाराजांनीं अंग अकुंचित करून व हालचाली करून अत्यंत चपळपणानें व कौशल्यानें त्या कट्यारीचा वार चुकविण्याचा प्रयत्न केला त्यामुळें व चिलखतामुळें खानाच्या कट्यारीचा तो वार वाया गेला. कारेगार झाला नाहीं. महाराजांची मूर्ती खानाच्या मानानें ठेंगणी असली तरी महाराजांचा शरीरबांधा पिळदार असून पोलादासारखा बळकट बनलेला होता. त्यांनीं मोठ्या चपळपणानें व तडफेनें आपली मान पेच मारून सोडवून घेतली आणि—" हा वार तुला करितों तो घे—धर मला " असें सिंहासारखे गर्जत सिंहगति असलेल्या त्या

पुरुषसिंहानें सिंहासारखी दृष्टि फेंकून दोन्ही हातांनीं फिरविलेल्या आपल्या नागव्या तलवारीचें तीक्ष्ण टोंक त्या वैऱ्याचा सूड घेण्यास प्रवृत्त होऊन त्याच्या पोटांत पाठीपर्यंत खुपसलें आणि विद्युद्वेगानें ती खुपसलेली तलवार खानाचीं आंतडीं ओढून घेऊन बाहेर काढली. खानाचें डोकें गरगर फिरूं लागलें. त्याच्या रक्ताच्या धारांनीं भूमि भिजली. खानानें आपल्या हातानें आंतडीं जशींच्या तशीं पोटाशीं दाबून धरलीं परंतु अतिविव्हळ होऊन तो मूर्च्छेनें झोंकांड्या खाऊं लागला. आणि ओरडूं लागला कीं, "घात झाला ! शत्रूला मारा ! " इतक्यांत खानाचा वकील कृष्णाजी भास्कर खानाच्या आज्ञेप्रमाणें महाराजांवर चालून गेला. खानाचे रक्षक तेथें पोंचले नाहींत तोंच खानानें दिलेली तलवार त्यानें शिवाजीवर हाणली परंतु शिवाजीनें ती आपल्या तलवारीनें उड-विली आणि पट्ट्यानें खानाच्या डोक्याचीं दोन भकलें केलीं ! पट्ट्यानें कापलेलें तें डोकें वज्रानें तोडलेल्या पर्वतशिखराप्रमाणें खालीं पडलें ! एकीकडे धड पसरलें ! एकीकडे आंतडीं गळालीं ! एकीकडे रत्नामोत्यांचा शिरपेंच पडला ! एकीकडे वस्त्र तर एकी-कडे छत्र अशी दशा प्राप्त होऊन तो कपटी अफजलखान आपल्या कर्मामुळें व गर्वामुळें धरणीवर लोळला ! हा सर्व प्रकार होण्याला असा कितीसा वेळ लागला असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. खान शिवाजीची ती क्षणिक भेट आणि कायमची ताटातूट निमिषार्धांत झाली असल्यास नवल नाहीं ! असो ! अशा रीतीनें परमानंदाच्या कहाणीप्रमाणें ता. १० नोव्हेंबर १६५९ रोज गुरुवार या दिवशीं हा ऐतिहासिक महत्वाचा रोमांचकारी अफजलप्रसंग प्रतापपर्वततलस्थलीवर मध्यान्हीं घडून आला ! कांहीं बखरकार शिवाजीनें या प्रसंगीं खानावर वाघनख

चालविल्याचें सांगतात. खानाला भेटण्यासाठीं शिवाजी आला तेव्हां त्यानें जरीची कुडती घातली होती, डोईस मंदिल बांधून त्यांत तोडा बांधला होता, पायांत चोळणा घालून कास कसली होती व हातांत एक बिचवा व वाघनख चढविलें होते; व खानानें शिवाजीच्या कुशीवर कट्यारीचा घाव, त्याची मुंडी बगलेंत दाबून धरून घालतांच शिवाजीनें मनांत जगदंबेचें स्मरण करून वाघ-नखाचा चपेटा खानाच्या पोटावर मारला आणि त्याच्या पोटाचा कोथळा बाहेर काढला; आणि कमरेवरचा बिचवा पोटाच्या डाव्या बाजूवर मारून तोही पूर्णपणें विंधून टाकला. द्वंद्व युद्धांत निपुण असलेल्या शिवाजीनें पेचानें मान बाहेर हसडून काढून घेतली. आणि चौथऱ्याखालीं लांब उडी ठोकली. इतक्यांत खानानें आपला कोथळा झटपट शेल्यानें बांधला आणि तलवारीचा वार शिवाजीच्या माथ्यावर केला. त्यामुळें शिवाजीच्या डोक्याला शिरस्त्राण होतें तरी गहूभर जखम झाली. याप्रमाणें खानशिवाजीची झटापट झाल्याची हकीगत सभसदी बखरींत आढळते. सभासदाची बखर ही विश्वसनीय व महाराजांच्या पदरीं असलेल्या कवींद्र परमानंदाचा शिवभारतग्रंथ हाही विश्वसनीयच. उभयतांच्या वर लिहिलेल्या हकीगतींचा वाचकांनीं मेळ आपल्या बुद्धीप्रमाणें व तर्काप्रमाणें उपलब्ध माहितीच्या आधारानें घालावयाचा आहे. त्यांच्याआड आम्हीं येऊं इच्छित नाहीं. तथापि समन्वय करण्यास उपयोगी होईल म्हणून त्या त्या ग्रंथकारांच्या मतें खानावर चालविलेल्या हत्यारासंबंधाची माहिती खालीलप्रमाणें देतां येईल:—

१ सभासद—वाघनख व बिचवा.
२ चिटणीस—वाघनख व तलवार.
३ जेधे करीना—वाघनख व तलवार.

४ ९१ कलमी बखर—बिचवा व तलवार.
५ शिव दिग्विजय—वाघनख व पट्टा.
६ रायरी बखर—कट्यार.
७ तरीख-इ-शिवाजी—वाघनख व कट्यार
८ इंग्रजीपत्र—पोटाजवळ लपवून ठेवलेली कट्यार.
९ फ्रायर—अस्तनींत लपवून ठेवलेला जंब्या (Stiletto).
१० खाफीखान—कट्यार.
११ मनुकी—भाल्याच्या आकृतीचें छोटें आखूड दुधारी हत्यार.
१२ जेधे शकावलि—हत्याराचें नांव नाहीं. "भेटीचें समयीं एकांगी करून अफजलखान जिवें मारला. सीर कापिले," असा मजकूर आहे.

यापैकीं सभासद व परमानंद यांचा समन्वय विश्वसनीय मानतां येईल. इतर बाबतींत ग्रंथकारांचे मतैक्य व मतभेद कशांत आहेत यांचा उहापोह अर्थातच पुढें करण्याचें मी योजिलें आहे.

खानाला खालीं पाडल्यानंतर पुढची हकीगत अशी कीं,—मंडपांत खानानें—"दगा दगा! मारो मारो!" असा केलेला आक्रोश सय्यदबंडाचें कानीं पडतांच तो लढवय्या चवताळून वाऱ्यासारखा दौडत मंडपांत आला आणि "झालेलें हें भयंकर कृत्य त्या दुष्ट शिवाजीनेंच केलें असले पाहिजे" असें मनांत समजून तो तत्काल शिवाजीवर चालून आला. शिवाजी व बंडा यांचें द्वंद्वयुद्ध जुंपलें. बंडानें शिवाजीवर तलवारीचे जबरदस्त चार वार केले ते शिवाजीनें कातर डावानें उडवून लाविलें. आणि पांचवा मर्मभेदक वार तो शिवाजीवर व तसाच शिवाजी त्याचेवर करणार तोंच शिवाजीच्या सान्निध असलेल्या जिऊ महालानें, "तूं मध्यें येऊं

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


नकोस, मीच ह्याला ठार करतों," असें शिवाजीनें ओरडून त्याला सांगितलें असतांही तें न ऐकलेसें करून सय्यदाचा वार आपल्या अंगावर घेऊन आपल्या तलवारीनें बंडाचा भुजदंड हत्यारासह खांडून खालीं पाडला ! सय्यद बंडाचे दोन तुकडे केलें ! जिवा महालानें पराक्रमाची कमाल केली ! "होता जिवा म्हणून वाचला शिवा" या म्हणीनें महाराष्ट्रीनें जिवा महाल्याला कायमचे धन्यवाद दिलेले आहेत. सय्यद बंडाला लोळविलेंवर खानाचे इतर सैनिक बाणाचे टप्प्यावर ठेविले होते तेहि गडबड ऐकून मंडपांत धांवत आले. आणि शिवाजीवर चवताळून चौफेर हल्ला करूं लागले. तो शक्तिमान व शौर्यसंपन्न अबदूल सय्यद तेथें तलवार नाचवीत आला ! अफजलखानाचा पुतण्या शूर रहिमखान उड्या टाकीत आणि गर्जना करीत आला. वेगवान व बलवान असे पिलोजी व शंकराजी मोहिते हे निमिषार्धांत तेथें दाखल झाले ! तो थोर घराण्यांतील महामानी पहिलवानखान आपली तलवार शिवाजी-वर रोखून दौडत आला ! असे खानाचे सर्व पृष्ठरक्षक क्रोधानें बेफाम होऊन मंडपांत शिवाजीवर चहुंबाजूंनीं त्याला ठार मारण्यासाठीं अहमहमिकेनें धांवत आले. ही वेळ शिवाजीच्या युद्ध-कौशल्याच्या कसोटीची होती. सिंहासारखी चौफेर दृष्टि फेंकून सर्वांना तोंड देण्यासाठीं आपली भवानी तलवार व पट्टा हीं दोनही एकसमयावच्छेदेंकरून विद्युद्वेगानें फिरवीत आपल्या अंगाभोंवती डोळे दिपविणारीं तेजाचीं वलयें निर्माण करून व त्यांचा अभेद्य तट उभा करून शत्रूचे डोळे फिरविणारा, विद्युत्-पाताप्रमाणेंच आपल्यावर वेगानें शत्रुवीरांनीं केलेलें प्रचंड खड्ग-प्रहार कधीं पट्ट्यानें तर कधीं दोहोंनीं मिळून "कातरवार" करून अडवून ऊडवून लावणारा रणधुरंधर तलवारबहादर

शिवाजी राजा ज्यांनीं मंडपांत पाहिला त्यांच्या डोळ्याचें पारणें फिटलें असेल !– " The boast of the soldier was to have seen Shivaji charging sword in hand " म्हणजे " हातांत तलवार घेऊन हल्ला करतांना शिवाजीला मी डोळ्यांनीं पाहिलें असें सांगण्यांत हरएक रणमर्दाला अभिमान वा गर्व वाटे." असें शिवाजींचें युद्धकौशल्य ऑर्मे या इंग्रज इतिहासकारानेंहि वर्णिलें आहे तें उगीच नव्हें ! मंडपांत भयंकर चकमकी चालू असतांना ज्यानें आपलें आईबाप व देवदौलत सर्वकांहीं शिवाजीमहाराजांच्या चरणीं मानिली होती तो शिवबाचा जिवलग मैतर " ताना " आपल्या धन्याच्या जीवावरचें आधण उतरण्यासाठीं वाघासारख्या उड्या टाकीत मंडपांत दौडत आला आणि शिवाजी व तानाजी या उभयतांनीं तलवारी चालवून हा हा म्हणतां खानाच्या लोकांचा फन्ना उडवून टाकला ! धन्य शिवाजी ! धन्य तानाजी ! आणि धन्य तेही कीं ज्यांना अशी एक जीवाची जोडी रणांगणीं तळहातावर शिर घेऊन लढतांना आपल्या डोळ्यांनीं पहायला मिळाली !

पुढें मंडपांतील खानाचें शव नेण्यासाठीं लगबग पालखीचे भोई आले. तें शव त्यांनीं पालखींत घालून बाहेर त्वरेनें नेण्याचीं शिकस्त केली. परंतु संभाजी कावजीनें त्या सर्व भोयांच्या पायाच्या ढोणाशिरा झपाट्यानें तोडल्या आणि त्यांना खतम करून टाकलें. ( मराठी दप्तर रुमाल १ पृ. ३० ). धडासह पालखी तशीच तेथें पडली. वाघनखाची कथा सांगणारा सभासद यावेळीं संभाजी कावजीनें " खानाचें डोचकें कापिलें " असें सांगतो. शिवाजी महाराजांचे इतर गडावरचे रक्षक त्यांच्या रक्षणासाठीं तेथें आले होते. त्यांत इब्राहीम नांवाचा एक मुसलमान सरदारही होता हें लक्षांत

ठेवण्यासारखें आहे. हिरोजी फर्जंद व त्याची टोळीही त्या ठिकाणीं आली होती. त्यांना व इतर सैनिकांना जनीटेंबेच्या दरींत खानाचें असलेलें १५०० सैन्य कापून काढण्याचे कामीं जेधे-बांदल लोकांना उपराळा देण्याबद्दल महाराजांनीं तांतडीचा हुकूम दिला आणि मंडपांतील लढाई आटोपल्यावर महाराज खानाचे शीर घेऊन गडावर पुढील बंदोबस्तासाठीं जलद निघून गेले. मंडपा-बाहेर कर्णेवाला ठेवला होता. त्यानें ठरल्याप्रमाणें रणसंकेतनिदर्शक कर्णा फुंकला ! रणभेरीवर टिपरी पडली । हा आवाज ऐकल्या-बरोबर शिवाजीमहाराजांच्या त्या त्या लष्करी तुकड्यांच्या ठरल्याप्रमाणें लष्करी चढाईच्या हालचाली सुरुं झाल्या. कर्ण्याचा आवाज हा गडावरील व जनीटेंबेच्या लवणांतील व नजीकच्या आपल्या लोकांना इशारा देण्यासाठीं ठरविलेला होता. मोरोपंत काय किंवा नेताजी काय किंवा बाबाजी भोसला काय, त्यांना ह्या कर्ण्याचा ध्वनी ऐकूं जाणें प्रायः शक्य नव्हतें. इतके दूर अंतरावर ते ठेविले होते. सबब त्यांच्यासाठीं तोफेच्या सांकेतिक बारांची योजना केली होती. कॅ. मोडक यांनीं युद्धशास्त्रदृष्ट्या वेळेचें महत्व आपल्या ग्रंथांत सांगितलें आहे तें अक्षरशः बरोबर आहें. ठरल्या वेळेवर वार्ता देणें व लष्कर ठराविक ठिकाणीं येणें यांत लवमात्र विलंब लागला तर लढाई हातची जाते ही गोष्ट अनेक वेळां अनेक राष्ट्रांच्या प्रचीतीस आल्याची साक्ष इतिहास देत आहे. या कारणानें महाराजांनीं आपल्या संकेताची वार्ता विशिष्ट प्रकारच्या ध्वनीनें आपल्या दूरस्थ सैनिकांना जलदी पोंचविण्याची योजना केली होती. याप्रमाणें कर्ण्याचा आवाज व तोफेचे बार आपल्या सन्निध वा दूरस्थ असलेल्या सर्व सैन्याला

मिनिटा दोन मिनिटांत करून ताबडतोब लष्करी चढाईच्या हालचाली सर्व बाजूंनीं सुरू झाल्या.

## जनीटेंबेची लढाई

यावेळीं जनीटेंबेच्या उत्तरेला ओहोळांत व झाडींत कान्होजी जेधे, बांदल, पासलकर, अण्णाजीपंत, बाजी सर्जेराव, वगैरे शिवाजीचे सरदार पांचचारशें पायदळानिशीं बसले होते. ही मंडळी जेथें जमली होती त्या ठिकाणाला म्हणजे खोऱ्याला "खाड्याचे खोंड" असें म्हणतात. आवाजाचा इशारा मिळतांच जेधे–बांदल लोकांनीं एकदम बाहेर पडून खानाच्या १५०० हबशी घोडेस्वारावर अचानक हल्ला केला. खानाच्या १५०० सैन्याला तोफांचे आवाज ऐकूं आले नाहींत असें नाहीं. ते खासच ऐकूं आले. परंतु हे आवाज खानाच्या भेटीच्या सन्मानार्थ झाले असावेत असा त्यांचा समज झाला. त्यामुळें ते बेसावध बसले होते. याकारणानें हा शिवाजीचे लोकांचा त्यांचेवर झालेला अचानक हल्ला परतविणें त्यांना अशक्य झालें. इतकेंच नव्हे तर आत्मसंरक्षण करणेंही त्यांना अवघड होऊन बसले! त्या खोल दरींतून त्यांना पुढें वरहि जातां येईना, किंवा लवकर मागेंही फिरतां येईना! दोन्ही बाजूंसही अवघड दुर्गम प्रदेश! त्यांतून किल्ल्याच्या दरवाज्यांजवळ ठेविलेला हिरोजी फर्जन्द आपल्या तुकडीनिशीं जेधेबांदलांना उपराळा देण्यासाठीं तेथें दौडत आला. दरीच्या दोन्ही बगलांना लपून बसलेलें मराठी सैन्य व हिरोजीची आलेली तुकडी असें मिळून सुमारें ७००–८०० सैन्यानें खानाच्या गोंधळून गेलेल्या १५०० सैन्याची हां हां म्हणतां कत्तल उडविली. या हातघाईच्या लढाईंत खानाच्या जनी-

टेंबेच्या दर्रातील सैन्याची अत्यंत दैना व दुर्दशा झाली. या खणाखणीच्या द्वंद्वयुद्धांत खानाच्या सैन्याला आपल्या बंदुकींचा वापरच करतां आला नाहीं. डाव्या बाजूनें सिलीमकरांनीं चढविलेल्या अकास्मिक हल्ल्यानें तर त्याचें अवसानच खचलें. ही जनीटेंबेची लढाई सुमारे तासाभरांत आटोपली असावी, असा रणशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. या लढाईंत खानाच्या जखमी झालेल्या व मेलेल्या शिपायांच्या जवळ बंदुका, तलवारी व भाले वगैरे बरींच हत्यारें शिवाजीच्या लोकांना मिळालीं. तीं जमा करण्यासाठीं लहानशी टोळी तेथें ठेवून बाकीचें सैन्य पारघाटाकडे मोरोपंतांचे मदतीसाठीं धांवून गेलें.

## कोयनापारघाटांतील लढाई

शिवदिग्विजयकारांनीं आपल्या बखरींत म्हटल्याप्रमाणें सायंकाळीं (?) रणसंकेतनिदर्शक तोफेचे बार होतांच कुडेसराहून नेताजीचा घोडा ठरल्याप्रमाणें वाई तळाच्या रोखानें रणक्षेत्र हेरत हेरत दौडत सुटला. तसाच पारघाटाच्या लढाईसाठीं नेमलेला पायदळाचा सरसेनापती मोरोपंत पेशवा आपले पांच हजार निवडक पायदळ घेऊन गडाची सोंड व धार वायुवेगानें ओलांडून घोडवनांतील ढमाले आदि करून लोकांना जनीच्या टेंबेकडील खानाच्या १५०० सैन्याचा समाचार घेण्याविषयीं जातां जातां सूचना देऊन, कुमठ्याचा व पारचा ओढा पायाखालीं घालून, "निवळी"च्या खोऱ्यांतून सपाट्यानें निघून मार्गावरील ओढे, दऱ्या, खोरी, भयंकर दाट झाडी, ओलांडून नागमोडी वाटेनें खानाच्या सुमारें तीन मैल अंतरावर असलेल्या कोयनापार तळावर सुमारे अर्ध्या घंट्यांत येऊन दाखल झाला! त्याचप्रमाणें तोफ

धडाडतांच गडावरून शिवाजीचे येसाजी कंक, तानाजी माल्लसरे, कमळोजी साळुंखे, कोंडाजी वरखल व रामजी पांगारकर हे पांच शूर सरदार पंचाग्नीप्रमाणें एक एक हजार पायदळ घेऊन सुटले! त्याचप्रमाणें कोणी " नारायण " नांवाचा ब्राह्मण योद्धा हाही आपल्या पांच हजार पायदळासह पारघाटाकडे दौडत आला. असे हे प्रचंड पायदळाचे लोंढे चहुंबाजूंनीं या पारतळावर जेव्हां डोंगरावरून वेगानें धांवत आले त्यावेळीं खानाचे तेथील सैन्यांतील शिपायी अगदीं बेसावध होते. गडावर झालेले तोफांचे बार हे त्यांनाही शिवाजीनें जणुं काय खानाला दिलेल्या लष्करी मानाचे मुजरे वाटले! अशा बेसावध स्थितींत मोरोपंतांनीं त्यांचेवर चढविलेल्या अचानक हल्ल्याला तोंड देतां आलें नाहीं. हल्लाहि इतक्या आकस्मिक स्वरूपाचा व चौफेर होता कीं, घोड्यावर खोगीर घालावयालासुद्धां त्यांना अवसर मिळाला नाहीं. यामुळें खानाचें तें सैन्य पारघाटांत कोंडलें गेलें. पारघाटांतील खानाच्या सैन्यानें वाईतळावरच्या सैन्याला जाऊन मिळणेचा पराकाष्टेचा प्रयत्न केला. परंतु पारतळ व वाई यांचे दरम्यान वर लिहिल्याप्रमाणें शिवाजीचा सरदार बाबाजी भोसले, हा सैन्यानिशीं ठाण मांडून बसला होता. मोरोपंतानें मागें रेटलेलें हें सैन्य वाईतळाकडे पळूं लागलें कीं, बाबाजी भोसल्यानें त्याला कापून काढावे आणि राहिलेलें पुन्हा मागें पारघाटाकडे दाबीत नेऊन मोरोपंतांच्या काबूंत घालावें अशी त्या यवनसैन्याची ससेहोलपट झाली! अफजलखान मारला गेला ही बातमी त्या यवनसैन्याला कळतांच त्याचें दिल खचून गेलें. खानाचे तीन मुलगे पारतळावरील सैन्यांत होते. त्यांचा उत्साह मावळून ते हतबुद्ध झाले. हतबल व हतप्रभ झालेल्या यवन सैन्याबरोबर खानाचा मोठा बेटा फाजलखान हाही भयभीत होऊन

सैरावैरा अरण्यांतून पळूं लागला. प्रचंड वारा प्रतिकूल सुटला असतांना तुफान झालेल्या समुद्रांत फुटलेल्या व कर्णधारविहीन झालेल्या नौकेंतील लोक जशी आपल्या जिवाची आशा सोडतात तशी त्यांची स्थिति झाली ! अशा परिस्थितींत खानाच्या सैन्यांत पुन्हा उत्साह निर्माण करण्यासाठीं त्याचा महाशूर सरदार मुसेखान पठाण, आपल्या पळत्या सैन्याला रोखून धरून त्याला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठीं वीरश्रीचीं भाषणें करूं लागला. " एक अफजलखान मेला म्हणजे आम्हीं बाकीचे सर्वही मेलों काय ? अहो सैनिकहो ! पर्वताच्या सर्व वाटा बंद आहेत ! तुम्हीं मागें कोठें जाणार आहात ? उभे रहा ! आणि सभोंवती चालून येणाऱ्या शत्रूला धूळ चारा ! जो स्वतःचे प्राण वांचविण्यासाठीं आपल्या सोबत्यांना या रणकुंडांत सोडून पळून जाईल त्याच्या जिण्याला धिःकार असो ! तुम्हीं आपलें काळें तोंड विजापुरच्या आपल्या स्वामीला दाखविण्यापेक्षां इथें मेलात तर काय बिघडेल ? ही पहा ! माझी प्रलयकारक तलवार शत्रूवर तुटून पडली." असें गर्जत त्यानें मोरोपंताच्या दळावर झडप घातली ! मागोमाग त्याचे दुसरे सेनानायकही चालून गेले ! घनघोर युद्ध झालें ! उन्मत्त गजांच्या आणि घोड्यांच्या धांगडधिंग्याखालीं ती पाषाणमय पर्वतभूमी गदगदा हादरून गेली. हत्तींच्या चीत्कारांनीं, घोड्यांच्या खिंकाळण्यांनीं, वीर पुरुषांच्या गर्जनांनीं, तलवारींच्या खणखणाटांनीं आणि धनुर्बाणांच्या टणत्कारांनीं दिङ्मंडल दुमदुमून गेलें ! तशांत या हलकल्लोळानें या निबिड अरण्यांतून वाघनाग खवळून बाहेर पडले. अनेक इतर हिंस्त्रश्वापदेंही भयंकर ओरडूं लागलीं व इतस्ततः धांवूं लागलीं ! त्यामुळें रणाची भीषणता अधिकच वाढली. यवनांचें सैन्यही अधिकच भयभीत झालें. खानाच्या

[library stamp]

अवजड सैन्याला त्या समविषम मुलुखांत चपळपणानें हालचाली करतां येईनात. शिवाजीचें सुटसुटीत सैन्य मात्र असल्या डोंगरी लढायांत अत्यंत पारंगत होतें. त्यामुळें अदूरदृष्टीनें अफजलखानानें या ठिकाणीं आणलेल्या त्या बोजड यवनसैन्यानें या पारघाटाच्या लढाईंत कच खाल्ली असल्यास नवल नाहीं. या रीतीनें मोरोपंतांची सेना त्या यवनसैन्याला पारघाटांत पिटतां पिटतां थकून गेली! पेचकांड्यांत सांपडलेल्या खानाच्या सैन्यानें उजव्या बगलेकडे पसार व्हावें म्हटलें तर तिकडून रघुनाथ सबनीसाची तुकडी त्या सैन्याच्या कमरेवर घाव घाली व उजव्या बगलीं पलटी खाऊन पीछेहाट करावी तर त्या बाजूनें कुडेसराहून नेताजी झंझावातासारखा सुटलेला होताच! त्यामुळें त्याची तिकडूनही कुचंबणा झालेली होती! एवंच सर्व बाजूंनीं तुंबळ लढाई त्या पारतळावर झाली. उभय पक्षांचे वीर जिवाजिवाची तमा न धरितां लढले. परंतु मोरोपंतांच्या सैन्याच्या माऱ्यापुढें यवनांचे हत्ती घोडे अडले, पडले, रक्तानें न्हाले. खानाचें घोडदळ, गजदळ, शेवटीं त्यावरील स्वार खालीं घसरल्यामुळें, पायदळच बनलें! आणि तेंही अंतीं मोरोपंतांच्या पायदळीं पडलें! अशा स्थितींत त्या मुसेखानाचा घोडा उध्वस्त होऊन त्याचीं शस्त्रें हातांतून गळलीं व तो रणशूर संग्रामांतून परावृत्त झाला! याकूतानेंही युद्धांतून पाय काढला! भयभीत हसन संकटाग्नींत होरपळून गेला! अंकुशखान अनवाणी पसार झाला! बावरलेल्या आपल्या दोघाही भावांना जंगलांत टाकून खानाचा मोठा बेटा फाजलखान वेषांतर करून आणि पायीं चिंध्या बांधून समरांगणांतून पळून गेला! नायकहीन झालेल्या यवनांचें सैन्य सुसाट जंगलांतून पळूं लागलें. खानाबरोबर आलेला शहाजीराजाचा भाऊ मंबाजी म्हणजे

शिवाजीचा चुलता या रणांगणांत जन्मबंधापासून कायमचा मुक्त झाला ! अत्यंत पराक्रमामुळें सर्वांना दुःसह झालेला तो रागीट, बळकट, मानी जवान रणदुल्ला शिवाजीच्या सैन्याच्या स्वाधीन झाला ! अंबर, राजाजी घाटगे, आणि अफजलखानाचे राहिलेले दोन मुलगे शिवाजीच्या सैन्याच्या हातीं पडून कैद झाले ! अदिलशहाचे एक हजारी, दोन हजारी, तीन हजारी, पांच हजारी ते सात हजारी असे अनेक बडे शूर सरदार शिवाजीला शरण गेले. अशा प्रकारानें शेवटीं रिपुरक्तानें न्हालेल्या पारघाटाच्या समरदेवतेनें कोयनेला साक्षी ठेवून मोरोपंतांना विजयश्रीची माळ घातली !

## वाईतळावर नेताजीची गरुडझेप

आतां राहतां राहिला खानाचा एकाकी वाईचा तळ; जनीटेंबेवरील खानाचें सैन्य पारघाटाला येऊ शकलें नाहीं. आणि पारघाटांतील खानाचें सैन्य वाईतळाला येऊन मिळूं शकलें नाहीं. याप्रमाणें त्याचें हें सैन्यबळ जें तीन ठिकाणीं पांगलें गेलें होतें तें पुन्हा केव्हांहि या युद्धांत एकत्रित होऊं शकलें नाहीं. खानाच्या सैन्याचा एक गठ्ठा होऊं नये म्हणून शिवाजी महाराजांनीं केलेल्या युक्तियोजनांचें व त्यांच्या सेनापतित्वाच्या कौशल्याचें या ठिकाणीं कौतुक करावें तितकें थोडें आहे.

वाई व पारतळ यांच्या दरम्यानचें दळणवळण तुटलेलें असल्यानें गडावरील अगर पारघाटावरील कांहींच बातमी वाईला पोंचली नाहीं. वाई तळावरील सैन्यांत पायदळ, घोडदळ व तोफखानाही होता. तोफखान्याच्या तजविजीसाठीं व रक्षणासाठा

लढाऊ फौज असावीच लागते. तेव्हां खानानें तेथें मोठीच फौज ठेविली असावी. कॅ. मोडकांनीं ती २०–२२ हजार असावी असें अनुमान दिलें आहे. तेथील लष्कर मोठें असण्याचें कारणही त्यांनीं दिलें आहे. आणि तें म्हणजे हें कीं, वाई ही खानाची आघाडीची कोठीच होती. वाई हें विजापूरचें सरहद्दीचें लष्करी ठाणें होतें. रसद व पुरवठ्याचे साठे तेथेंच होते. खानाचा खजिना, दारूगोळ्याचे बारुदखाने तेथेंच होते. तेव्हां त्यांच्या संरक्षणासाठीं मोठी फौज तेथें ठेवणें आवश्यक होतें. या फौजेंत मुसलमान सेनापती तर होतेच, परंतु त्याखेरीज आणखी भोंसले, जगताप, घाटगे, इंगळे, पांढरे, बेंद्रे, काटे, खोपडे वगैरे मराठे सरदारही आपआपल्या फौजफांट्यासह उपस्थित होते. हें सर्व सैन्य त्या वेळीं ख्यालीखुशालींत होतें. तोफ ऐकूं आली तेव्हां ती यवनसेना हर्षूनच गेली होती. तिला वाटलें, शिवाजीनें ही सन्मानाची सलामीच खानास दिली! वस्तुतः तो युद्धसूचक विजयध्वनि खान निजधामाला गेला असें सांगत होता! परंतु वाई तळावरील यवनसैन्याला वाटलें कीं, हा दोघांचा तहनामा झाला! त्यांत त्या दिवशीं रात्रीचे पहिल्या प्रहरांत कोणी गाणें-बजाविणें, तर कोणी कबरीची पूजा करीत होते. अशा स्थितींत वाई तळाच्या लष्करावर कोणी कोठें छापा घालावयाचा याचा आगाऊ आराखडा तयार करून त्याप्रमाणें आपल्या सैनिकांना सूचना देणाऱ्या नेताजीच्या घोडदळाचा लोंढा त्या यवनसैन्यांत “हरहर महादेव” अशी रणगर्जना करीत अगदीं अचानकपणें लोटला. असा हल्ला होतांच यवनसैन्यांत एकच कालवा झाला. यवनवीर त्यांतल्या त्यांत सरसावून युद्धाला तोंड देऊं लागले. भाले भाल्यावर पडले! बाण बाणांवर आदळले! समशेरीवर

समशेरी खणाणल्या ! रात्रीच्या अंधारांत त्या विजेसारख्या चमकल्या ! रणघोषांनीं आणि हलकल्लोळांनीं वाईचें रणमैदान व डोंगरखोरीं दुमदुमून गेलीं ! रक्ताच्या नद्या वाहिल्या ! अनेक वीररत्नें रक्तनदीच्या कांठीं कायमचीं झोपी गेलीं ! तुटक्या हातापायांचा आणि धडांचा डोंगर उठला ! रक्तामांसाचा चिखल झाला ! शेवटीं खानाच्या सैन्यांतील एकही योद्धा तळावर उभा राहिला नाहीं ! ना घोडा ना स्वार, ना शस्त्र ना ध्वज, अशी अफजलखानाच्या शिबिराची अंतीं अनुकंपनीय अवस्था झाली ! या रणक्षेत्रावरही रणदेवतेनें विजयश्रीची माळ सरनोबत नेताजीच्या कंठांत घातली. या तळावरून सैरावैरा पळालेल्या कांहीं खानाच्या सैन्याचा पाठलाग नेताजीनें केला, वाईगांव घेतला, कांहीं मुलुखहि मारला; त्यावर आपले अधिकारी नेमले; पण जंगलचा माहितगार वाटाड्या म्हणून आलेला प्रतापराव मोरे व फाजलखान हे दोघे पळाले ते पळालेच. वाटेंत काकडे सरदारांनीं फाजलखानाला गुप्त आश्रय दिल्याचें महाराजांना नंतर कळलें तेव्हां त्यांनीं त्यास व देशद्रोही खंडोजी खोपडे यासही कडक शासन केलें. ही लढाई मार्ग० शु॥ ७ मीला गुरुवारीं रात्रीं झाली असें अनुमान कॅ. मोडक यांनीं बसविलें आहे. परंतु शिवाजी–अफजल युद्ध झालें त्याच्या दुसऱ्या दिवशीं नेताजी वाईला आला असें परमानंद म्हणतो. ( शि. भा. अ. २३ (२२) )

## युद्धांत मराठ्यांनीं मिळविलेली युद्धसामुग्री

येणेंप्रमाणें जनीटेंब, कोयनापार, जावळी व वाईतळ या मोडकांनीं निर्दिष्ट केल्याप्रमाणें चार ठिकाणीं झालेल्या लढाया

मराठी सैन्यानें जिंकल्या. त्यांत जी सामुग्री त्यास मिळाली त्याचा तपशील खालीलप्रमाणें:—

(१) सभासदाप्रमाणें:—

| | |
|---|---|
| ६५ हत्ती व हत्तिणी सुमारें | ४,००० घोडे सुमारें |
| ३,००,००० जडजवाहीर | १,२०० उंट सुमारें |
| २,००० कापड ओझीं | ७,००,००० नगद, मोहरा, होन सोनें रुपये |

(२) त्याचप्रमाणें कॅ. मोडक यांनीं इतिहास संग्रह ऐतिहासिक स्फुट लेख भाग २ व शिवदिग्वजय या ग्रंथांतून मराठ्यांना मिळालेल्या युद्धसामुग्रीची जी माहिती गोळा करून दिली आहे ती खालीलप्रमाणें:—

| | |
|---|---|
| ९५ हत्ती | १२०० उंट |
| ४,००० घोडीं | १,८०० बैल |
| ७० तोफा | ३,००,००० जडजवाहीर |
| ७,००,००० मोहरा, होन वगैरे नक्त खजिना | १०,००० कापड |
| १४,००० राहुट्या | १४,००० डेरे |

याशिवाय हत्यारे, दारूगोळा वगैरे सामान वेगळें मिळालें.

## युद्धानंतर

युद्धांत खानाकडील अनेक लोक कामास आले. अनेक अनाथ झाले. अनेक कैदी झाले. पकडून आणलेल्यांत व जखमी झालेल्यांत विजापूरशहाचे अनेक सरदार व खानाचे दोन पुत्र होते व इतर कित्येक रणझुंजार होते. त्या सर्वांना पोटाशीं धरून शिवाजीमहाराजांनीं दिलासा केला! अभय दिलें! आश्रय

दिला ! दु:खितांचा परामर्ष घेतला ! निपुत्रिकांच्या विधवा बायकांना निम्में वेतन देऊन त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था केली. जखमी झाले त्यांच्या जखमा पाहून त्यांच्या मानानें त्यांना पंचवीस होनांपासून दोनशें होनांपर्यंत दानधर्म व देणग्या दिल्या. वरील खानाच्या लोकांपैकीं ज्यांना शिवाजीमहाराजांच्या पदरीं राहण्याची इच्छा होती त्यांना नोकरीवर ठेविले. ज्यांना विजापुरीं आपआपल्या घरीं जावयाचें होतें, परंतु ज्यांच्याजवळ तिकडे जाण्यास पुरतील इतके पैसे नव्हते त्यांना महाराजांनीं प्रवासाला लागणारा खर्च दिला. त्यांचें आणि सर्व दु:खितांचें गोड शब्दांनीं सांत्वन व समाधान केलें ! त्या सर्वांची स्वत:च्या माणसासारखी काळजी घेतली ! या सर्वांना आपलें पवित्र ध्येय नीट समजावून सांगितलें. महाराजांनीं दाखविलेल्या या सात्त्विकपणाच्या उदात्त स्नेहभावनांचा विलक्षण परिणाम त्यांच्यावर होऊन त्यांच्यापैकीं कित्येक लोक महाराजांच्या नोकरीस राहण्यास कबूल झाले ! झुंझारराव घाडगे हा शहाजीचा स्नेही होता. त्यास महाराजांनीं आपणाकडे राहण्याचा फार आग्रह केला. परंतु तो ऐकेना, तेव्हां त्यास पोशाख देऊन निरोप दिला. पाडावांत सांपडलेल्या सरदारांचा मानमरातब महाराज नेहमीं चांगल्या रीतीनें ठेवीत असत. त्याप्रमाणें खानाकडील जे वजीर पाडाव केले होते त्यांस वस्त्रें-भूषणें व अश्व देऊन संतुष्ट केलें व सोडून दिलें. यानंतर स्वत:च्या सैन्यांतील जखमी लोकांना पंचवीस ते दोनशेंपर्यंत होन बक्षिस दिले. अगदींच निकामी झाले होते त्यांना तहहयात नेमणुकी करून दिल्या. त्यांच्या मुलाबाळांना देणग्या दिल्या. जे नोकरी करण्यासारखे होते त्यांना नोकरीवर ठेवून घेतलें. मोठ्या मोठ्या सेनापतींना त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांचा गौरव करून कोणास

हत्ती तर कोणास पालखी दिली. ज्यांनीं या प्रसंगीं मर्दुमकी दाखविली त्यांच्यापैकीं कोणाला कडीं, कोणाला चौकडे, कोणाला तोडे, कोणाला तलवारी, कोणाला मोत्याचे तुरे, तर कोणाला हिरे दिले व सर्वांचें कोडकौतुक केलें. एकंदर बक्षिसाची रक्कम एक लाख होनांपर्यंत गेली! स्वतःचे वकील पंताजी गोपीनाथ यांना उदंड वस्त्रें, अश्व, अलंकार देऊन अपार द्रव्य दिलें. त्यांचा राहता हिवरे गांव हा त्यांना वंशपरंपरा इनाम करून दिला असें शिवदिग्विजय, ९१ कलमी बखर, हे ग्रंथ सांगतात. त्याप्रमाणें महाराजांनीं कोणाला नांवाजलें, कोणाचा दिलासा केला, कोणाला गांव मोकाशे बक्षिस दिले, सर्वांची खुशाली केली.

हें सर्व झालें; परंतु खानाबद्दल महाराजांनीं काय केलें हा प्रश्न शिल्लकच राहिला. खानाचें शीर (शेल्यांत गुंडाळून) मंडपांतून महाराजांनीं स्वतः गडावर नेलें होतें. तें हल्ली असलेल्या देवीच्या देवळासमोरील बुरुजांत फार मोठ्या समारंभानें पुरलें. त्या शिराचा त्यांनीं अत्यंत सन्मान केला. "मरणान्तानि वैराणि" या तत्त्वाप्रमाणें त्यांनीं उच्च भारतीय संस्कृतीस अनुसरून अत्यंत उदात्त आचरण केलें व आपल्या मोठ्या मनाची त्यायोगें ग्वाही दिली! खानास ज्या ठिकाणीं मारलें त्या ठिकाणीं त्याच्या धडाचा त्याच्या मानास व इतमामास शोभेल अशा थाटानें व वैभवानें दुसऱ्या दिवशीं काजीमुल्लांना बोलावून आणून यथाशास्त्र दफनविधी केला. त्याच्या कबरीसाठीं वार्षिक उत्पन्न लावून दिलें असें शिवदिग्विजयकारांनीं आपल्या बखरींत नमूद केलें आहे. शिवाजीमहाराजांनीं अफजलखानाची भव्य रत्नखचित तलवार आपल्या शस्त्रागारांत एक वैभवशाली स्मृतिचिन्ह म्हणून सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था केली. महाराजांचे पश्चात् त्यांचे वंशजांनींहि ती तशीच

पुढेंहि सन्मानपूर्वक जतन करून ठेविली होती. त्याचप्रमाणें महाराजांनीं शूर सय्यदबंडाच्या शवाचाही सन्मानपूर्वक यथाशास्त्र दफनविधि केला व त्याची कबरही बांधविली.

यानंतर खानाच्या सैन्याची दाणादाण होऊन खान मारला गेला अशी बातमी विजापूरच्या बादशहाला चौथे दिवशीं जासूद हलकारे यांनीं पोंचविली. बातमी ऐकतांच अलिअदिलशहा तक्तावरून उतरला! महालांत गेला! पलंगावर पडला! त्यानें बहुत खेद केला! त्याचप्रमाणें बादशहाजादीस ही खबर लागतांच ती पलंगावर बसली होती तशीच एकदम अंग टाकून, "अल्ला! अल्ला! खुदा! खुदा! मुसलमानाची पादशाही खुदानें बुडविली" असा विलाप करीत पडली! तिनें तीन दिवस अन्नोदक घेतलें नाहीं. असा बादशहाच्या अंतःपुरांत आकांत उडाला! विजापूर शहर दिलगीर झालें. सर्व वजीर भयभीत होऊन म्हणूं लागले कीं, "उद्यां राजा येऊन शहर मारील, कोट घेईल, खुदानें मुसलमानाची पादशाही दूर करून मराठ्यासी दिली असें वाटतें!"

## दोन वकिलाविषयीं चार शब्द

येथें पंताजी गोपीनाथ व कृष्णाजी भास्कर यांच्या संबंधाच्या माहितींतील कांहीं विवाद्य मुद्यांवर मुळींच ऊहापोह न करितां पुढें जाणें उचित होणार नाहीं म्हणून त्याविषयीं येथें थोडें लिहितो. प्रथम खानाचा वकील कृष्णाजी भास्कर याचेविषयीं जे मतभेद आहेत त्यांचा विचार करूं. कृष्णाजी भास्कर हा खानाचा स्वामिनिष्ठ नोकर होता किंवा नाहीं व तो मंडपांतील चकमकींत ठार मारला गेला कीं त्यास संरक्षण मिळून तो पुढें जिवंत राहिला हा एक चर्चेचा विषय आहे. भेटीपूर्वी खानाचा

निरोप घेऊन शिवाजीमहाराजांकडे तो प्रतापगडावर आला तेव्हां महाराजांनीं त्याची एकांतांत गांठ घेऊन त्याचेकडून खानाचें हृद्गत चातुर्यानें काढून घेतलें व महाराजांच्या इच्छेप्रमाणें त्यानें खानाला जावळीस आणण्याचें कबूल केलें, अशा प्रकारची हकीगत ९१ कलमी बखर, चिटणीस बखर, शिवदिग्विजय यांत आढळते. याप्रमाणें खानाच्या पक्षाचा तो असतांना महाराजांस त्याचें उदात्त ध्येय पाहून तो फितूर झाला असें त्याचें म्हणणें आहे. सभासद त्याविषयीं कांहींच स्पष्ट लिहीत नाहीं. गडावर कृष्णाजी खानाचा निरोप घेऊन राजांना प्रथम भेटला त्या वेळीं खानांनीं सांगितलेल्या सर्व गोष्टी त्यानें त्यांना सांगितल्या व " लौकिक बोलणें जहाले " असें सभासद म्हणतो. पुढें गडाहून परत जातांना राजांनीं जें कृष्णाजीस सांगितलें त्याचा सारांश सभासदाच्या शब्दांत असा:–" खानाची क्रिया पाहिजे. याजकरितां आमचे पंताजी गोपीनाथ यांस तुम्ही आपणांसमागमें खानाच्या भेटीस नेणें. याजवळ हस्तपंजराची आण देवविणें. खानांस जावळीस घेऊन येणें. " नंतर " त्यांस ( कृष्णाजीस ) ही गोष्ट मानली "—एवढेंच सभासद सांगतो. नंतर मंडपांतील हालचालींचे वर्णन करतांना कृष्णाजीविषयीं तो कांहींच लिहीत नाहीं. फक्त " पंताजीपंत ( याणी ) जाऊन **कृष्णाजीपंताकडून** खानास सांगून ( मंडपांत असलेला ) सैदबंडाही दूर पाठविला " एवढाच उल्लेख त्यानें केला आहे. पंताजी गोपीनाथाचा मात्र निर्देश त्यानें या सबंध प्रसंगांत, मंडपांतील हालचालींच्या वर्णनांत व बक्षीस वांटणीचे वेळींही गौरवानें केला आहे. तात्पर्य, खानाच्या वकीलानें स्वामिद्रोह केला असें कोठेंही सभासद म्हणत नाहीं. कै. चिं. वि. वैद्य यांनीं आपल्या शिवचरित्रग्रंथांत तो शिवाजीस

फितूर झाल्याची समजूत चुकीची आहे व शेवटपर्यंत खानाच्या बाजूनेंच तो लढला असा आपला अभिप्राय दिला आहे. त्याचप्रमाणें कृष्णाजींच्या मृत्युसंबंधाचे उल्लेख शोधून पाहतां (१) चिटणीस (२) शिवदिग्विजय (३) अज्ञानदासाचा पोवाडा, (४) ९१ कलमी बखरीच्या तीन प्रती, व (५) शिवभारत यांत त्यास जिवंत सोडल्याचे उल्लेख आढळतात व ९१ कलमी बखरीची काव्येतिहाससंग्रहांतील प्रत व सर जदुनाथकृत इंग्रजीप्रत यांत त्याच्या मृत्यूचा उल्लेख आढळतो व सभासद, चित्रगुप्त, शेडगांवकर, जेधेशकावलि, जेधेकरीना यांत तो त्या वेळीं मृत्यु पावला कीं जिवंत सुटला याबद्दल कांहींच उल्लेख मिळत नाहीं. परमानंद कृष्णाजी भास्करच्या इमानीपणाबद्दल अगर बेइमानीपणाबद्दल, कांहींही म्हणत नाहीं. " तो खानाचा निकटवर्ती पार्श्ववर्ती सेवक होता. त्याचेजवळ खानानें शिवाजीचे देखत आपली तरवार दिली व बाह्यात्कारीं आपण निःशस्त्र असल्याचा देखावा केला व तो ब्राह्मण असल्यामुळें गो-ब्राह्मणप्रतिपालक शिवाजी त्याला मारणार नाहीं म्हणून सहेतुकपणें त्यास खानानें युद्धांत निविष्ट केलें होतें व खानाच्या पोटाचा कोथळा बाहेर पडतांच खान " शत्रूला मारा " अशी आज्ञा करतांच त्यानें तरवारीचा वार शिवाजीवर केला, पण तो ब्राह्मण पडल्यामुळें त्याला ठार मारण्याची इच्छा शिवाजीनें केली नाहीं, आणि त्याचा वार आपल्या तलवारीनें फक्त उडवून लाविला. " अशा प्रकारचें वर्णन परमानंदानें शिवभारतांत दिलें आहे. यावरून कृष्णाजी भास्कर त्या वेळीं ठार मारला गेला नाहीं, त्यास जिवंत सोडण्यांत आलें असावें असें दिसतें. शिवाजीवर कृष्णाजीनें अर्धवट वार केलेला पाहतांच चिटणीसांच्या मतें तानाजी मालुसरे व

जिवबा महाला यांनीं आणि शिवदिग्विजयकारांच्या मतें येसाजी कंकानें कृष्णाजीवर चाल करून जाऊन त्यास जखमी केलें तोंच शिवाजीनें तो ब्राह्मण आहे म्हणून आपल्या सरदारांना थोपवून धरून कृष्णाजीस परत जाण्यास सांगितलें. अशा प्रकारें कृष्णाजीचा प्रसंग चिटणीस वगैरे उपरिनिर्दिष्ट पांच ग्रंथकारांनीं सांगितला आहे. याच्या थोड्या उलट प्रकारचा पण मुख्यतः कृष्णाजी मेल्याचा उल्लेख ९१ कलमी बखरीच्या काव्येतिहाससंग्रहांतील प्रतींत व तरीख-इ-शिवाजीच्या जदुनाथ सरकारकृत इंग्रजी भाषांतरांत आला आहे तो असा :—खानास पैगंबरवासी करणाऱ्या शिवाजीराजावर **प्रथम** सैयदबंडा धांवला, पण त्याला तानाजीनें ठार मारिलें. त्यावर हा कृष्णाजी पुढें आला तेव्हां " राजे बोलिले कीं, ब्राह्मण तूं असें समोर उभें न रहाणें, ब्राह्मणहत्या घडेल. " इतक्यांत जिवा महाली याणी त्यास तलवारीनें ठार केलें. " इंग्रजी भाषांतरांत कृष्णाजीचे ऐवजी गोपीनाथ हें चुकीचें नांव देऊन पण हेंच सांगितलें आहे. म्हणजे त्या दोन प्रतींत मात्र कृष्णाजी भास्कर मृत्यु पावल्याचें दाखविलें आहे त्याचप्रमाणें शिवचरित्रसाहित्यखंड ६ पृष्ठ ६७ येथें यासंबंधीं खालील मजकूर प्रसिद्ध झाला आहे:— " कृष्णाजी भास्कर मानुले हेजीव शिवाजीराजे भोसले याकडे पाठविले मुलाखतीचे वख्ती सिवाजी भोसला यानें खान आजमास जिवे मारितां मानुले राजे अजमावरी हत केला राजे अजमाने पटयाचे वार देता पाडित मानुले ठार झाले. " याप्रकारें उलटसुलट वृत्तान्त कृष्णाजीचे प्रसंगाविषयीं आढळतात. ९१ कलमीच्या वरील दोन प्रती या बाबतींत प्रमाणभूत मानण्याजोग्या नाहींत. कारण मंडपांत खान–शिवाजीचें द्वंद्वयुद्ध सुरू झाल्यावर **प्रथम** खानाच्या संरक्षणासाठीं तेथें कोण येणें शक्य होतें याचा विचार

कारितां कृष्णाजी हाच पार्श्ववर्ती सेवक अगदीं जवळ म्हणून येणें शक्य होतें व त्याचे जवळच खानानें आपली तलवार भेटीचे वेळीं दिली होती ती खानानें परत घेऊन शिवाजीवर मारावयाचे आधींच त्या पार्श्ववर्ती सेवकानें (कृष्णाजीनें) शिवाजीवर ती चालविली असा उल्लेख शिवभारतांत आढळतो. असें असतां ९१ कलमी बखरींत **प्रथम सैद बंडा** आल्याचें सांगितलें आहे. हा क्रम येथें साफ चुकला आहे. दुसरी चूक म्हणजे सय्यद बंडास जिवा महाला यानें मारिलें असतां तानाजीनें किंवा येसाजी कंकानें त्यास मारिलें असें सांगितलें आहे. यामुळें त्यांतील या प्रसंगासंबंधाच्या माहितीवर कितपत विश्वास ठेवणें योग्य होईल हा प्रश्न आहे. शिवकालीन पोवाडाकार अज्ञानदास हाहि आपल्या जुन्या पोवाड्यांत श्रीशंकर, शहाजी व भोसले घराणें यांना ब्रह्म-हत्या मानवणार नाहीं असा विचार शिवाजी राजानें मनांत आणून त्या वेळीं कृष्णाजीस जिवंत सोडिलें असें म्हणतो. सभासदानें वर सांगितल्याप्रमाणें कृष्णाजीचा प्रसंगच दिला नाहीं. कदाचित् इतकें लाघव करण्याचें कारण त्यास वाटलें नसावें. जेधकरीना व जेधे-शकावलि या ग्रंथांत कृष्णाजीचा यासंबंधाचा वृत्तान्त दुय्यम म्हणूनच अनुल्लेखित राहिला असावा. चिटणीसाच्या बखरींत कृष्णाजीऐवजीं गोविंदपंत असें भलतेंच नांव आलें असलें तरी तींत व शिवदिग्विजयांत "देवद्विजगवां गोप्ता" हें शिवाजी-महाराजांचें बिरुदच या कृष्णाजीचें प्रसंगीं व्यतीत केलें आहे. याप्रमाणें कृष्णाजीची स्वामिनिष्ठा ठरविणेचे बाबतींत व तो या वेळीं वांचला कीं मेला याचा निर्णय करण्यास जेवढी माहिती उपयुक्त होईल तेवढी येथें दिली आहे. यापैकीं विश्वसनीय हकीगतीवरून खानाशीं तो शेवटच्या प्रसंगीं तरी खचित स्वामिनिष्ठ राहिला व

या प्रसंगांतून तो जिवंत बाहेर पडला असावा असें अनुमान काढल्यास वावगें होणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

आतां शिवाजीमहाराजांचा वकील पंताजी गोपीनाथ याचे-विषयीं एका मुद्यावर मतभेद दिसतो त्याचा विचार करूं. तो मुद्दा म्हटला म्हणजे त्यास या अफजलप्रसंगीं त्यानें केलेल्या कामागिरीबद्दल " त्याचा रहाता हिवरे गांव " महाराजांनीं इनाम दिला असें जे कांहीं ग्रंथकार म्हणतात तें बरोबर आहे काय ? ९१ कलमी बखरींत व शिवदिग्विजय बखरींत पंताजी गोपीनाथास हिवरे गांव इनाम दिल्याचा उल्लेख आढळतो. यास आधार मूळ अस्सल कागदपत्रांत सांपडत नाहीं. या दोन बखरींचे आधार म्हणजे दोन भिन्न भिन्न व स्वतंत्र आधार असें मानणेंही तितकेंसें बरोबर होणार नाहीं. त्या दोन्ही बखरी जवळजवळ दोन जुळ्या मुलांसारख्या वाटतात. त्या अगदीं एका वेळीं जन्मास आल्या नसतील, परंतु त्या इतक्या जवळच्या आहेत कीं, एक दुसरीचा आधार म्हणतां येईल. त्या दोन्ही उत्तर पेशवाईंतील दिसतात, शिवकालीन नाहींत. शिवदिग्विजयांतील भाषा जुनी असल्याचा व त्या बखरीचा काल शके १७४० असल्याचा अभिप्राय कै. राजवाडे देतात. त्यांच्या म्हणण्याचा झोंक असा कीं, ग्रंथकारानें त्या बखरींत जुने कागदपत्र पाहून त्यांतील भाषेसह मजकूर लिहिला आहे. परंतु त्यांचें हें म्हणणें सूक्ष्म ग्रंथपरीक्षण केल्यास सर्वांशीं टिकणारें नाहीं असें इतर कांहीं इतिहास-संशोधकांचें मत दिसतें. कांहीं लेखकांच्या मतें सदर बखरींतील भाषा जुनी असली तरी त्या ग्रंथाचा लेखक एक नाहीं व त्यांत चुकीची व विसंगत माहिती घातली गेली असून खऱ्याखोट्याची खिचडी झाली आहे. पेशवाईंतील लिखाणाचीं वैशिष्ट्यें त्यांत बरीचशीं

आढळतात. यामुळें या बखरींतील माहिती सावधगिरीनेंच स्वीकारावी लागते. त्यांतील सर्वच माहिती अविश्वसनीय आहे असें अर्थातच कोणाचें म्हणणें नाहीं. किंवा ती सर्वच्या सर्व विश्वसनीय आहे असे राजवाडे यांचें म्हणणें नाहीं प्रस्तुत वादग्रस्त मुद्या-पुरतें लिहावयाचें तर हिवरें गांव पंताजीपंतास बक्षिसांचे वांटणींत शिवाजीनें दिला नाहीं हें खरें दिसतें. हिवरे प्रथम शाहूराजानें दिलें. छत्रपति शिवाजीमहाराजांनीं दिलें नाहीं हें एक व दुसरें असें कीं, ते पंताजीपंतास दिलें नाहीं तर त्यांचा जो चुलत भाऊ महादाजी बोकील यमाजी त्यास इनाम दिलें. शाहूराजानीं प्रथम हें गांव इनाम दिल्याची अस्सल सनद भारतवर्ष व इतिहाससंग्रह या दोन ठिकाणीं छापलेली आहे. त्याचप्रमाणें " पंताजी गोपीनाथ याजकडे त्या गांवचा संबंध नाहीं " हेंही स्पष्टपणें तेथें नमूद केलें आहे. या विश्वसनीय उल्लेखावरून पंताजीस हें गांव शिवाजीमहाराजांनीं इनाम दिलें असें म्हणणें सत्यास धरून होणारें नाहीं असें वाटतें. वरील प्रकारची माहिती लक्षांत घेऊनहि कोणीकोणी ९१ कलमी बखर शिवकालीनच आहे असा आग्रह धरतात. तात्पर्य, पंताजीच्या कामगिरींचें कौतुक महाराजांनीं अपार द्रव्य रोख देऊन व मूल्यवान् वस्त्रालंकारांचे नजराणे देऊन केलें हेंच म्हणणें शेवटीं बरोबर दिसतें. शिवाय महाराजांचा दंडक सामान्यतः गांवें इनाम देण्याचा नसे हेंहि लक्षांत ठेवणें जरूर आहे.

शेवटीं विश्वसनीय बखरकार सभासद हा मंडपांतील घटना निवेदन करींत असतांना कृष्णाजीचा विशेष उल्लेख कां करींत नसावा व पंताजीपंत अथवा पंताजी पंडीत अथवा पंताजी गोपीनाथ याचा सविस्तर उल्लेख व या एकंदर अफजलप्रसंगीं गौरवानें

तो कां करतो याची कारणमीमांसा करूं लागल्यास संकीर्ण साहित्य खंड १ ( ११९ ) येथें पंताजीविषयींची जी एक संस्मरणीय गोष्ट नमूद केली आहे ती विचारांत घेणें आवश्यक वाटतें. एके दिवशीं रोहिड खोऱ्यांतील आंबोडे गांवीं बाजारचे दिवशीं रायाजी देशमुखानें कमअकली करुन पंताजी पंडीताची बेअदबी केली. हें कृत्य जेव्हां अधिकाऱ्यास कळलें तेव्हां ते लिहितात:— " पंडीत बहुत थोर मनुष्य आहेत. साहेबांचे ( शिवाजीराजांचे ) मेहेरबानींत ते बहुत कांहीं आहेत. असें असतां तुम्ही लहानलोकीं त्यासी बेअदबी केली तरी साहेबांची रवेशी तरी तुम्हांस ठावकीच आहे. याउपरी कुल तुम्ही पंडित मझारविलेपाशीं जाऊन बजीद होऊनु आपला गुन्हा माफ करूनु घेणें. जरी सदरहूं लिहिलेप्रमाणें अमल न करा आणि त्याचा बयेदा वारिला नाहीं म्हणजे साहेब तमाम रजपुतांचे पायीं बेडिया घालुनु गळा तोग घालुनु किले राजगडावर ठेवुनु धोंडे वाहवितील. येसे बरे रीति समजोन पंडित मशारनिल्हे साहेबांचे जागीं समजोनु आदब बरखुद राखत जाणें. " या पत्रांतील मजकुरावरून शिवाजीमहाराजांचे दरबारीं पंताजींचें केवढें वजन होतें हें वाचकांचे ध्यानीं येईल. शिरवळ, लोहगांव या ठिकाणीं त्यांना घरवाड्यास जागा दिली होती. यांना पुढें सबनीस, चिटणीस असे हुद्देही लावलेले आढळतात. अफजलखानाचा प्रसंग घडण्यापूर्वी त्यांचेकडे मुजुमदारी होती. अशा प्रतिष्ठेचा व थोरवीचा हा पुरुष असल्यामुळें सभासद याचा विशेष उल्लेख आपल्या बखरींत कां करतो व कृष्णाजी भास्कराचा तसा कां करीत नाहीं यांतील मर्म वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

या दोन वकीलांच्या संबंधांत कांहीं ग्रंथकर्त्यांचे व लेखकांचे गैरसमज झालेले दिसतात. एकाच नांवाच्या दोन व्यक्ति एकाच काळीं परस्परविरुद्ध पक्षांत विद्यमान् असल्या म्हणजे लोकांचा गैरसमज होणें व एकाची माहिती दुसऱ्यास लागूं करणें म्हणजे माहितीची सरमिसळ होणें अशाप्रकारचे प्रमाद घडणें स्वाभाविक असतें. कृष्णाजी भास्कर या एकाच नांवाच्या दोन व्यक्ति एकाच काळीं एकमेकांविरुद्ध पक्षांत दिसून येतात. अफजलखानाकडे व शिवाजीकडे या नांवाचे दोन अधिकारी होते अशी माहिती कांहीं अस्सल पत्रांतून दिलेली आढळते. यामुळें कित्येकांचे या दोन व्यक्तींविषयींचें विवेचन निर्मळ व निर्दोष न होतां गोंधळाचें व घोटाळ्याचें झालें असल्यास नवल नाहीं. दोनहि वकिलांस "पंत" शब्द लागत असल्यानें ग्रँटडफची गैरसमजूत झालेली आहे हें निश्चित आहे. हिवरे गांवाचे इनामासंबंधीं कै. चिं. वि. वैद्य आपल्या शिवचरित्रग्रंथ पान ४५ येथें लिहितात कीं :—"पंताजी गोपीनाथ हा पुरंदराजवळील हिरवे गांवचा कुलकर्णी होता. या बोकील घराण्यांत पुढें सखारामपंत बोकील झाला व त्यास हिरवे (हिवरे) गांव इनाम मिळाला. भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश, १९३७, पान ५११ येथें विद्यानिधि चित्राव यांनीं "या कामगिरीबद्दल याला (पंताजी गोपीनाथाला) भोळी व मांडकी या गांवीं एक एक चावर जमीन व मांडकी येथे सेटेपणाचें वतन दिलें; शिवाजीनें दिलेल्या देणगीचे कागदपत्र पुनः शाईनें यास करून दिले" अशी हकीकत दिली आहे. असो एवढें विवेचन येथें कारणापुरतें करून नांवामुळें गोंधळ माजविणाऱ्या या दोन वकीलांचें वादग्रस्त प्रकरण संपवितों.

## आक्षेप खंडन

अशा रीतीनें शिवाजीमहाराजांवर व महाराष्ट्रावर जें संकट आलें होतें तें महाराजांनीं मोठ्या धैर्यानें व मुत्सद्देगिरीनें उडवून लाविलें. इतकेंच नव्हे तर इतका विलक्षण आत्मविश्वास त्यांनीं आपल्या लोकांत उत्पन्न केला आणि शत्रुपक्षाची हिम्मत इतकी खच्ची करून टाकली कीं, महाराजांनीं अफझलखानास मारल्यापासून अवघ्या १८ व्या दिवशीं म्हणजे ता. २८ नोव्हेंबर १६५९ रोजीं पन्हाळा घेतला; म्हणजे अदिलशाहीच्या राज्य-रथाचा जणूं कणाच भंगून टाकला! त्या पुढील विषयांत आप-णांस या ठिकाणीं शिरावयाचें नाहीं. येथें फक्त खानास मारल्या-नंतर महाराजांच्यावर जो प्रवाद कांहीं मुसलमान लेखक व ग्रँटडफसारख्या इतर कांहीं लेखकांकडून घेण्यांत आला व येतो कीं शिवाजीनें खानाला कपटानें मारलें त्याविषयीं आणखी चार शब्द उत्तरादाखल लिहावयाचें आम्हीं ठरविलें आहे. वर जो वृत्तान्त सांगितला आहे त्यांत अफझलखानाच्या मृत्यूला स्वतः खान व अदिलशहा हे जबाबदार आहेत कां त्याचा दोष शिवाजी-वर येतो हें ठरविण्यासाठीं पुरेशी माहिती ठिकठिकाणीं वर आलीच आहे. सुज्ञ वाचकांस ती शिवाजीनें दगा केला नाहीं— दगा खानानें केला हें ठरविण्यास पुरेशी होईल. तथापि कांहीं गोष्टींचा उल्लेख पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही येथें पुन्हा करणें व कांहीं अधिक माहिती सांगणें जरूर वाटतें म्हणून सारांशानें ती या ठिकाणीं देत आहे. “ शिवाजीला पक्केपणीं बांधून मी तुमच्या पुढें आणतो ” अशी खानानें प्रतिज्ञा केली होती, व तें त्याचें अव्वलपासून अखेरपर्यंतचें ध्येय व धोरण होतें. त्याचा निर्वाळा शिवभारतकारांनीं व अनेक मराठी बखरकारांनीं एकमुखानें

नगर वाचनालय सातारा
संग्रहांकित



दिला आहे. बडीसाहेबीणीचा हुकूम शिवाजीशी गोड बोलून मित्रत्वाचा बहाणा करुन पकडण्याचा किंवा मारण्याचा होता. या बद्दलचाही पुरावा आतां उपलब्ध झालेला आहे. राजापूर हेन्री रेव्हिंग्टन व रॅंडॉल्फ टेलर कंपनीनें सुरतेतील आपल्या अधिकाऱ्याला लिलिलेल्या ता. १० डिसेंबर १६५९ च्या इंग्रजी पत्रांत म्हणजे ही घटना झाल्यापासून अवघ्या एक महिन्यानें जो मजकूर लिहिलेला आढळतो त्यांत "against whom ( Shivaji ) The Queen this year sent Abdoolah Khan with an army of 10,000 horse and foot and because she new, with that strenght, he was not able to resist Shivaji she cancelled him to pretend friendship with his army which he did." and the other ( i e. Shivaji ) whether through intelligence or suspicion, it is not known, dissembled his love towards him."

( दहा हजार घोडदळ व पायदळ असें सैन्य देऊन राणीनें अफजलखानास शिवाजीवर पाठविले व तेवढ्या सैन्यानिशी शिवाजीचा प्रतिकार करणें शक्य होणार नाहीं असें जाणून तिनें शिवाजीच्या सैन्याशीं मित्रत्वाचा बहाणा करून पहावे अशी त्यास आज्ञा दिली आणि त्याप्रमाणें त्यानें केले.") असा स्पष्ट उल्लेख आहे. तो वर एकवेळ दिलेलाच आहे. त्याचप्रमाणें कान्होजी जेध्यास आदिलशाहीकडून आलेल्या हुकूमांत "**शिवाजीचा निर्मूळ फडशा करावा.**" असे स्पष्ट शब्द आहेत. त्या अदिलशाही फर्मानांतील लागू पुरता उतारा खालीं दिला आहे:—

"शिवाजीनें अविचारानें व अज्ञानानें निजामशाही कोकणांतील मुसलमानांना त्रास देऊन लूट करून पादशाही मुलुखांतील

कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. यास्तव त्याचे पराभवार्थ.... अफजलखान महंमदशहा यास तिकडील सुभेदारी देऊन नेमून पाठविले आहे. तरी खानमाचे रजामंदित व ताबेदारींत राहून... **शिवाजीचा पराभव करून निर्मूळ फडशा करावा....** शिवाजीचे निसबतीचे लोकास आश्रय न देतां ठार मारून या दौलतीचे कल्याण इच्छिणें. खानाच्या सांगण्यावरून...तुमची योग्यता वाढविली जाईल त्याचे सांगण्याप्रमाणें वागावे. तसे न केल्यास परिणाम चांगला होणार नाहीं हे जाणून या सरकारी आज्ञेप्रमाणें चालावे. तेरीख......" (शिवकालीन पत्रसार संग्रह खं. १ पत्र नंबर ७७४, १६५२ जून १६) तसेंच एका समकालीन डच पत्रांत (एप्रिल १६६०) हीच बडे साहेबिणीची सल्ला असल्याचा उल्लेख आहे. सदरहु पत्र नं. ८१२ चे हेगसंग्रह–डच पत्रव्यवहार असा उल्लेख करून शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ पान १८४ येथें छापलेलें आहे. त्यांतील मजकूर खालीलप्रमाणें आहे:—" या शिवाजीला शस्त्राच्या जोरावर तरी नाहींसा करा किंवा गोड शब्द व सलोख्याची अघळपघळ वचनें देऊन तरी त्याचा जीव घ्या" असा स्पष्ट हुकूम बादशहानें दिला व तो खानाला दरबारांतील एका अत्यंत वजनदार गृहस्थामार्फत कळविला."

त्याचप्रमाणें भेटीची कल्पना खानानें मान्य केली, व भेटीचे वेळीं महाराजांची मुंडी त्यानें बगलेत दाबून धरली. याबद्दल सर्व महाराष्ट्रीय लेखकांत मतैक्य आहे. सभासद, जेधे करीना, जेधे शकावली, शिवदिग्विजय वगैरे अनेक ग्रंथांतून या गोष्टीला पाठिंबा मिळतो. व मुंडी काखेंत दाबल्यावर खानानें महाराजांच्या कुशीवर कट्यार मारली, हेही सत्य दिसते ! शिवभारतकार परमानंद हा महाराजांनीं आपल्या पदरीं ठेवलेला कवी असून त्यांचे

हयातींत तो होता. त्यांनीं याप्रसंगीं जें शिवभारतांत लिहिलें आहे तें असें—

> अेवमुक्त्वा स तदग्रीवाम् धृत्वा वामेन पाणिना ।
> अितरेणच तत्कुक्षौ निचखान कटारिकाम् ॥

...असें बोलून त्यानें त्याची मान डाव्या हातानें धरून दुसऱ्या ( उजव्या ) हातानें त्याच्या कुशींत कट्यार खुपसली.

यावरून खानाचा शिवाजीला कपटानें मारण्याचा हेतु होता. व त्याप्रमाणें त्यानें प्रयत्न केला हें स्पष्ट होतें. त्याचप्रमाणें शिवाजीला भेट देण्यापूर्वीं क्षणभर शिवाजीच्या मनावर आपण निष्कपट आहे असें बाह्यात्कारी दाखविण्याकरितां खानानें आपल्या हातांतील जमदाड आपल्या रक्षकाच्या हातांत दिली असाही स्पष्ट उल्लेख शिवभारतांत आढळतो. त्यावरूनहि शिवाजीला दगा देण्याचा हेतू खानाचा होता हें स्पष्ट होतें. त्याचप्रमाणें भेटीच्या कराराची शर्त मोडून त्यानें १५०० स्वार जनीच्या टेंबेपर्यंत आणले होते हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. तात्पर्य आदिलशहाचे हुकूम व खानाची या प्रकरणीं झालेली एकंदर वागणूक पहातां खानाचेंच कपट स्पष्ट होते व त्यानेंच शिवाजीची आगळीक याप्रसंगीं प्रथम काढली हेंही सिद्ध होतें. अशा परिस्थितींत कांहीं लेखक शिवाजीनें दगा केला असा जो आरोप शिवाजीवर करतात त्यांत कितीसे तथ्य आहे याचा वाचकांनींच विचार करावा.

जातां जातां वरील प्रकारचा आक्षेप घेणाऱ्या कांहीं मुसलमानी लेखकांच्या या संबंधांतील वृत्तांताची कल्पना वाचकांस देणें इष्ट वाटते. अशा ग्रंथकारांपैकीं खाफीखानाच्या मताचा निष्कर्ष खालीलप्रमाणें आहे.—" खान शिवाजीनें निःशस्त्र भेटीस यावे,

८८५३६

शिवाजीनें त्यास खंडणी द्यावी, नजराणे द्यावेत, जमल्यास शिवाजीनें खानासमवेत विजापुरीं जावे. अशा भेटीच्या शर्ती ठरल्या होत्या. ठरल्याप्रमाणें अफजलखान शस्त्र न घेतां आला परंतु शिवाजीनें घाबरल्याचें सोंग करून तो खानाच्या पाया पडला आणि खान त्याचे पाठीवर हात ठेवून त्यास उठविणार तोंच खानाच्या पोटांत शिवाजीनें आपल्या शस्त्रानें अचानकपणें एवढा जबरदस्त वार केला कीं खानाचा तात्काळ अंतच झाला." खाफीखानाचा हा ग्रंथ अफजल प्रसंगानंतर ७५ वर्षांनीं लिहिलेला आहे. त्या लेखकाला या घटनेची व विजापुराकडील विश्वसनीय स्वरूपाची हकीगत कळलेली दिसत नाहीं हें त्यांतील अनेक विसंगत गोष्टी-वरून सहज दिसून येतें असें विद्वान इतिहास संशोधकांनीं आपलें मत दिलें आहे.

त्याचप्रमाणें बुसातिनें सलातीन या ग्रंथकारानें जी या संबंधांत माहिती दिली आहे तीही विचित्र व अविश्वसनीय दिसते. त्याच्या हकीकतीचा सारांश असा कीं, अफझलखान दहा हजार सैन्या-निशीं आला. त्यानें शिवाजीचा कांहीं मुलूख जिंकला. तेव्हां शिवाजीनें मोठ्या नम्रतेनें पत्र लिहून त्याची माफी मागितली. त्यामुळें खान शिवाजी यांचे सख्य झाले. पुढें खानास शिवाजीनें मेजवानीस प्रतापगडावर बोलाविलें. खान बारा लोकांसह किल्ल्यांत असतांच शिवाजीच्या हत्यारी लोकांनीं गर्दी मारामारी करून त्याला ठार मारले आणि अशा रितीनें असहाय्य होऊन खानाचे सैन्य सैरावैरा पळून गेले. हा सारांश शिवभारत काव्यास कै. द. वि. आपटे यांनीं जी प्रस्तावना लिहिली आहे त्यांत दिलेला आहे. बुसतीनें सलातिन याच्या त्याच ग्रंथाच्या बडोदे प्रतीत यासंबंधीं असलेला मजकूर कै. मोडक यांनी आपल्या ग्रंथांत

खालीलप्रमाणें उद्धृत केला आहे. "खान हा सरळ मनाचा शिपाई होता. शिवाजी हा खानाच्या डेऱ्यांत जावून खानास भेटला व त्यानें त्याला गडावर मेजवानीस बोलाविलें. खान निष्कपटी असल्यानें तो निःशंकपणें गडावर गेला. तेव्हां खान हा मदतीशिवाय व थोड्या लोकांनिशीं आलेला पाहून शिवाजीनें त्याला सरबतांत विष घालून मारले." उभयतांच्या सारांशांत एकाच ग्रंथाच्या वेगवेगळ्या प्रती असल्यास व त्यांतील मजकूर वेगवेगळा असल्यास भिन्नत्व आलेलें असावें. तें कांहींहि असले तरी एकंदरीत तडजोडीचे बोलणें लावून कपटानें घात करण्याची कल्पना शिवाजीनें योजली असें मुसलमानी लेखकांचे म्हणणें दिसतें. पण ही कल्पना खानाचीच होती हें राजापूरच्या इंग्रजी व्यापाऱ्यांनीं लिहिलेल्या तत्कालीन पत्रांतील मजकुरावरून स्पष्ट होते. आणि शिवाजीचा व त्याचे निसबतीचे लोकांचा निर्मूळ फडशा पाडावा म्हणून आदिलशहानें जेध्यास लिहिलेल्या आज्ञापत्रानें त्याला पुरेपूर पाठिंबाहि मिळतो. अशा स्थितींत मुसलमानी लेखकांची वरील विचारसरणी कितपत विश्वसनीय मानावी हा प्रश्नच आहे. या मुसलमानी लेखकांच्या वृत्तांताच्या खरेखोटे-पणाची चर्चा करण्याइतकी त्याची वस्तुतः लायकी नसल्यानें व त्याचा खोटेपणा वर निर्दिष्ट केलेल्या तत्कालीन व इतर विश्वसनीय ग्रंथांतील वृत्तांताशीं ताडून पाहिला म्हणजे आपोआपच त्यांच्या माहितीचा व तर्काचा डोलारा सत्याच्या फुंकरानें पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें ढासळून पडणार आहे! सबब त्याविषयीं येथें अधिक लिहिण्याची जरूर नाहीं. शिवाय "लबाड" शिवाजी-वर ज्याला पाठविला तो पहिल्या प्रतीचा सरदार इतका भोळा-भाबडा होता काय, आणि जिनें तो पाठविला ती बडी बेगमही

इतकी वेडी होती काय ? असो. याबाबतींत वरील एकंदर आधारभूत हकीकतीवरून :—

(१) शिवाजीला जिवंत पकडून नेण्याचे ध्येय व धोरण खानाच्या मनांत आरंभापासून अखेरपर्यंत होते.

(२) विजापुराहून वाईला आल्यानंतर तहाची वाटाघाट खानानें प्रथम सुरूं केली.

(३) शिवाजीनें या वाटाघाटीनें भेटीच्या कल्पनेची जोड दिली.

(४) खानानें ही कल्पना मान्य व कबूल केली व भेटीच्या वेळीं त्यानें शिवाजीची मुंडी बगलेंत दाबून धरली आणि

(५) शिवाजीला खानाच्या कपटी हेतूची कल्पना असल्यानें शिवाजीला आत्मसंरक्षण करतां आले व आत्मसंरक्षण करतां करतां खानाला ठार मारतां आले.

या पांच मुद्यांवर सर्व महाराष्ट्रीय लेखकांचे मतैक्य आहे असें कै. आपटे यांनीं ठामपणें मांडलें आहे. या एकंदर विवेचनावरून शिवाजीच्या अंगीं कपटाचा दोष चिकटविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे सूर्य प्रकाशाला काळोख म्हणण्याइतके हास्यास्पद ठरेल हे वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

शेवटीं प्रोफेसर यदुनाथ सरकार यांनीं आपल्या शिवचरित्र ग्रंथांत या संबंधी जो अभिप्राय महाराष्ट्रांत एकमुखानें प्रतिपादिला जातो तो खालील शब्दांत समर्पक रीतीनें दिला आहे.

" To the Marathas the fight with Afzal has always appeared as at once a war of national liberation and a crusade against the deseerator of temples. Their historians have seen no element of murder in the incident

but always described it as a glorious example of the segacity, courage and agility with which their National hero averted a treacherous plot against his life, made the treachery recoil on the Plotter's head and avenged the outraged shrines of their Gods."

"अफजलशीं केलेलें युद्ध हें मराठ्यांच्या दृष्टीनें आपल्या राष्ट्राला दास्यमुक्त करण्यासाठीं व आपली देवस्थानें भ्रष्टविणाऱ्यांचें पारिपत्य करणेसाठीं म्हणून एकसमयावच्छेदेकरून केलेलें स्वातंत्र्ययुद्ध व धर्मयुद्ध होतें. मराठ्यांच्या इतिहासकारांना त्या घटनेंत खून दिसत नाहीं. परंतु मुत्सद्देगिरी साहस व अंगचापल्य या गुणांचे ते एक अत्यंत उदात्त व वैभवशाली उदाहरण असून त्या गुणांच्या जोरावर आपल्या राष्ट्रनेत्यानें त्याच्याविरुद्ध रचलेलें विश्वासघातकी कारस्थान उडवून लावलें इतकेंच नव्हे तर तो डाव कारस्थान करणारांच्याच डोक्यावर उलटविला. आणि आपल्या देवस्थानांच्या भ्रष्टाकाराबद्दल सूड घेतला असेंच त्या घटनेचें त्यांनीं नेहमीं वर्णन केलें आहे." रेव्हिंगटनहि शिवाजीनें दगा केला असें म्हणत नाहीं.

डॉ. बाळकृष्ण आपल्या 'शिवाजी दि ग्रेट' या शिवचरित्र ग्रंथांत रेव्हिंगटननें ता. १० डिसेंबर १६५९ रोजीं लिहिलेल्या पत्राला उल्लेखून म्हणतात.

"His letter is explicit on the point that Afzalkhan was advised by the Queen to have recourse to dissimultation and teachery and that Shivaji, learning of the treacherous design, endeavoured to counteract the plot by various methods in self defence. It was thus a fight of wits in which Afzal was ultimately

outwitted by the shrewd and courageous Shivaji. Revington on did not consider the murder of Afzal-khan as an act of treachery. This contemtorary view of the tragedy confirms the statements of the Maratha Chronicles."

मित्रत्वाचा बाह्यात्कारी खोटा बहाणा करून दगा करणेबद्दल अफजलखानास राणीनें सल्ला दिली. आणि या कपटी डावाची शिवाजीस माहिती मिळाल्यामुळें त्यानें आत्मसंरक्षणाचे कामी त्या डावावर प्रतिडाव करण्याचे अनेक प्रकारचे प्रयत्न केले. या मुद्यावर त्याचे (रेव्हिंग्टनचे) पत्र निःसंदिग्ध आहे. याप्रमाणें युक्तिप्रयुक्तिची वा हिकमती करामतीचीच लढाई होती व तींत धूर्त व धैर्यवान शिवाजीपुढें खानास शेवटीं हार खावी लागली. अफजलवध हे विश्वासघाताचें कृत्य आहे असे रेव्हिंगटनें मानिलेले नाहीं. एकंदरींत त्या दुःखद घटनेसंबंधिचे हें मत मराठी बखरकारांच्या वृत्तांतास पाठिंबाच देते" डॉ. बाळकृष्ण यांनीं या घटनेची केलेली मीमांसा योग्य व बरोबर असून वरील अभिप्रायास पुष्टिदायकच आहे. रेव्हिंग्टन व त्याचे सहव्यवसायी हे अफजलखानाचे मृत्यूचेवेळीं कोल्हापुरी होते व तेथें त्यांना या घटनेचे वृत्त कळलें हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे.

आतां राहतां राहिला आक्षेपकांचा एक आधार. त्यांचा विचार करून हा उहापोह संपवितो. कांहीं आक्षेपक यासंबंधात शिवाजीवरील कपटाच्या आक्षेपास शिवाजीनेंच पुढें जयसिंगास लिहिलेल्या पत्रांतील— "मी त्याचेवर (अफजलखानावर) प्रथम हत्यार चाल्रविले नसते तर"—या ओळींचा आधार पुढें करतात. आणि शिवाजीनेंच प्रथम आगळीक केली व त्यानेंच खानाचा

घात कपटानें व दगेबाजपणानें केला असा खानाच्या वतीने शिवाजीस दोष देतात. सैतानानें बायबलचा आधार सांगण्यासारखीच हीं गोष्ट आहे. शिवाजीनें जयसिंगास लिहिलेले पत्र फारशी भाषेंत असून तें कवितावद्ध आहे. "नागरी प्रचारिणी पत्रिका" नांवाच्या हिंदी त्रैमासिकांत बाबु जगन्नाथदास यांनीं तें प्रसिद्ध केलें आहे. या पत्रांत कांहीं मजकूर मागाहून घुसडलेला अतअेव प्रक्षिप्त आहे. इतकेंच नव्हें तर तें पत्रच कदाचित बनावट असावें असाही एक आक्षेप आहे. त्याची चर्चा येथें न करितां आहे तें पत्र सत्य व ग्राह्य समजून पुढें चालणें हेंच याठिकाणीं युक्त होईल. या आक्षेपाला शिवाजीनेंच या पत्रांत उत्तर देऊन ठेविले आहे. ते डोळ्याआड करून कसें चालेल? त्यासाठीं सदर पत्रांतील लागू पुरता उतारा जशाचा तसा खालीं देत आहोंत.

"जे अंजामे अफजल मशौ बद्गुमां। कि ओरा न बुद रास्ती दरमियां॥
छे जन्गी सवारानें परखाशजू। हजारो दो सद दर कमीं दास्त उं॥
अगर पेश दस्ती न कदिम बरो। कि अिं नामः अकनू बतो॥

याचें हिंदींत मोकळे भाषांतर खालीलप्रमाणें:—

अफजलखांके परिणामसे तू शंकित मत हो, क्योंकि उसमें सचाअी नहीं थी। बारह सौ बडे लढाके हब्शी सवार वह मेरे लिये घातमे लगाअे हुये थे। यदि मै उसपर पहिले ही हाथ न फेर था तो अिस समय यह पत्र तुझको कौन लिखता।

याचे मराठींत भाषांतर खालीलप्रमाणें:—

"अफजलखानाचा शेवट कसा झाला हें लक्षांत आणून तूं शंकित होऊं नको. कारण त्याच्यांत खरेपणा व प्रामाणिकपणा नव्हता. त्यानें बाराशे लढवय्ये हबशी घोडेस्वार **माझा घात करण्यासाठीं** ठेविले होते. त्याच्यावर मी प्रथमच हात चालविला नसता तर यावेळीं हें पत्र तुला कोणी लिहिलें असतें?"

यावरून खानावर पहिला हात शिवाजीनें केला असें मानलें तरी खानाच्या मनांत खरेपणा किंवा प्रामाणिकपणा नव्हता म्हणून "शठं प्रति शाठ्यम्"—या न्यायानेंच तो **आत्मसंरक्षणासाठीं** केला असा शिवाजीनें आपला दावा या पत्रांत मांडला आहे. "पहिला हात मी खानावर चालविला नसता तर हे पत्र लिहिण्यास मी जिवंत राहिलो नसतो" असें शिवाजीचेच आपल्या कृत्याच्या समर्थनार्थं म्हणणें आहे. या काव्यपंक्तींतील उत्तरार्ध फार महत्त्वाचा आहे. त्यायोगें शिवाजीच्या जिवावर बेतणारें अरिष्ट त्यानें टाळलें म्हणजे स्वसंरक्षणासाठीं त्यानें खानास मारिलें असें शिवाजीचें स्पष्टीकरण आहे. शिवाजीच्याच शब्दांचा अर्धा आधार घ्यावयाचा व अर्धा सोडून द्यावयाचा असे करून कसे चालेल? खान मनांत कपट ठेवून शिवाजीचा घात करण्यासाठीं आला होता असा शिवाजीचा खानावर आरोप आहे. हेंच या पत्रांतील मजकुरानें उलट शाबीत होतें. केवळ वादाकरितां शिवाजीनें फसवणूक केली असें मानले तरीही त्याला समर्पक उत्तर देतां येण्याजोगे आहे. युद्धमान स्थितींत फसवणूक हा सर्व देशांनीं वेळोवेळीं शत्रूपासून बचाव करण्यासाठीं व त्याच्यावर चढाई करण्यासाठीं अवलंबिलेला एक उपाय आहे. युद्धशास्त्रांत ते एक महत्त्वाचें शस्त्र आहे. व त्यावेळींही प्रचलित होतें. तत्कालीन परिस्थिती पाहिली तर त्याकाळीं शांतता मुळीच नव्हती. सतत संगरावस्था माजून राहिली होती. शिवाजी व आदिलशहा यांचे दरम्यानचे संबंधही शत्रुत्वाचे व युद्धमानस्थितीचे होते. सलोख्याचे मुळींच नव्हते. अशा स्थितींत प्राण घेण्यासाठीं बादशहाचा हुकूम हातांत घेवून शत्रु वेशीपाशीं येऊन भिडला, तो मित्रत्वाचा खोटा बहाणा करून तो आपल्याला धरूं मारूं पाहणार व सर्वस्वी आपला व आपल्या राज्याचा व

धर्माचा नाश करणार यांत शंका उरलेली नाहीं. शुद्ध नीतीचा त्यापुढें निभाव लागणें अशक्य झालेलें, अशा स्थितींत साधेल त्या फसवणुकीच्या उपायांनीं स्वतःच्या, स्वदेशाच्या व स्वधर्माच्या रक्षणासाठीं त्या शत्रूला नामोहरम करणें हें तत्कालीन वा प्रचलित राजनीतीस व व्यवहारनीतीस असंमत होते व आहे काय? शिवाजीला महाडहून परत येतांना अचानकपणें पकडण्याचा कपटी डाव अदिलशहाचा सरदार बाजी शामराज यानें चंद्रराव मोऱ्याच्या सहाय्यानें योजला नव्हता काय? शहाजी राजांना कपटानें पकडण्याची अधमपणाची युक्ति अदिलशहानें तो शत्रु नसतांना किंवा त्याचेवर युद्ध पुकारलेलें नसतांना मुस्तुफा खान, बाजी घोरपडे, यांच्या मार्फत योजिलेली नव्हती काय? अवघ्या शंभर घोडेस्वारानिशीं फसवणुकीनें नाडिया काबीज करणारा बखत्यार खिलजी व त्याचप्रमाणें अगदीं थोड्या फौजेनिशी देवगिरी घेणारा अल्लाउद्दीन खिलजी यांचे दाखले इतिहासांत आहेत ना? सत्तर हजार सैन्यानिशीं पुणें प्रांत बळकावून पुण्यांत खुद्द शिवाजीच्या लालमहालांत घुसणाऱ्या शाहिस्तेखानाचा मूळचा अन्याय केवळ तो " उजागर " असल्यानें तसा भासूं नये. पण तसल्या अन्यायी व बलाढ्य शत्रूवर शिवाजीनें रात्रीं आकस्मिक छापा घालून त्यास धडा दिला तो मात्र दगेबाजपणाचा, कपटाचा व अश्लाघ्य वाटावा हें बरोबर आहे काय? युद्धप्रसंगीं शत्रूशत्रूंत होणाऱ्या या स्वरूपाच्या घटना क्षम्यच ठरतात. निंद्य खचित नाहींत. युद्धनीतीनें त्या न्याय्यच मानिल्या आहेत. खानहि कांहीं याप्रसंगीं पांढरें निशाण उभें करून आला नव्हता! असो; असे उल्लेख सर्व देशांच्या इतिहासांत कितीतरी सांपडतात! मग शिवाजीलाच या युद्धनीतीच्या गुहेंत शिरून त्याची मान मुरगळून त्याला मारण्यासाठीं किंवा त्याला पिंजऱ्यांत पकडून

विजापूरला नेण्यासाठीं आदिलशहाच्या फर्मानाप्रमाणें मित्रत्वाचे नांवाखालीं कपटप्रबंध रचून आलेला तो विजापूरचा बडा धिप्पाड पारधी त्या सिंहानें आपल्या प्रखर पंजाचा चपेटा त्याच्या वर्मस्थानीं मारून निमिषार्धांत जागच्या जागीं गर्क केला नसता तर महाराष्ट्राचा वा भारताचा नंतरचा इतिहास कसा रंगला असता हें न कळण्याइतका शिवाजी त्यावेळींही भोळा नव्हता व आजही त्याचा निरंतर ऋणी असलेला महाराष्ट्र खुळा नाहीं ! उलटपक्षीं खानाचा कपटी डाव शिवाजी बेसावध राहण्यामुळें यशस्वी झाला असता तर त्याचे देव्हारे विजापूर दरबारीं केवढे माजले असते याचीही कल्पना शिवाजीच्या आक्षेपकांना नसण्याइतके तेही खचित अजाण नाहींत. मग असल्या फोल आक्षेपांची धूळफेक इतिहासाच्या आरशावर आक्षेपकांनीं कां करावी हेंच समजत नाहीं. तात्पर्य खानाचें कपट शिवाजी महाराजांनीं ओळखलें व त्याचा डाव मोठ्या मुत्सद्देगिरीनें, धूर्ततेनें, सावधानतेनें व साहसानें त्याच्यावरच उलटविला. यामुळें शठ प्रति शाठ्यं-या न्यायानें महाराज प्रशंसेसच पात्र होतात यांत तिळमात्र शंका नाहीं. अगदीं विरुद्ध टोंकाला जाऊन शिवाजीनें हें वाईट कृत्य केलें असें कबूल न करतां केवळ वादाकरतां मानलें तरी तें त्यानें स्वतःच्या रक्षणासाठीं, स्वधर्मरक्षणासाठीं व स्वातंत्र्यसंपादनासाठीं परमपवित्र व उदात्त ध्येयनिष्ठेनें केलें असल्यामुळें तो मुळींच दूषणीय ठरत नाहीं. उलट तें त्याचें कृत्य सत्कृत्यच ठरतें. "Bad actions done with good motives are good." " सद्हेतूनें केलेली दुष्कृत्यें सत्कृत्येंच असतात "

याप्रमाणें ही एकंदर ऐतिहासिक घटना, तिची पार्श्वभूमि व या प्रसंगाचें एकंदर राजकारण पाहिलें म्हणजे—

( १ ) न त्वेवात्मा प्रदातव्यः शक्ये सति कथंचन ।
क्षिप्रं वा सन्धिकामः स्यात् क्षिप्रं वा तीक्ष्णविक्रमः ॥

**भावार्थः**—( शक्य आहे तोपर्यंत आपलें मन किंवा शरीर शत्रूच्या स्वाधीन करूं नये. संधि करीत आहे असें तावडतोब दाखवावें आणि झपाट्याचा पराक्रम जलदी करावा.)

( २ ) न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्तेऽपि न विश्वसेत् ।
विश्वसाद्भयमुत्पन्नं मर्माण्यपि निकृन्तति ।

**भावार्थः**—( जो मनुष्य ( विशेषतः शत्रु ) विश्वास धरण्यासारखा नाहीं, त्यावर विश्वास ठेवूंच नये; पण जो विश्वास धरण्यासारखा आहे त्यावरहि विश्वास ठेवूं नये. अशा विश्वासापासून उत्पन्न होणारी आपत्ति मर्मस्थानेंहि छेदून टाकतात.)

( ३ ) न संशयमनारुह्य नरो भद्राणि पश्यति ॥
संशयं पुनरारुह्य यदि जीवति पश्यति ॥

**भावार्थः**—जिवंत राहण्याचाहि ज्यांत संशय पडतो, असे प्रसंग पडल्याशिवाय मनुष्यास ऐश्वर्य प्राप्त होत नाहीं. अशा प्रसंगांत पडून जिवंत बाहेर पडल्यावर मात्र त्यास ऐश्वर्य मिळतें ( हें सांगणे नको.) " साहसे श्री. प्रतिवसति."

( ४ ) अनागत विधाता च प्रत्युत्पन्नमतिस्तु यः ।
द्वावेव सुखमेधेते दीर्घसूत्री विनश्यति ॥

**भावार्थः**—संकट येण्यांच्या पूर्वींच त्याचा प्रतिकार करून ठेवणारा व प्रसंगीं बुद्धि सुचवणारा या दोघांसच सुख मिळतें; दिरंगाई लावणारा नाश पावतो.)

( ५ ) अच्छद्मना छद्मना वा शत्रुर्वध्यो मृगो यथा ।

**भावार्थः**—जसा वाघ हरणाला समोरून हल्ला न करतां सोईस्कर रीतीनें मागील बाजूनें झडप घालून मारतो त्याप्रमाणें शत्रु म्हटला कीं, त्याला निष्कपटीपणानें काय किंवा कपटानें काय ठार मारणेंच योग्य होय.)

( ६ ) मायाचारी........मायया वधितव्यः ।

भावार्थः—( मायावी स्वरूपाचा ( कपटी व फसवणुकीचा ) आचार करणारास मायावीपणानेंच ( कपटानें व फसवणुकीनेंच ) मारणें योग्य होय. )

( ७ ) व्रजन्ति ते मूढधियः पराभवम् ।
भवन्ति मायाविषु ये न मायिनः ॥
प्रविश्य हि घ्नन्ति शठास्तथा विधान् ।
असंवृताङ्गान्निशिता इवेषवः ॥ ( किरात०–भारवि. )

भावार्थः—( जे मूर्ख जन कपटी मनुष्यांशीं कपटानें वागत नाहींत ( उलट मोकळ्या व निर्मळ मनानें वागतात. ) ते पराभव पावतात. जसे तीक्ष्ण बाण उघड्या अनाच्छादित कवचविहीन शरीरांत शिरून त्याचा संहार करतात तसें लबाड व कपटी लोक निरागस, निष्कपट व मोकळ्या मनाच्या मनुष्यांच्या अंतःकरणांत प्रवेश करून त्यांचा नाश करतात.

सारांश—" **अर्जवम् ही कुटिलेषु न नीतिः** " हा भावार्थ. )

( ८ ) नक्रः स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपि कर्षति ।

भावार्थः—सुसर आपल्या ठिकाणीं असली म्हणजे मोठ्या हत्तीलाहि ओढून नेते. )

( ९ ) Everything is fair in Love and War.

भावार्थः—( प्रेम आणि युद्ध यांत सर्व कांहीं योग्यच असतें. )

या व एतद्सदृश इतर वचनांची आठवण होते व त्यांचा अर्थ रामायण–महाभारतांतील गोष्टी सांगून महाराजांच्या बालपणा-पासून त्यांच्या मनावर बिंबविणारा त्यांचा आद्यगुरु जी राजमाता जिजाऊ ती महाराजांचीच केवळ नव्हे तर अखिल आर्यांची आदर्श आई म्हणून तिच्यापुढेंहि मस्तक आदरानें आपोआप नम्र होतें. असो, आतां या घटनेचें काय परिणाम घडले तें स्थूल-मानानें पाहूं.

अफजल प्रसंगाचा परिणाम :—

या प्रसंगीं ज्या लढाया झाल्या त्यांत अदिलशहाच्या सैन्यातील सुमारे तीन हजार लोक ठार झाले असावेत, असें इंग्रजी व्यापारी रोव्हिंग्टन याचें मत आहे. व बरेच लोक जीव घेवून पळत सुटले असे शिवभारतकार म्हणतो. मराठ्यांचे १७३४ लोक कामास आले व ४२७ जखमी झाले (इ. सं. स्फुटलेख भाग २७२) यावरून मनुष्यहानि फार मोठ्या प्रमाणावर झाली नसावी असें दिसतें. तथापि या प्रसंगानें विजापुरकरांवर मराठ्यांची जरब चांगलीच बसली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. महाराष्ट्राच्या धर्मावरचे मोठें संकट दूर झालें व त्याचें सर्व श्रेय शिवाजी महाराजांनाच आहे अशी लोकांची खात्री झाली. (शि. च. सा. ख., पृ. ६८) आणि महाराष्ट्रांतील लोकांच्या धार्मिक भावना दुखवणाराला देहांत प्रायश्चित मिळालेलें पाहून आदिलशहाच्या दरबारांतील सरदारांवर जो वचक बसला तो विजापुरचें राज्य खलास होईपर्यंत कायम राहिला. महाराजांनींही पुष्कळ मुसलमान लोकांचा विश्वास संपादन केला. यवनांचा विद्वेष करणें किंवा त्यांच्या धर्मावर घाला घालणें हें त्यांचें ध्येय वा धोरण कधींहि नव्हते व नाहीं हें त्यांनीं त्यांना पटवून दिलें. अफझलप्रसंग झाल्यानंतर एका आठवड्यानें महाराजांनीं वाई सुभ्याला उद्देशून एक जाहीरनामा काढला. त्यांत त्यानीं तेथील सर्व मुसलमानी जनतेला, मुसलमानी अंमलांत वागविलें ह्यापेक्षांही आधिक चांगल्या प्रकारें वागविण्यांत येईल आणि त्यांच्या धार्मिक भावनांना केव्हांही धक्का लाविला जाणार नाहीं, त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें व योग्यताप्रमाणें त्यांना नोकऱ्या देण्यांत येतील त्यांचीं देवस्थानें इनामें वगैरे निर्विघ्नपणें होतीं तशीं पुढेंहि चालविण्यांत येतील अशीं आश्वासनें दिली. शेडगांवकर बखर मराठी दप्तर रूमाल पहिला

या ग्रंथांत यासंबंधीं माहिती दिली आहे. महाराजांचें धोरण मुसलमान जातीविरूद्ध असें केव्हांही मुळीच नव्हते. त्यांच्या अतिक्रमणावर व अत्याचारावर त्यांचा रोष होता व गेलेलें स्वराज्य परत मिळविणें व स्वधर्मरक्षिणें एवढाच त्यांचा परमपवित्र हेतू होता. परधर्माविषयीं त्यांनीं नित्य सहिष्णुता व उदारताच दर्शविली. ते मानवतेचे वाली होते. मनुष्य कोणत्याही जातीचा, धर्माचा वा पंथाचा असो त्याचे गुण व योग्यता पाहून त्याला ते जवळ करीत. काजी हैदर हा शिवाजीमहराजांचा चिटणीस होता. बाबा याकूत फकीराला ते गुरू मानींत. खानाच्या भेटीचें वेळीं स्वतःचा एक शरीररक्षक म्हणून इब्राहीम सिद्दीला त्यांनीं खुद्द गडावर बाणाच्या टप्प्यावर ठेविलें होतें. हीं उदाहरणें काय सांगतात ?

## उपसंहार

वर लिहिल्याप्रमाणें शिवाजी महाराजांनीं स्वराज्यावरचें मोठें अरिष्ट टाळल्यानंतर आखिल महाराष्ट्रानें आनंदाची टाळी पिटली. देव धर्म व स्वराज्यसाधन यावरील संकटाचा एकदा कायमचा निकाल लावण्याबद्दलचा समर्थांचा जो उपदेश होता त्याला फळ आलें. कृष्णाकांठ स्नानसंध्येला मोकळा झाला व महाराष्ट्राचें आनंदवनभुवन झाले. असें म्हणून कवींनीं व संतांनीं समाधान व्यक्त केलें. शिवाजी महाराजांवर भवानी देवीच्या कृपेची पांखर पूर्णपणें आहे व स्वराज्य संस्थापनेसाठीं हा देवाचा अवतार झालेला आहे अशी तात्कालीन लोकांची खात्री पटली. महाराजांचीही भवानी देवीवर अनन्यश्रद्धा होती. हा प्रसंग झाल्यानंतर सुमारे दोन वर्षांनीं महाराजांनीं गंडकी नदींतून सुवर्णगर्भ असा श्यामशुभ पाषाण मोठ्या समारभांनें आणाविला. ही गंडकी नदी नेपाळांतून वहात येऊन भागीरथीला मिळते. तिला नारायण ऊर्फ

शाळीग्रामहि म्हणतात. तेथून आणलेल्या त्या सुमंगल पाषाणाची अष्टायुधें धारण करणारी अष्टभुजा देवीची अत्यंत सुंदर व तेजस्वी मूर्ती घडविण्यांत येवून प्रतापगडीं तिची स्थापना महाराजांनीं महोत्सवानें केली. महाराजांना प्रत्येकवेळीं राजगडाहून तुळजापूरला देवीच्या दर्शनासाठीं जाणें कठीण पडूं लागलें होते. त्यांची जगदंबेच्या दर्शनाची व भक्तीभावानें तिची सेवा करण्याची सोयही यायोगें चांगली झाली.

शेवटीं या घटनेचा इत्यर्थ काय म्हणून कोणी विचारलें तर एका पार्थिव देहानें दुसऱ्या पार्थिव देहाचा अंत केला एवढाच सांगावयाचा काय ? नाहीं. त्रिवार नाहीं. इतिहासांत कांहीं प्रसंग वा लढाया अशा असतात कीं, त्यांत सर्व इकडचें तिकडें होऊन जातें. त्याला " टर्निंग पॉइंट " ( परिवर्तन बिंदू ) म्हणून इंग्रजींत म्हटलें जातें. तसलें महत्व त्या प्रसंगांचें असतें. असले प्रसंग इतिहासांतील क्रांतीचे व तत्त्वज्ञानाचे सूचक व प्रतिपादक असतात. तसा हा अफझलप्रसंग आहे. आदिलशाही दरबारांतील अफझलखानाचा पक्ष, मोहिमेंतील ठिकठिकाणच्या त्याच्या मुक्कामांत त्यानें केलेल्या हालचाली, तसेंच खान पैगंबरवासी झाल्यावर त्यामुळें ज्या संकटाचें निवारण झालें म्हणून जे उद्गार जनतेनें काढलें ते; हें सर्व लक्षांत घेतलें तर या प्रसंगीं शिवाजीस मिळालेला जय म्हणजे कोणत्या तत्वाचा जय हे ध्यानीं आणणें विचारवंतांना क्रमप्राप्तच आहे. एऱ्हवीं नुसत्या लढायांमधून होणारे मृत्यू वा त्यामुळें झालेलें जयापजय ह्यासाठीं हर्षविषाद वाटणें हा नुसता देहवाद होय व तो आर्यमनाला रुचणारा नाहीं. या दृष्टीनें पाहतां " शिवदैवतद्वेषी " खान, त्याचा शहा व दरबारांतील त्यांचा पक्ष म्हणजे, राज्य चालविणें संधि पाहून पण महंमदी धर्माचा सक्तीनेंहि स्वीकार करण्यास लावणें व तें न केलें तर तें कसलें राज्यचालकत्व, असें मानणारांचा पक्ष होता. एऱ्हवीं मोहि-

मेच्या मार्गावर हिंदुधर्म विध्वंसनाचीं कृत्यें करण्याची खानाची प्रगट झालेली वृत्ति उलगडत नाहीं. आणि याच्या उलट खाना-नंतर जे आदिलशाही वजीर यांचे शिवाजीशीं युद्धप्रसंग झाले व तन्निमित्त वाटचाल व हालचाली झाल्या त्यांत कोणी अफझल-खानाप्रमाणें हिंदुधर्म विध्वंसक कृत्यें केलीं नाहींत. हे सर्व आदिल-शाहीकडील वजीर आणि महंमदी धर्माचेंच होते. पण ज्याअर्थी अफजलवधानंतर ती कृत्यें बंद पडलीं. त्याअर्थी राजकारण हें शुद्ध राजकारणाच्याच धोरणानें चालवावें, त्यांत धर्मकारणाचा संबंध म्हणजे धार्मिक जुलुम करण्याचें धोरण आणूं नये हें तत्व प्रतापगडावरील शिव–विजयानें प्रस्थापित केलें. या दृष्टीनें पाहतां खानाचा पराजय म्हणजे राजकारणाच्या नांवानें धार्मिक जुलूम करून अन्य धर्माचा उच्छेद करावयाचा ह्या तत्वाचा पराजय होय आणि शिवाजीचा जय म्हणजे परधर्माविषयीं पूर्ण सहिष्णुता दाखवून स्वधर्मरक्षणासाठीं व स्वातंत्र्य संपादनासाठींहि जें राज-कारण चालवावयाचें तें शत्रूच्या धार्मिक भावनांना धक्का न लावणारें असें शुद्ध स्वरूपाचें असावें या तत्वाचा विजय होय असें म्हणतां येईल. सुदैवानें शिवाजीराजांच्या प्रत्येक प्रमुख युद्धप्रसंगांत असे एकेक पुढलें पुढलें तत्वसोपान हातीं लागले आणि म्हणूनच तो युगपुरुष व खरा शककर्ता होय.

सबब या ऐतिहासिक घटनेचा जगाला असा संदेश आहे कीं, एका व्यक्तीनें काय किंवा राष्ट्रानें काय दुसऱ्या व्यक्तीच्या वा राष्ट्राच्या जीवनावर, धर्मावर वा स्वातंत्र्यावर घाला घातला तर तो मानवतेवर व नीतिमत्तेवर केलेला असह्य अन्याय असून त्याचें पारिपत्य करण्याचा त्या अन्यायपीडितास स्वयंसिद्ध हक्क आहे व त्या पवित्र ध्येयनिष्ठेनें वागणाऱ्या त्या अन्यायपीडित व्यक्तीच्या वा राष्ट्राच्या प्रयत्नास अंतीं यश आल्याशिवाय राहात नाहीं. व

परमेश्वर केव्हांहि त्याच्या पाठीशीं उभा असतो. हा विश्वव्यापक सिद्धांत प्रस्तुत अफझलप्रसंगीं प्रतापगडानें तोफेच्या तोंडानें जगाला गर्जून सांगितला आहे !

**धर्म स्थापनेचें नर। तेचि ईश्वराचे अवतार ॥**

याप्रमाणें मुत्सद्दी मराठा व मायावी मुसलमान यांच्या भेटीचा म्हणजे अफजलप्रकरणाचा वृतान्त या पुस्तकापुरता संपला. महाराष्ट्राच्या स्वराज्याची पहाट झाली. आनंद सह्याद्रीच्या पोटांत मावेनासा झाला. शिवकीर्तिपरिमल अखिल भरतखंडांत सर्वत्र दरवळला.

शेवटीं महाराष्ट्राच्या या महान् विभूतीबद्दल स्वकीयांनीं काढलेल्या प्रशंसोद्गारापेक्षांहि परकीयांनीं केलेलें गुणवर्णन शिवपुण्यस्मरणनिमित्त येथें देणें आम्हांला अधिक महत्त्वाचें वाटतें. म्हणून शिवाजीमहाराजांच्याविषयीं परकीयांनीं जें वर्णन केलें आहे त्याचा सारांश खालीं देवून प्रतापगडावर होणाऱ्या शिवाजीमहाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचें अनावरणसमारंभानिमित्त लिहिलेला हा ऐतिहासिक निबंधात्मक ग्रंथ आम्ही संपवीत आहोंत.

ज्यांनीं शिवाजीला प्रत्यक्ष पाहिलें अशांनीं शिवाजीचे वैयक्तिक वर्णन केलेलें इस्कालियटच्या ता. २६ जानेवारी १६६४ च्या पत्रांत असें आढळतें :—" तो शरिरानें मध्यम उंचीचा आहे. त्याचा बांधा उत्तम प्रमाणाचा असून, तो ताठ उभा राहतो. त्याचे चालणें जलद आहे. तो स्मितपूर्वक बोलतो. त्याचे डोळे पाणीदार आणि तीक्ष्ण दृष्टीचे आहेत. त्याचा वर्ण त्याच्या सर्व जातभाईपेक्षां अधिक गोरा आहे. " डच प्रवासी डेलो ता. ६ जून १६७० च्या आपल्या पत्रांत लिहितो—" शिवाजी स्वतः मूर्तिपूजक आहे. तरी आपल्या राज्यांत सर्व धर्मांस तो उत्तम नांदूं देतो. " इंग्रज इतिहासकार लेनपूल म्हणतो :—" शिवाजी एक महान् योद्धा होता. त्याचें धैर्य अमर्याद होतें आणि शारी-

रिक व मानसिक श्रम करण्याचें त्याचें सामर्थ्य अचाट होतें. ” मेनवेरिंग लिहितो—“ योद्धा या नात्यानें शिवाजीची बुद्धिमत्ता एवढी विशाल होती कीं प्राच्य देशांतील सर्व योध्यांत तो अग्रस्थानीं येतो. त्याची शारीरिक श्रम करण्याची शक्ती आश्चर्यकारक होती. ” इंग्रजी इतिहासकार ऑर्मे म्हणतो—“ शत्रूच्या सर्व हालचाली व हेतू यांच्या बारीकसारीक सर्व तपशीलांसह सर्व बातम्या मिळविण्यांत त्यानें कवडीचीही कसूर कधीं केली नाहीं. स्वदेशाच्या अंतर्गत संरक्षणसाठीं ज्याचा ज्याचा उपयोग करणें आवश्यक होते त्या सर्वांचा त्यानें उपयोग केला. हरएक खिंड वा घाट यांचेवर हुकमत चालविणारा एखादा जवळपासचा किल्ला त्यानें कडेकोट बांधून खडा करून ठेविलेला असावयाचाच. नुसत्या कोंकणांत त्यानें असे ३५० किल्ले सज्ज ठेविले होते असें म्हणतात. त्याच्या अंगीं सेनापतीचे सर्वही गुण वसत होते. स्वतःच्या वैयक्तिक हालचालीमध्यें ज्यांच्याविषयीं कांहीं माहितीचे कागदपत्र उपलब्ध आहेत अशा सर्व सेनापतींत तो अग्रेसर आहे. सेनानायक या नात्यानें त्यानें आपल्या सैन्याच्या अग्रभागीं राहून जितकी भूमि पायाखालीं घातली तितकी दुसऱ्या कोणत्याहि सेनानायकानें कंव्हांहि घातली नाहीं. कोणत्याहि संकटांत, मग तें कितीहि भयंकर वा अचानकपणें आलेलें असो, तो आपलें धैर्य यत्किंचितही ढळूं न देतां त्याविषयीं मनांमध्यें निमिषार्धांत अचूक निर्णय घेवून बिनदिक्कत तोंड देई. त्याचे सर्वश्रेष्ठ अधिकारीही त्याच्या बौद्धिक श्रेष्ठतेपुढें मान तुकवीत. छातीचा कोट करून उघड उघड साहस करण्यांत त्याच्या तलवारीवर मात करणारी तलवार आलम दुनियेंत आढळली नाहीं. लोकांना तो कृपण आहे कीं काय असें वाटावें इतकें त्याचें खाजगी जीवन साधें असें. त्याच्या चालचर्येंत औद्धत्य नव्हतें. डामडौल नव्हता. राजा या नात्यानें तो दयाळू होता.

अँब्रे कॅरे या फ्रेंच गृहस्थाचे शिवाजी महाराजांचेविषयीं काय मत होतें तें दिले आहे. तें असें :–"Carre who accompanied the French Director General was at Surat from 1668 to 1671. He has written two volumes. In his second volume he writes that he admires Shiwaji's character and compares him to Gustavus Adolphus and Julius Ceaser and ascribes to him all the qualities of a Consummate hero and a sovereign."

"फ्रेंच डायरेक्टर जनरल याचेबरोबर आलेला कॅरे इ. स. १६६८ ते १६७१ पर्यंतच्या काळांत सुरत येथें होता. त्यानें दोन खंड लिहिले आहेत. त्यापैकीं द्वितीयखंडांत तो शिवाजीच्या शीलाची प्रशंसा करतो व गस्टॅव्हस अडॉल्फस व ज्यूलिअस सीझर यांच्या श्रेणींत त्यास बसवून तो सर्वगुणसंपन्न विभूति व सम्राट होता व त्याच्या अंगभूत असणाऱ्या सर्व सद्‌गुणांचा समुच्चय त्याचे ठिकाणीं नांदत होता हें तो मान्य करतो.

शिवाजीचा कट्टा शत्रु औरंगजेब त्याचेविषयीं काय लिहितो ते पहा–" तो महारणशूर सेनानी होता. हिंदुस्थानांतील प्राचीन राज्यांचा नाश करण्याचा प्रयत्न मी एकसारखा चालविला असतां नूतन राज्यस्थापनेचे महत्कार्य सिद्धीस नेण्यास लागणारे परक्रमादि गुण त्याच्याहून अन्य कोणच्याही ठायीं नव्हते. तसा तो महा-मनस्क एकच होऊन गेला, माझ्या प्रबळ फौजा त्याच्याशीं झुंज-ण्यांत सतत एकोणीस वर्षे गुंतल्या होत्या तरी त्याची सत्ता एक-सारखी वृद्धींगतच होत होती." महाराजास त्यांच्या हयातींत त्यांना तिरस्कारानें "पहाडका चुव्हा" म्हणणाराचा हा अभिप्राय आहे.

जो नॅथन स्कॉट आपल्या " दख्खनचा इतिहास " या ग्रंथांत म्हणतो, " योद्धा या नात्यानें शिवाजीला तोड नव्हती. राज्य-

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


व. नं. ८८५३६

शासनशास्त्रांत तो पारंगत होता. धार्मिक व गुणी जनांचा तो मित्र होता. तो आपल्या योजना चतुरपणानें आखून त्या सावधानतेनें अमलांत आणी. तो प्रत्येक मुद्यावर सर्वांचा सल्ला घेई, परंतु स्वतःच्या मनांत त्याची शहानिशा करून आपल्या संकेतांना जुळेल अशी जी सल्ला आपली मनोदेवता देईल त्याचप्रमाणेंच तो आपलें पाऊल पुढें टाकी. त्याच्या निर्णयाचें ज्ञान तें अमलांत आणून त्यानें मिळविलेल्या यशाबरोबरच लोकांना होत असें." जे. टॉल बॉईस व्हीलर हा आपल्या "हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास" या ग्रंथांत लिहितो, "अधिराज्य साधनाची बुद्धीमत्ता शिवाजीचे ठिकाणीं जन्मजात होती." किंकेड साहेब आपल्या "मराठ्यांचा इतिहास" या ग्रंथात म्हणतात "थोर संघटनकर्ता व युद्धशास्त्रांत अत्यंत बुद्धीमान, असा तर तो (शिवाजी) होताच, परंतु दूरदर्शीपणाच्या मुत्सद्देगिरीत मात्र तो सर्वाहून श्रेष्ठ ठरतो. एका पाठीमागून एक असे एकसारखे विजय त्याला मिळत गेले असतानांही त्यानें जो विनय दाखविला त्या विनयासारखें दुसरे विनयाचें उदाहरण कोणत्याहि इतिहासांत आढळत नाहीं. प्राचीन व अर्वाचीन अशा दोन्ही काळांतही ज्या फाजील औद्धत्य-पूर्ण अहंतेनें कित्येक सेनानायकांचा नाश घडवून आणला त्या अहंतेला, ज्यानें आपल्या बुद्धीचा तोल कधींही ढळूं दिला नाहीं त्या शिवाजीच्या मनोमंदिरांत कधींही थारा मिळाला नाहीं. विजापूरकर व मोंगल यांच्यावर त्यानें विजयावर विजय संपादन केले परंतु त्यांचा उन्माद त्याला कधींही झाला नाहीं. आपल्या देशबांधवांना स्वातंत्र्य मिळवून देणें ही एकच त्याची महत्वाकांक्षा होती." तारीख १९–११–१९२१ रोजीं प्रिन्स ऑफ वेल्सनीं श्री. शिवाजी महाराजांच्या स्मारकाची कोनशीला बसविली त्या-वेळीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले, "हिंदुस्थानांतील एका अत्यंत

" हिंदुस्थानांतील एका अत्यंत श्रेष्ठ अशा महायोध्याच्या व मुत्सद्याच्या स्मारकाची कोनशिला बसविण्याचे कामीं मला फार आनंद होत आहे. शिवाजी महाराजांनीं साम्राज्य स्थापन केलें इतकेंच नव्हे तर एक राष्ट्रहि निर्माण केलें. या देशांत त्यांचे वर्चस्व इतकें होते कीं, त्यांनीं शेतकऱ्यांना हातीं धरून त्यांना रणगाजी बनविलें." शिवाजीचा दरारा इंग्रजांना किती वाटे याचे उल्लेख ईस्ट इंडिया कंपनीच्या इतिहासांत पावलोपावलीं आढळतात. कोणी मराठा सरदार आला तरी शिवाजीच आला असे इंग्रजांना वाटे. हा सगळा प्रभाव शिवाजीच्या नांवाचा ! कै. पद्मभूषण सरदेसाई यांनीं आपल्या मराठी रियासतीच्या पुस्तकांत शिवाजी व इंग्रज यांच्या संबंधाविषयीं लिहिलें आहे. त्यांत इंग्रजांना शिवाजीविषयीं काय वाटे याबद्दल जो मजकूर आहे त्याचा लागपुरता उतारा खालील- प्रमाणें आहे. " बंगाल्यातील इंग्रज व्यापाऱ्यास तर शिवाजी अमरच आहे असें वाटे. सन १६८० च्या एप्रिल महिन्यांत शिवाजी मरण पावला. ही बातमी मुंबईच्या प्रेसिडेंटानें कलकत्त्यास कळविली त्यावेळेस कलकत्त्याहून जबाब आला तो असा– " शिवाजी इतक्या वेळां मेला आहे कीं, तो अजून अमरच आहे असें कित्येकांस वाटू लागले आहे. त्याची मरणाची वार्ता लोकांस खरी न वाटण्याचें कारण असें कीं, आतांपर्यंत त्यास जिकडे तिकडे विजयच येत गेले व त्याच्याप्रमाणें त्याच्या मागें हिंमतीनें कार्य चालविणारा

मनुष्य कोणी नसल्यामुळें मराठ्यांच्या तावडींतून सुटल्याचा आम्हांस प्रत्यक्ष अनुभव येईल तेव्हांच शिवाजी खरोखर मेला असें आम्ही समजूं."

याप्रमाणें शिवाजीच्या महनीयतेचें व महत्तम कामगिरीचें प्रशंसापूर्ण वर्णन अनेक परकीयांनीं केलेलें आपणांस आढळतें. अशा सर्वगुणसंपन्न, दोष-विरहित आणि सदा यशस्वी युगपुरुषाला कीं, ज्यानें (कै. चिं. वि. वैद्य यांनीं आपल्या शिवचरित्रग्रंथांत उल्लेखिल्याप्रमाणें) इतिहासांतील स्वातंत्र्य संपादनाचे चळवळींतील तीनहि थोर पुरुषांच्या भिन्न भिन्न भूमिका स्वराज्य स्थापनेच्या कार्यांत प्रायः एकट्यानेंच खेळून दाखविल्या, म्हणजे लोक-जागृतीचें कार्य करणाऱ्या केवळ समकालीन समर्थ रामदासस्वामी खेरीज करून महाराष्ट्राचा डॉक्टर गॅरिबॉल्डी आपणच, महाराष्ट्राचा काऊंट काव्हूर आपणच व महाराष्ट्राचा व्हिक्टर इम्यान्युयलहि आपणच, असें शिक्षक, मुत्सद्दी व सेनानी या थोर त्रयीचें एकवटलेलें उदात्त, अद्भूतरम्य व अतुल्य कर्तृत्वकीर्तिमंदिर उभारून दाखविलें आणि अलेक्झांडर, हॅनिबॉल, सीझर व नेपोलियन वगैरे जगविख्यात पुरुषांशीं तुलना करता आपण त्यांच्यापेक्षांहि कांकणभर सरस असल्याचें आपल्या अत्यंत निर्मल चारित्र्यानें, निष्काम लोकधर्मसेवेनें व स्वराज्यसंपादनाच्या परमपवित्र कार्यानें सिद्ध केलें—त्या अद्वितीय पुरुषाला, त्याच्याच काळच्या राष्ट्रीय भावनेच्या अभावीं मेलेल्या पण त्याच्याच अद्भुत पराक्रमाच्या स्फूर्तिज्योतीनें व लोकशिक्षणाच्या संजीवनीनें पुन्हां जिवंत केलेल्या महाराष्ट्रांतील अशिक्षित पिढीनें "**शंकराचा अवतार**" म्हटलें, किंवा तत्कालीन सुशिक्षित पिढीनें, पर-मानंदकृत शिवभारत, जयरामकृत 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान', रघुनाथपंडित कृत 'राजव्यवहारकोश' व संभाजीकृत 'बुधभूषण' या ग्रंथांतून त्याचें अवतारीपण विस्तारपूर्वक वर्णन करून '**विष्णूचा अवतार**' म्हटलें किंवा "**असामान्य कामगिरी करून दाखविणारा पुरुष**" या अर्थानें कां होईना पण आधुनिक चिकित्सक जगानेंहि '**अवतारी पुरुष**' म्हटलें यांत नवल कसलें ?

॥ यतो धर्मस्ततो जयः ॥